मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय अधिक भाद्रपद–मार्गशीर्ष शके १९४५

ऑक्टोबर–नोव्हेंबर–डिसेंबर २०२३/खंड ४७, अंक ३

# ‘अर्थसंवाद’च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **संशोधनपर लेखाची प्रत अथवा सीडी पोस्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **संशोधनपर लेखाची एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाईल व त्याचीच PDF केलेली फाईल अशा दोन फाईल्स्) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल ॲड्रेसवर पाठवावी.** लेखासोबत संपादकांना लेख पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. संशोधनपर लेख पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. संशोधनपर लेख खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून तज्ज्ञ परिक्षकांनी केलेल्या सर्व सूचनांची पूर्तता केल्यानंतरच त्याची प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया संशोधनपर लेख टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, २०१०, (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

# अर्थसंवाद

(तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबरर २०२३ / खंड ४७ / अंक ३

**प्रमुख संपादक**
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय, वारणानगर)

**सल्लागार मंडळ**
**(२०२२-२५)**
संतोष दास्ताने
मुक्ता जहागिरदार
के. के. पाटील
एस. एम. भोसले

**संपादकीय पत्रव्यवहार**
राहुल शं. म्होपरे
'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२,
प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी,
दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे,
उजळाईवाडी, ता. करवीर,
जि. कोल्हापूर - ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

## अ नु क्र म णि का

१. प्रशांत हरमकर
अर्थशास्त्राचे २०२३ चे नोबेल पारितोषिक :
स्त्री श्रमबाजाराच्या संशोधनाला ........ १५३

२. दिग्विजय र. पाटील, एम . एस . देशमुख, अमृत म. चव्हाण
सांगली जिल्ह्यातील कृषी शाश्वततेचे विश्लेषण: शाश्वत कृषी
निर्देशांक दृष्टिकोन ........ १६२

३. अप्पासाहेब विठ्ठल गायके, प्रशांत एन. देशमुख
मराठवाड्याच्या औद्योगिक विकासात
एमआयडीसीची भूमिका ........ १७४

४. विजय मारुती कुंभार
लाभांशाच्या चक्रव्युहात सहकारी बँकांचे भागधारक ........ १९०

५. प्रशांत यशवंत फडणीस
शेतीपूरक व्यवसाय आणि ग्रामीण अर्थव्यवस्था ........ २०१

६. किशोर गजाजन सुतार
गिग इकॉनॉमी: सेवाक्षेत्रातील स्थित्यंतराचे नवे पर्व ........ २०८

७. संतोष दास्ताने
एस. वेंकिटरमणन (१९३१-२०२३) ........ २१६

८. बद्रीनाथ हिरालाल दामजी : पुस्तक परिचय
इकॉनॉमिक्स ऑफ सर्व्हायव्हल सस्टेनेबल,
इन्क्ल्युझिव अँड इक्विटेबल प्रोस्पेरिटी ........ २२०

९. अविनाश कुलकर्णी : पुस्तक परिचय
ट्रायल्स, ट्रिब्युलेशन्स अँड अहा!
मॉमेंटस् ऑफ अ टॅक्समॅन ........ २२५

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### कार्यकारी मंडळ २०२१-२२

- **अध्यक्ष**

  दिलीप अर्जुने (जालना)

- **कार्याध्यक्ष**

  अविनाश रा. निकम (शहादा)

- **कार्यवाह खजिनदार**

  मारोती वि. तेगमपुरे (अंबड)

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

  राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर)

- **विश्वस्त**

  अजय दरेकर (बारामती)
  विकास सुकाळे (नांदेड)
  विठ्ठल घीणमीने (हिंगणघाट)

- **सदस्य**

  सुरेश ढाके (भुसावळ)
  जितेंद्र तलवारे (धुळे)
  राजाराम पाटील (सोलापूर)
  दयाळू राठोड (अकोला)
  मनीषकुमार कायरकर (बल्लारपूर)
  संजय धनवटे (कारंजा)
  विजय भोपाळे (नांदेड)
  सुरेश घुमटकर (बीड)
  जयवंत इंगळे (हुपरी)
  बाळासाहेब पाटील (पनवेल)
  सुभाष सावंत (नाशिक)

- **स्वीकृत सदस्य**

  जनार्दन काकडे (चंद्रपूर)
  अनिल वावरे (सातारा)

- **स्थानिक कार्यवाह**

  विशाल पावसे (सासवड)



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना.
पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७


**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य | : रु. ३०००/- (एकरकमी) |
| इमारत निधी | : रु. २०००/- |
| सदस्य सूची | : रु. १००/- |
| एकूण | : रु. ५१००/- |

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

| | |
|---|---|
| शैक्षणिक संस्था<br>व्यावसायिक संस्था<br>ग्रंथालये | रु.२०००/-(त्रैवार्षिक)<br>रु.३०००/-(पंचवार्षिक) |

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.


**'अर्थसंवाद'साठी अनुदानाबद्दल आभार:**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टीप : म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# अर्थशास्त्राचे २०२३ चे नोबेल पारितोषिक : स्त्री श्रमबाजाराच्या संशोधनाला

**प्रशांत हरमकर** †

**प्रस्तावना :**

द रॉयल स्विडीश ॲकॅडमी ऑफ सायन्स यांनी ९ ऑक्टोबर, २०२३ रोजी अर्थशास्त्राचे नोबेल स्मृती पारितोषिक क्लाऊडिया गोल्डीन यांना जाहीर केले. क्लाऊडिया गोल्डीन यांचा जन्म १९४६ मध्ये न्यूयॉर्क, अमेरिका येथे झाला. त्या सध्या ७७ वर्षांच्या असून हार्वर्ड विद्यापीठामध्ये प्रोफेसर म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी १९७२ मध्ये शिकागो विद्यापीठामधून पीएच.डी. प्राप्त केली होती. क्लाऊडिया गोल्डीन या अर्थशास्त्रामध्ये नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त करणाऱ्या तिसऱ्या स्त्री अर्थशास्त्रज्ञ आहेत. सर्वात प्रथम स्त्री अर्थशास्त्रज्ञ म्हणून एलिनोर ऑस्ट्राम यांना २००९ मध्ये ऑलिव्हर इ. विल्यमसन यांच्यासह नोबेल पारितोषिक प्राप्त झाले होते. त्यांना समूहाच्या आर्थिक शासनाच्या विश्लेषणाकरिता नोबेल स्मृती पारितोषिक दिले गेले होते. अर्थशास्त्राच्या नोबेल स्मृती पारितोषिकाच्या दुसऱ्या मानकरी इस्टर डुफ्लो ठरल्या. यांना त्याचे पती अभिजीत बॅनर्जीसह २०१९ मध्ये दारिद्र्य दूर करण्यासाठी प्रयोगात्मक दृष्टिकोनासाठी पारितोषिक देण्यात आले. एलिनोर ऑस्ट्राम आणि इस्टर डुफ्लो या दोन्ही स्त्री अर्थशास्त्रज्ञांना अर्थशास्त्राचे नोबेल स्मृती पारितोषिक संयुक्तपणे प्राप्त झाले. पण अर्थशास्त्राचे स्वतंत्रपणे नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त करणाऱ्या पहिल्या स्त्री संशोधक क्लाऊडिया गोल्डीन आहेत. आतापर्यंत एकूण ९३ अर्थशास्त्रज्ञांना नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त झाले आहे. यापैकी केवळ ३ स्त्री अर्थशास्त्रज्ञ आहेत.

क्लाऊडिया गोल्डीन यांच्या संशोधनामुळे आधिक्याने स्त्री श्रमबाजाराचे परिणाम समजून घेण्यामध्ये पुढारलेपण आलेले आहे. त्यांनी श्रमबाजारातील लिंग भिन्नतेचे न उलगडलेले विविध आयाम (Key drives) स्पष्ट करून दाखविले आहेत. जागतिक श्रमबाजारामध्ये स्त्रियांचे प्रमाण जलद गतीने वाढत आहे. स्त्रियांचे श्रमबाजारातील प्रमाण वाढत असले, तरी पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना कमी उत्पन्न प्राप्त होते. यामागील कारणे शोधून काढण्याकरिता अमेरिकेमधील २०० वर्षाचे संमक (Data) घेऊन या संमकाच्या साहाय्याने विश्लेषण केलेले आहे. उत्पन्न प्राप्ती व रोजगाराच्या दरम्यान लिंगभिन्नता का दिसून येते? ही लिंगभिन्नता कशा प्रकारची आहे? याचे विवेचन सखोलपणे क्लाऊडिया

† स. प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, या.द.व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तिवसा, जि. अमरावती.
आजीव सभासद क्र.१३७९, भ्रमणध्वनी : ९४२०८३३१२८, ई-मेल : harmakarprashant380@gmail.com

गोल्डीन यांनी केले आहे.

**स्त्री श्रमिक आणि श्रमबाजार :**

गेल्या शतकामध्ये अनेक उच्च उत्पन्न गटातील देशांमध्ये स्त्रियांना त्यांच्या उत्पन्नापेक्षा तिप्पटीने काम करावे लागत होते. मात्र आधुनिक काळात श्रमबाजारामध्ये मोठा सामाजिक आणि आर्थिक बदल घडून आला आहे. मात्र अजूनही महत्त्वपूर्ण अशी लिंगभिन्नता शिल्लक आहे. सर्वप्रथम १९८० मध्ये संशोधकांनी व्यापक दृष्टिकोन स्वीकारून लिंगभिन्नतेच्या स्त्रोताचे विश्लेषण केले आहे. क्लाऊडिया गोल्डीन यांचे संशोधन नवीन, ऐतिहासिक आणि समांतर काळातील स्त्रियांचे श्रमबाजारातील भूमिकेचे अंतरंग उलगडून दाखविणारे आहे.

जागतिक पातळीवर एकूण महिलांपैकी ५० प्रतिशत महिला रोजगारामध्ये समाविष्ट आहे. त्यांच्या तुलनेत पुरुषाचे रोजगाराचे प्रमाण पाहिले तर एकूण पुरुषांपैकी ८० प्रतिशत पुरुष श्रमिकांनी रोजगार प्राप्त केलेला आहे. स्त्रियांना श्रमबाजारात रोजगार प्राप्त झाला असला तरी त्यांना उत्पन्न कमी प्राप्त होते. याबाबत समजून घेत असताना स्त्री आणि पुरुष यांच्या दरम्यान रोजगार आणि उत्पन्नप्राप्तीमध्ये तफावत का आहे? ही तफावत कशा प्रकारची आहे? या लिंग तफावतीला अनेक सामाजिक - आर्थिक कारणे जबाबदार आहेत. ही कारणे अल्पकालीन आणि दीर्घकालीन दृष्टिकोनातून महत्त्वाची आहेत. कारण उत्पन्न आणि लिंग तफावतीच्या वादप्रश्नाचा संबंध हा सामाजिक संसाधनाच्या कार्यक्षम उपयोगाशी संबंधित आहे. श्रमबाजारातील सहभागामध्ये स्त्रियांना समान संधी मिळत नाही किंवा त्यांना असमान अटी अंतर्गत सहभागी करून घेतले जाते. त्यामुळे त्यांचे श्रम व कौशल्य वाया जाते. जर गुणवत्ताधारक व्यक्तीला रोजगार मिळाला नाही, तर आर्थिक अकार्यक्षमता निर्माण होते. जर समान कामासाठी भिन्न वेतन दिले गेले, तर स्त्रिया त्या कामापासून प्रेरित होत नाही व प्रेरणाही मिळत नाही. आर्थिक दृष्टिकोनासह आर्थिक ऐतिहासिक दृष्टिकोनातून अनेकविध घटकांचा प्रभाव हा राहिलेला आहे. हा प्रभाव अजूनही दिसून येतो. स्त्री श्रमिकाची मागणी व पुरवठ्यावर हा प्रभाव दिसून येतो. कामाचे वेतन आणि कुटुंब यावर महिलांच्या व्यावसायिक संधी अवलंबून असतात. स्त्रियांच्या व्यावसायिक संधीचा संबंध हा शिक्षण, मुलाचे लहानपण, तांत्रिक नवप्रवर्तन, कायदे आणि नियम यावर अवलंबून असतो. विशेषत: अर्थव्यवस्थेच्या संरचनात्मक बदलावर स्त्रियांच्या व्यावसायिक संधी अवलंबून असतात. स्त्री रोजगार व उत्पन्न यावर या सर्व घटकांचा प्रभाव दिसून येतो. स्त्री रोजगाराचा दर का व कसा आहे हे समजून घेण्याकरिता वरील सर्व घटक महत्त्वाचे असून या घटकाच्या साहाय्याने क्लाऊडीया गोल्डीन यांनी स्त्री-पुरुषाच्या उत्पन्नामधील भिन्नता व लिंग तफावतीचे अंतरंग दोनशे वर्ष मागे जाऊन उलगडून दाखविले आहे.

**स्त्री श्रमिकाचा आकृतीबंध :**

गेल्या शतकामध्ये समाजाने महत्त्वपूर्ण असे राजकीय, सामाजिक आणि तंत्रज्ञानात्मक बदल अनुभवले आहे. गेल्या शतकात औद्योगिक देश स्थिर आर्थिक वृद्धीचा आनंद घेत होते. हा अनुभव औद्योगिक क्रांतीपासून दिसून आला. असे असताना श्रमामध्ये स्त्रियांचा समान सहभाग असायला पाहिजे होता. त्यांना समान प्रवृत्ती लागू व्हायला पाहिजे होती. मात्र क्लाऊडिया गोल्डीन यांना त्यांच्या संशोधनावरून असे दिसून आले नाही. स्त्रियांना औद्योगिक रोजगारामध्ये समान सहभाग मिळाला नाही व समानतेची प्रवृत्तीही लागू झाली नाही.

स्त्री श्रमिक बाजाराचे परिदृश्य बघितले तर पारंपारिक कृषी आधारित अर्थव्यवस्था ते समकालीन समाजाकडे संक्रमण घडून येत असताना अर्थव्यवस्थेमध्ये बदल घडून आलेले आहे. याचा स्त्रियांवर परिणाम

घडून आला. याबाबतीतील समजूत नोबेल पारितोषिक विजेत्या क्लाऊडिया गोल्डीन यांनी वाढवली आहे. स्त्रियांच्या श्रमबाजारातील सहभागाबाबत जी अस्पष्टता होती ती ऐतिहासिक स्त्रोताद्वारे गोल्डीन यांनी स्पष्ट केली आहे. गोल्डीन यांनी ऐतिहासिक स्त्रोतामध्ये स्त्रियांचा उत्पादनामध्ये कमी सहभाग नोंदवला आहे. ही अस्पष्टता निर्माण झाली त्याला दूर करण्याचा प्रयत्न गोल्डीन यांनी केला आहे. याकरिता त्यांनी नव्याने ऐतिहासिक संमक गोळा करून त्याचे विश्लेषण केले आहे. याकरिता त्यांनी अमेरिकेचा इतिहास मोठा करून (Zoomed) पाहिला तेव्हा त्यांनी चित्र स्पष्ट केले आहे. यामधून त्यांना स्त्री श्रमिक आकृतीबंध कळला आहे. एकोणिसाव्या शतकामध्ये कृषी समाजाकडून औद्योगिक समाजाकडे संक्रमण घडून आले आहे. यामुळे विवाहित स्त्रियांचा श्रमबाजारातील सहभाग घटत गेला आहे. मात्र विसाव्या शतकामध्ये सेवाक्षेत्रामध्ये वृद्धी घडून आली आहे. यानंतर स्त्री श्रमिकाच्या सहभागामध्ये वाढ घडून आली आहे. गोल्डीन यांनी संरचनात्मक बदलाचा परिणाम घर आणि कुटुंब यामधील स्त्रियांची जबाबदारी लक्षात घेवून सामाजिक नियमनाचा आकृतीबंध स्पष्ट केला आहे.

**U आकाराचा वक्र :**

गोल्डीन यांनी १९९० मध्ये “Understanding the Gender Gap : An Economic History of American Woman” हा ग्रंथ प्रसिद्ध केला होता. यामध्ये त्यांनी अमेरिकेतील दोनशे वर्षाचे संमक गोळा करून त्यांना श्रमबाजारामध्ये स्त्रियांचा सहभाग आणि स्त्री व पुरुष वेतनातील भिन्नतेवर प्रकाश टाकला आहे. विसाव्या शतकातील संमक घेवून त्यांचे अध्ययन केले आहे. त्यावरून त्यांनी निष्कर्ष काढला की, स्त्रियांना उत्पन्न प्राप्त करून देणाऱ्या रोजगाराची संख्या आणि आर्थिक वृद्धी यामध्ये धनात्मक सहसंबंध आहे. थोडक्यात सांगायचे झाले तर, आर्थिक वृद्धी घडून आली. याचे कारण स्त्रिया आधिक्याने उत्पादन कार्यामध्ये सहभागी झाल्या. गोल्डीन या पहिल्या निरीक्षक व अभ्यासक होत्या की त्यांनी प्रत्यक्षातील संमकावरून स्त्री श्रमिकाच्या रोजगाराचा दर चुकीच्या पद्धतीने दर्शविल्याचे नमूद केले आहे. स्त्रियांसाठी सामान्यपणे व्यवसाय म्हणजे पत्नी बनून राहाणे हे जनगणना आणि सार्वजनिक नोंदीवरून दिसून येते. म्हणून त्या घरातील कामाशिवाय इतर कोणतेही काम करीत नव्हत्या असा त्याचा अर्थ होत नाही. त्या आपल्या पतीसोबत कृषी क्षेत्र किंवा कुटुंबाच्या विविध व्यवसायामध्ये काम करीत होत्या. स्त्रिया लघुउद्योग व घरगुती उद्योगामध्ये काम करीत होत्या. वस्त्रोद्योग व दुग्ध उत्पादनामध्ये सहभागी होत्या. मात्र त्या ऐतिहासिक नोंदीमध्ये योग्य प्रकारे नोंदणीकृत झाल्या नाही. याकरिता क्लाऊडिया गोल्डीन यांनी नव्याने ऐतिहासिक पाहणी करून नवीन संमक (Database) संकलित केले. याकरिता औद्योगिक सांख्यिकी आणि जनगणना हे दोन महत्त्वाचे स्त्रोत ठरले. क्लाऊडिया गोल्डीन श्रमबाजारातील स्त्री श्रमिकाचे संमक गोळा करण्यात यशस्वी ठरल्या. यावरून त्यांनी स्पष्ट केले की, १८९० च्या दशकामध्ये अमेरिकेतील श्रमबाजारामध्ये स्त्रियांचे प्रमाण लक्षणीयरीत्या जास्त होते. विवाहित स्त्रियांचा रोजगार दर जनगणनेतील नोंदीनुसार तिप्पट होता.

ऐतिहासिक संमकावरून क्लाऊडिया गोल्डीन यांनी स्पष्ट केले की, एकोणिसाव्या शतकात औद्योगिकीकरणाचा उदय होण्यापूर्वी स्त्रिया अधिकाऱ्याने श्रमबाजारामध्ये सहभागी होत्या. याचे कारण असे की, अनेक विवाहित स्त्रियांना औद्योगिकीकरणामुळे रोजगार प्राप्त होणे कठीण होते. म्हणून त्या घरी काम करायच्या, एकत्रितपणे काम करायच्या किंवा कुटुंबासोबत काम करीत होत्या. गोल्डीन यांनी दस्ताऐवजासह ही नवप्रवर्तनीय मांडणी केली आहे. याकरिता त्यांनी अठराव्या शतकातील फिलाडेल्फिया येथील दहा हजार

स्त्री कुटुंबाचे संमक घेऊन मांडणी केलेली आहे. गोल्डीन यांनी असेही दाखवून दिले आहे की, अविवाहित स्त्रियांना औद्योगिक क्षेत्रामध्ये रोजगार प्राप्त होता. तर अमेरिकेतील काही राज्यांमध्ये ४० प्रतिशत स्त्रिया उद्योगामध्ये काम करीत होत्या. मात्र एकूण स्त्री श्रमिकामध्ये घसरण घडून आली होती.

गोल्डीन यांनी दर्शविले की, ऐतिहासिक दृष्टिकोनातून अमेरिकेच्या श्रमबाजारामध्ये स्त्रियांचा सहभाग होता. याचे विश्लेषण U आकाराच्या वक्राद्वारे करता येते. २०० वर्षाच्या काळाच्या दरम्यान म्हणजे अठराव्या शतकाच्या शेवटापासून दिसून येते की, या कालावधीमध्ये आर्थिक वृद्धी स्थिर होती. गोल्डीन यांनी U वक्राच्या साहाय्याने विश्लेषण करताना ऐतिहासिकदृष्ट्या सुसंगत असा सहसंबंध स्त्रियांच्या सहभागाबाबत श्रमबाजार आणि आर्थिक वृद्धीमध्ये दिसून येत नाही.

विसाव्या शतकाच्या आरंभापासूनच विवाहित आणि अविवाहित स्त्रियांच्या रोजगार दरामध्ये तफावत दिसून आली. एकूण स्त्री रोजगारामध्ये २० प्रतिशत स्त्रिया पैसे मिळविण्यासाठी काम करतात. केवळ ५ प्रतिशत स्त्रिया अशा होत्या की, त्या पैसे मिळविण्यासाठी काम करीत नव्हत्या. अमेरिकेचा इतिहास बघितला तर अमेरिकन श्रमबाजारामध्ये स्त्रिया अठराव्या शतकापासून कृषी क्षेत्रामध्ये श्रमिक म्हणून कार्यरत होत्या. तेव्हा स्त्री श्रमिकाचा श्रमबाजारातील सहभाग जास्त होता. मात्र औद्योगिक क्रांती घडून आल्यानंतर उद्योगामध्ये काम करणे स्त्रियांना अवघड झाले. विशेषत: विवाहित स्त्रियांना घर, मुले आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांमुळे आणि औद्योगिक नियमनामुळे त्याचे श्रमबाजारातील प्रमाण घसरत गेले. त्यामुळे स्त्री-श्रमिकाच्या रोजगाराचा दर घसरून अधोगामी प्रवृत्ती लागू झाली. गोल्डीन यांनी दर्शविले की, विसाव्या शतकामध्ये तंत्रज्ञानात्मक प्रगती, सेवाक्षेत्राची वृद्धी आणि स्त्री शिक्षणाची उच्चतम पातळी वाढल्यामुळे श्रमबाजारातील स्त्री श्रमिकाची मागणी वाढत गेली. सामाजिक स्थिती, कायदे आणि संस्थात्मक बंधने यामुळे स्त्री-श्रमिकाच्या श्रमबाजारातील सहभागामध्ये अडथळे निर्माण होतात. स्त्री रोजगारामध्ये विवाहाची मोठी भूमिका आहे. हे सिद्ध करण्यामध्ये क्लाऊडिया गोल्डीन यशस्वी ठरल्याचे त्यांच्या अनुभवनिष्ठ अध्ययनावरून दिसून येतो.

गोल्डीन यांनी नमूद केले आहे की, सेवाक्षेत्राची वृद्धी घडून आल्यामुळे विवाहानंतर स्त्रिया शिक्षक अथवा कार्यालयीन रोजगाराला पसंती देतात. यामुळे स्त्री श्रमिकाच्या मागणीमध्ये वाढ घडून आली आहे. औद्योगिक क्षेत्राच्या वृद्धीच्या काळात विवाहित स्त्रिया श्रमबाजारातून वगळल्या गेल्या होत्या. १९३० च्या जागतिक महामंदीच्या काळात स्त्री श्रमिकाचे वगळल्या जाण्याचे प्रमाण सर्वोच्च होते. त्यानंतरही ही परिस्थिती पुढील वर्षामध्ये दिसून आली. मात्र औद्योगिक वृद्धीमुळे घडून आले असे नाही तर घर, मुले आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्या तसेच औद्योगिक नियमन यामुळे स्त्री रोजगारामध्ये मंदगतीने कपात घडून आली. परिणामत: स्त्री व पुरुष रोजगारातील तफावत वाढत गेली.

**अपेक्षांचे महत्त्व व परिणाम :**

विविध पिढ्यांचा अथवा समूहाचा संबंध हा श्रमबाजाराशी आहे. स्त्रिया जेव्हा जीविकेच्या साधनाची निवड करतात तेव्हा त्यांना विविध परिस्थितीचा सामना करावा लागतो. याबाबत विवेचन करताना गोल्डीन यांनी समूहाधिष्ठित दृष्टिकोन (Cohort Based Approch) विकसित करून विश्लेषण केलेले आहे. जेव्हा श्रमबाजारामध्ये समूहाचा प्रवेश होतो तेव्हा काय घडून येते. अलीकडे विसाव्या शतकामध्ये असे दिसून आले की, प्रामुख्याने काही स्त्रिया विवाहापूर्वी काम करणे एवढेच अपेक्षित असते आणि विवाहानंतर त्या श्रमबाजाराच्या बाहेर पडतात. यावर शैक्षणिक निवडीचा प्रभाव दिसून येतो. गोल्डीन यांनी दर्शविले की, जलद

विकासाच्या काळात स्त्रियांचा रोजगाराबाबत निर्णय घेण्याचा आधार अपेक्षाच आहे. जो नंतर फळाला येत नाही किंवा त्याचे परिणाम दिसून येत नाही.

विसाव्या शतकाच्या दुसऱ्या भागामध्ये (Second Half) सामाजिक बदल घडून आले. विवाहित स्त्रिया श्रमबाजारामध्ये श्रमिक म्हणून परतू लागल्या. जेव्हा या स्त्रियांची मुले मोठी होतात तेव्हा मुले सांभाळण्याची जबाबदारी कमी होते. त्यामुळे त्या पुन:श्च श्रमबाजारामध्ये प्रवेश करतात. रोजगारासाठी व्यावसायिक संधी या शैक्षणिक निवडीवर अवलंबून असतात. अनेक स्त्रिया १९५० च्या दशकामध्ये अमेरकेत तरुण होत्या. त्या पुढे गृहिणी झाल्या, माता झाल्या. जेव्हा त्या आई होऊन श्रमबाजारामध्ये परतल्या तेव्हा तिच्या मुलीने शिक्षणाचा पथदर्श निवडला होता. त्यामुळे स्त्रियांची शिक्षणाची निवड ही २५ वर्षे अगोदरच ठरते. अनेक स्त्रियांची अपेक्षा व्यवसाय (Career) करण्याची नसते, तर ती केवळ तिच्या भविष्याचे नियोजन करीत असते. थोड्या फार प्रमाणात विसाव्या शतकात स्त्रियांना कमी लेखल्या जात होते. त्यामुळे त्या कशा काम करतील? १९७०च्या दशकापर्यंत अपेक्षा आणि परिणाम यांच्या आधारावर स्त्रियांना कोणत्याच सुरक्षितता मिळाल्या नव्हत्या. स्त्रियांच्या शिक्षणामध्ये गुंतवणूक वाढविणे आवश्यक आहे. गेल्या दशकामध्ये स्त्रियांचे शिक्षणातील प्रमाण वाढले आहे. विशेषत: उच्च उत्पन्न गटातील देशांमध्ये स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण पुरुषाच्या तुलनेत जास्त आहे.

स्त्रियांचा व्यवसायाबाबतचा पथदर्श बघितला तर स्त्रियांनी श्रमशक्ती सोडली आहे किंवा श्रमबाजाराच्या बाहेर पडल्या आहे. हे सर्व स्त्रियांचा विवाह झाल्यानंतरच्या काळात दिसून येते. स्त्रियांचा विवाह झाल्यानंतर श्रमबाजार सोडण्याचा विस्तार घडून आल्याचे दिसून येते. यावरून श्रमबाजारामध्ये स्त्रियांचे अल्प प्रमाण का वाढले आहे याचे स्पष्टीकरण करता येते. विसाव्या शतकाच्या दुसऱ्या भागामध्ये (Second half) मात्र श्रमबाजारामध्ये स्त्रियांचा प्रचंड ओघ का दिसून येतो? स्त्रियांनी अनेक वर्षांपर्यंत मुलांचा सांभाळ केला आहे. घर व कुटुंब सांभाळली आहे. ही जबाबदारी दीर्घकाळापासून स्त्री-श्रमशक्तीने केलेली आहे. समूह आधारित दृष्टिकोनानुसार स्त्रियांची प्रगती होते; पण स्त्रियांच्या प्रगतीचा वेग मंद असतो. समजा, एका पिढीसाठी श्रमबाजारामध्ये २० प्रतिशत सहभाग आहे आणि पुढील पिढीसाठी श्रमबाजारात सहभाग ४० प्रतिशत राहिला, तर सरासरी सहभाग ३० प्रतिशत राहील (यामध्ये पिढ्यांचे आकारमान समान असणे आवश्यक असते). प्रत्यक्षात दोन पिढ्यांच्या दरम्यान सहभाग दुप्पट असतो. जर सामाजिक नियम बदलले तर श्रमबाजारामध्ये नवीन आकृतीबंध निर्माण होतो. शिक्षणाचे प्रमाण वाढले तर स्त्रियांच्या रोजगारात वाढ घडून येण्याचा परिणाम होतो.

**गर्भनिरोधक गोळ्याची शक्ती :**

स्त्रियांचे स्वत:चे नियोजन आणि व्यवसायप्राप्ती यामध्ये मूलभूत बदल घडून आले आहे. या नवप्रवर्तनामुळे स्त्रियांना संधी प्राप्त झाल्या आहेत. १९६० च्या दशकापासून स्त्रियांच्या श्रमबाजारातील अपेक्षांमध्ये बदल घडून आलेला आहे. जेव्हा बाजारामध्ये गर्भनिरोधक गोळ्या आल्या तेव्हा कुटुंब नियोजन करणे सोपे झाले. गर्भधारणा रोखणे स्त्रियांना स्वतंत्रपणे अवलंबिता आले. यामुळे कुटुंबाच्या आकारमानावर नियंत्रण ठेवणे शक्य झाले. प्रत्यक्षात गर्भनिरोधक गोळ्यांचा उपयोग वाढून अनेक तरुण स्त्रियांनी अमेरिकेच्या विविध राज्यांमधून भिन्न प्रकारच्या रोजगारामध्ये प्रवेश केला. क्लाऊडिया गोल्डीन आणि त्यांचे सहकारी लॉरेन्स केट्झ यांनी हा गर्भनिरोधक गोळ्यांच्या शक्तीचा प्रभाव असल्याचे स्पष्ट केले आहे. गोल्डीन यांनी शोध घेतला की, गोळ्यांचा परिणाम कसा घडून येतो? गोळ्यांमुळे स्त्रियांना विवाह आणि

मुलांना जन्माला घालणे यामध्ये अंतर ठेवता येते. त्या आवडत्या व्यवसायाची निवड करू शकतात. स्त्रियांचे शिक्षणामधील प्रमाण वाढले आहे. स्त्रिया अर्थशास्त्र, कायदा आणि वैद्यकशास्त्राचे अध्ययन करीत होत्या. १९५० च्या दशकानंतर जन्माला आलेल्या स्त्रियांचा प्रभावशाली गट निर्माण झाला. कारण १९५० नंतर जन्माला आलेल्या स्त्रियांना तरुण असताना गर्भनिरोधक गोळ्यांमध्ये प्रवेश मिळाला. ज्यामुळे या स्त्रिया भविष्याकरिता अधिक चांगले नियोजन करू शकल्या. यामधून त्यांना नवीन प्रेरणा मिळाली. शिक्षण आणि व्यवसायामधील गुंतवणूक वाढली.

गोळ्यांचा परिणाम हा शिक्षण आणि व्यावसायिक संधीच्या निवडीवर सकारात्मक घडून आला असला, तरी यामुळे स्त्री आणि पुरुष उत्पन्नप्राप्तीमधील तफावत पूर्णपणे निघून गेली असा त्याचा अर्थ होत नाही. मात्र १९७० च्या दशकापासून स्त्री व पुरुष उत्पन्नामधील तफावत थोडी कमी झाली. एकूण इतिहासामध्ये स्त्री व पुरुष उत्पन्न तफावतीमध्ये बदल कसा घडून आला याबाबत समज गोल्डीन यांनी वाढवली आहे. तसेच यामागील परिदृश्य स्पष्ट केले आहे.

**उत्पन्न तफावत - ऐतिहासिक दृष्टिकोन :**

सांख्यकीय स्त्रोताच्या आधारे क्लाऊडिया गोल्डीन यांनी स्त्री व पुरुष उत्पन्न तफावतीबाबतची पहिली दीर्घमालिका (Long series) प्रस्तुत केली आहे. याकरिता २०० वर्षाच्या सांख्यकीय सामुग्रीचा वापर केला आहे. या उत्पन्न तफावतीचे स्पष्टीकरण करण्यामध्ये त्या यशस्वी ठरल्या आहे. श्रमबाजारामध्ये अनेक ऐतिहासिक संरचनात्मक बदल घडून आलेले आहे. याचा प्रत्यक्ष लाभ स्त्रियांना मिळाला आहे. फार पूर्वीपासूनच श्रमबाजारामध्ये समानतेचा मुद्दा हा प्राधान्याने होता. लिंगाच्या आधारावर उत्पन्न तफावतीबाबत असे दिसून येते की, औद्योगिक क्रांतीच्या (१८२०-१८५०) दरम्यान आणि त्यानंतर प्रशासकीय आणि कर्मचारी सेवाची (१८३०-१८९०) मागणी वाढली होती. यामधून आर्थिक वृद्धी वाढली, स्त्रियांची शिक्षणाची पातळी वाढली आणि स्त्रियांचे उत्पन्नाचे प्रमाण दुप्पटीने वाढले. १९३० ते १९८० च्या दरम्यान स्त्री व पुरुष उत्पन्न तफावतीमध्ये स्थिरता दिसून आली.

सांख्यकीय सामुग्रीचा उपयोग करून क्लाऊडिया गोल्डीन यांनी सक्षमपणे दर्शविले की, उत्पन्न तफावत स्त्रियांना महत्त्वपूर्णरीत्या प्रभावित करते. उत्पन्न तफावतीमध्ये उत्पादकता, शिक्षण, वय इत्यादी विविध घटक महत्त्वाचे ठरतात. विसाव्या शतकामध्ये सेवाक्षेत्राची वृद्धी घडून आली. स्त्रियांचा सेवाक्षेत्रामध्ये सहभाग वाढला. या क्षेत्रामध्ये त्यांचे उत्पन्न, वेळ आणि नगाच्या आधारावर (Picework) ठरविले गेले. स्त्रिया जेव्हा उद्योग क्षेत्रामध्ये श्रमिक म्हणून काम करीत होत्या तेव्हा त्यांचे उत्पन्न त्यांच्या उत्पादकतेवरून ठरत होते. एकोणिसाव्या शतकाचा शेवट ते १९४० च्या दशकाच्या दरम्यान स्त्री व पुरुष उत्पन्नामधील तफावत वाढत गेली होती. विशेषत: निर्माणी क्षेत्रामध्ये ही तफावत २० ते २५ प्रतिशतपर्यंत वाढत गेली होती. याचे एक कारण असे आहे की, वेळ आणि नगाच्या आधारावर मोबदला (Picework) ठरविणारे करार वाढत गेले होते. जे मोबदला देणाऱ्या व्यवस्थेला अनुकूल होते. गोल्डीन यांनी या सहसंबंधाचे विवेचन केले आहे. गोल्डीन यांनी स्त्री-श्रमबाजाराचे विश्लेषण करताना आधुनिक देयक व्यवस्था, रोजगार प्रवृत्ती, श्रमिकाचे लाभ, व्यावसायिक संधी आणि अपेक्षा हे घटक स्त्री - श्रमिकाची क्षमता आणि उत्पन्न ठरवित असल्याचे स्पष्ट केले आहे.

**पालकत्वाचा प्रभाव :**

अनेक देशांमध्ये स्त्री व पुरुषाकरिता समांतर वेतनाचे कायदे आहे. पुरुषाच्या तुलनेत स्त्रिया अधिक्याने शिक्षित आहे. तरीदेखील उच्च उत्पन्न गटातील देशांमध्ये स्त्री आणि पुरुषाच्या दरम्यान उत्पन्न तफावत आहे. ही उत्पन्न

तफावत १० ते २० प्रतिशतच्या दरम्यान आहे. असे का दिसून येते? गोल्डीन यांनी या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न आपल्या संशोधनातून केला आहे. या प्रश्नाचे तंतोतंत उत्तर देत असताना त्या गाभा (Key) स्पष्टीकरणाची मांडणी करण्यात यशस्वी ठरल्या आहे. ते म्हणजे स्त्रियांनी स्वीकारलेले पालकत्व आहे. स्त्री व पुरुषाच्या उत्पन्न तफावतीचे अध्यगत क्लाऊडीया गोल्डीन आणि त्यांचे सहकारी मारियान बर्ट्रांड आणि लॉरेन्स केट्झ यांनी प्रस्तुत केले आहे. स्त्रिया श्रमबाजारामध्ये प्रवेश करतात तेव्हा सुरुवातीला उत्पन्नामध्ये फार अल्प तफावत दिसून येते. मात्र जेव्हा पहिले मूल जन्माला येते तेव्हा ही प्रवृत्ती बदलते. पहिल्या मुलाच्या जन्मानंतर स्त्रियांच्या उत्पन्नप्राप्तीमध्ये जलद घसरण दिसून येते. स्त्रियांचा उत्पन्न तफावतीचा दर वाढलेला दिसून येतो. कारण मुलांचा सांभाळ पुरुषाच्या तुलनेत आधिक्याने स्त्रिया करतात. तसेच मुलाचे शिक्षण आणि त्यांना व्यवसाय प्राप्त होण्यामध्येही लक्ष घालतात. हे केवळ अमेरिकेतच दिसून येत नाही, तर इतर देशांच्या अध्ययनामध्येही असाच निष्कर्ष मिळतो. यावरून क्लाऊडिया गोल्डीन यांनी असा निष्कर्ष मांडला की, स्त्रियांनी स्वीकारलेल्या पालकत्वामुळे स्त्री आणि पुरुष यामधील तफावत उच्च उत्पन्न गटातील देश तसेच इतर देशांमध्येही दिसून येते.

गोल्डीन यांनी समकालीन श्रमबाजाराचे स्वरूप स्पष्ट करताना श्रमबाजारावर आंशिक स्वरूपात मातृत्वाचा प्रभाव घडून आल्याचे दर्शविले आहे. श्रमबाजारामध्ये स्थिरपणे उपलब्धता आणि लवचिकता अनेक क्षेत्रांमध्ये श्रमिकाबाबत आहे. कारण पुरुषाच्या तुलनेत स्त्रिया आधिक्याने बालसुरक्षिततेची जबाबदारी घेतात. यामुळे व्यावसायिक प्रगती साध्य करणे आणि उत्पन्नामध्ये वाढ घडवून आणणे कठीण होऊन जाते. पालकत्वासह अंशकालीन काम (Part - time job) करणे व हाताळणे कठीण होऊन जाते. यामुळे स्त्रियांना आपले व्यावसायिक कार्य उंचावणे आव्हानात्मक होऊन जाते. सामान्यपणे स्त्रिया त्यांच्या कामाच्या तासामध्ये कपात करून घेण्यास पसंती देतात. या सर्व घटकाचा परिणाम स्त्रियांच्या उत्पन्नप्राप्तीवर घडून येतो. त्यामुळे त्या अपेक्षित व्यावसायिक यश प्राप्त करण्यापासून देखील दूर राहातात.

**श्रमबाजाराचे वास्तव व संबोधन :**

ऐतिहासिक संगक गोळा करणे, संकलन करणे आणि दुरुस्त करणे याद्वारे गोल्डीन यांनी सक्षमपणे नवीन आणि वास्तविक घटक प्रस्तुत केले आहे. या घटकांची गोल्डीन यांनी सखोलपणे समजूत पटवून दिली आहे. याचा परिणाम श्रमबाजारातील स्त्रियांच्या व्यावसायिक संधीवर घडून आला आहे किंवा स्त्रियांच्या व्यावसायिक संधी प्रभावित झाल्या आहे. वास्तवात स्त्रियांनी अनेक वेळा व्यवसायाची निवड केली असते. मात्र विवाह आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे स्त्रियांवर मर्यादा निर्माण होतात. हा गोल्डीन याच्या विश्लेषणाचा आणि स्पष्टीकरणाचा आत्मा आहे.

गोल्डीन यांच्या संशोधनाने दर्शविले की, श्रमबाजारामध्ये स्त्री आणि पुरुषाच्या दरम्यान भिन्नता आहे. ही भिन्नता वैविध्यपूर्ण घटक ठरवित असते. असे सामाजिक विकासाच्या विविध कालावधीमध्ये दिसून आले आहे. जर धोरणकर्त्यांना ही तफावत कमी करायची असेल, तर प्रथम वास्तविकता समजून घेणे आवश्यक आहे. विशेषत: जेव्हा स्त्रियांच्या व्यावसायिक अपेक्षा आणि शैक्षणिक पातळी दरम्यान पुरुष उभा असतो अशा वेळी माहिती आणि शिक्षणामध्ये गुंतवणूक वाढविणे आवश्यक असते. संस्थात्मक बंधने कायद्याने काढून टाकणे आवश्यक असते. याचा सकारात्मक परिणाम स्त्रियांकरिता श्रमबाजारावर घडून येतो. स्त्रियांनी अगोदरच शिक्षणाची उच्चतम पातळी गाठली आहे. पुरुषाच्या तुलनेत त्या आधिक्याने उच्चशिक्षित आहे. स्त्रियांच्या व्यावसायिक यशाकरिता केवळ एवढे पुरेसे

नाही. श्रमबाजारामध्ये पुरुष उच्च शिक्षणाची अट पूर्ण करतात. स्त्री आणि पुरुषाच्या उत्पन्नामध्ये तफावत आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. मूल जन्माला घातल्यानंतर व मोठे झाल्यानंतर स्त्रिया श्रमबाजारामध्ये श्रमिक म्हणून परततात. अशा वेळी स्त्रियांना वित्त आणि व्यावसायिक संधीकरिता नियोजन करावे लागते. म्हणून श्रमिक संघांनी कायद्यामध्ये स्त्रियांकरिता आधिक्याने लवचिकता आणण्याची आवश्यकता आहे.

गोल्डीन यांच्या अध्ययनावरून शिकवण मिळते की, श्रमबाजार व श्रमकायद्यामध्ये बदल घडून येणे आवश्यक आहे. कारण निवडी या व्यावसायिक संधींना प्रभावित करीत असतात. याचा आधार अपेक्षा आहे. अमेरिकेचा इतिहास आणि अनेक उच्च उत्पन्न गटातील देशामध्ये समांतरपणे विकास घडून आलेला आहे. याबाबतच्या सांख्यिकीमध्येच बदल हे लपलेले आहे. कारण नवीन वर्तवणूक आली की, सुरुवातीलाच महत्त्वपूर्ण बदल घडून येत नसतात. प्रमुख बदल हे श्रमिक आणि श्रमशक्तीमध्ये घडून येणे आवश्यक असते. याचा संबंध अल्पकाळाशी असतो. श्रमबाजारातील बदल स्त्रियांच्या व्यावसायिक निवडींना प्रभावित करीत असतात.

**समारोप :**

ऐतिहासिक दृष्टिकोनातून उत्पन्न प्राप्तीमध्ये लिंग तफावत आहे. ही उत्पन्न प्राप्तीमधील तफावत शिक्षण आणि व्यावसायिक निवडीमधून दिसून येते. विशेषतः स्त्रियांच्याबाबत पहिल्या मुलाच्या जन्मानंतर उत्पन्न तफावत वाढत गेल्याचे क्लाऊडीया गोल्डीन यांनी स्पष्ट केले आहे. जेकॉन सेव्हेनसन्स अर्थशास्त्राच्या नोबेल समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी हे नोबेल जाहीर करताना म्हटले की, श्रमबाजारातील स्त्रियांची भूमिका समजावून घ्यावी लागते. कारण समाजाच्या दृष्टिकोनातून ती महत्त्वाची आहे. क्लाऊडिया गोल्डीन याचे आभार मानायला पाहिजे की, त्यांचे संशोधन जमिनीवरचे वास्तव मांडणारे आहे. ही वास्तविकता त्यांनी प्रखरतेने प्रकट केली आहे. ज्याद्वारे मूलभूत घटक स्पष्ट केले आहे. हे मूलभूत घटक वास्तविक अडथळे आहेत. या वास्तविक अडथळ्यांना लक्षात घेऊन भविष्याला संबोधित करण्याची आवश्यकता आहे.

क्लाऊडिया गोल्डीन यांच्या संशोधनाने स्त्री श्रमिक व श्रमबाजाराच्या बाह्य मर्यादा स्पष्ट केल्या आहे. पण त्याबरोबर त्याचे अंतरंगदेखील स्पष्ट केले आहे. अमेरिकेचे अनुभवनिष्ठ विश्लेषण व स्त्री-रोजगाराचा आकृतीबंध हा समांतरपणे इतर देशांना लागू होतो. ज्यामुळे आपणास काल, आज आणि उद्याच्या श्रमबाजारातील स्त्रियांचे स्थान याबाबतची समजूत वाढविण्यास मदत करते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१) जहागिरदार दि. व्यं. (२०२३) : श्रमबाजारात स्त्री सहभाग आणि स्त्री-पुरुष वेतनात तफावत यावरील भाष्यकार क्लाऊडिया गोल्डीन, आर्थिक जगत दैनिक हिंदुस्थान १९ ऑक्टोबर.

२) Goldin Claudia (1977) : Female Labour Force Participation The Origin of Black and White Differences, 1870 and 1980, Journal of Economic History.

३) Goldin Claudia (1984) : The Historical Evolution of Femal Earning Function and Occupation, Exlorations in Economic History.

४) Goldin Claudia (1986) : The Economic status of Woman in the Early Republic : Quantitative Evidence, The Journal of Interdilinary History.

५) Goldin Claudia (1990) : Understanding the Gender Gap : An Economic History of American

Women, Oxford Univeristy Press.

६) Goldin Claudia (1988) : Marriges Bar : Discrimination against Married Woman worker from the 1920 s to the 1950 s, NBER working paper.

७) Goldin Claudia (1995) : The U shape Female Labour Force Function in Economic development and Economic History In : T.P. Schulty (ed) Investment in Women's Human Capital and Economic Development, Chicago Univeristy Press.

८) Goldin Claudia (2005) : From the Vally to the summit : A Brief history of the Quiet Revolution that Transfromed Women work, Regional Review.

९) Goldin Claudia (2006) : The Quit Revolution that Transfromed Women's Emloyment, Education and Family, American Economic review.

१०) Goldin Claudia (2014) : A Ground Gender Convergence : It's Last Chapter, American Economic Review.

११) Goldin Claudia and : Career and Marriage in the Lawrence F Katz (2000) Age of the pill, American Economic Review.

१२) Goldin Claudia and : The power of the pill : Oral Lawrence F Katz Contraceptives and Women (2002) Carrer and Marrige Decision, Journal of Political Economy.

१३) Goldin Claudia and : The Race between Lawrence F Katz Education and Technology, (2008) Harvard Univeristy press.

१४) Goldin Claudia and : The cost of work{lace Lawrence F Katz flexibility for Highpowerd (2011) professionals, Annals of The American Academy of Political and Social Science.

१५) Goldin Claudia and : The most Egalitarian of All Lawrence F Katz (2016) Professions : Pharmacy and the Evalution of a Family - Frendly Occupation, Journal of Labour Economics.

◆

---

ज्या कार्यापासून महत्तम सामाजिक हित साध्य होते
तीच सार्वजनिक आयव्ययाची सर्वोत्कृष्ट पद्धत होय.
- डॉ. डाल्टन

---

# सांगली जिल्ह्यातील कृषी शाश्वततेचे विश्लेषण: शाश्वत कृषी निर्देशांक दृष्टिकोन


दिग्विजय र. पाटील †
एम . एस . देशमुख ††
अमृत म. चव्हाण †††


**प्रस्तावना :**

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सर्वसाधारण सभेने शाश्वत विकासासाठी २०३० पर्यंत धोरण स्वीकारले. ज्यामध्ये १७ शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) समाविष्ट आहेत. सर्वसमावेशकता (Leaving No one Behind) या तत्त्वावर उभारणी करून नवीन योजना सर्वांसाठी शाश्वत विकास साध्य करण्यासाठी सर्वसमावेशक दृष्टिकोनावर जोर देते. नियोजित एकूण १७ ध्येयांपैकी भूक निर्मूलन (Zero Hunger) हे शाश्वत शेतीच्या संकल्पनेशी संबंधित आहे. संख्या किंवा निर्देशांकाच्या परिभाषेत कृषी टिकाऊपणाचे प्रमाण मोजण्यासाठी फारच कमी प्रयत्न केले गेले आहेत. सर्वसाधारणपणे शाश्वत विकासाचा गंभीर परिमाण आणि शेतीचा शाश्वत विकास विशेषतः पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि पिढ्यांमधील सामाजिक समता दर्शवितो (बार्बियर, १९८९; डेली, १९९०; स्वामिनाथन, १९९१). कृषि शाश्वततेसाठी निर्देशांक विकसित करण्याचा कोणताही दृष्टिकोन आवश्यकपणे तिन्ही आयाम प्रतिबिंबित करतो. जसे की, पर्यावरणीय सुरक्षा निर्देशांक (ESI), आर्थिक कार्यक्षमता निर्देशांक (EEI), आणि सामाजिक समता निर्देशांक (SEI). अन्न आणि कृषी संघटना (FAO) शाश्वत कृषी विकासाची व्याख्या करते की, 'नैसर्गिक संसाधनांच्या आधाराचे व्यवस्थापन आणि संवर्धन आणि अशा प्रकारे तांत्रिक आणि संस्थात्मक बदलांचे अभिमुखता करते. वर्तमान आणि भविष्यातील पिढ्यांसाठी मानवी गरजा पूर्ण करणे आणि सतत समाधान सुनिश्चित करणे हे ध्येय आहे' (अन्न आणि कृषी संघटना, १९९१).

भारतातील रोजगार आणि उत्पन्नाचा संबंध म्हणून शेती हा मुख्य व्यवसाय आहे. जवळपास ४८% कुटुंबे ही कृषी आणि संबंधित क्रियाकलापांमध्ये गुंतलेली होती आणि सकल देशांतर्गत उत्पादनामध्ये शेतीचा वाटा १८.३ % आहे (कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, २०२२-२३). भारतासह विकसनशील


† सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र.२००३, भ्रमणध्वनी : ९७६५१९९१९१, ई-मेल : drp.rs.economics@unishivaji.ac.in
†† अधिष्ठाता मानव्य विद्याशाखा व प्राध्यापक, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र.११००, भ्रमणध्वनी : ९८६९२७६२६५, ई-मेल : msd_eco@unishivaji.ac.in
††† वरिष्ठ संशोधक विद्यार्थी, सारथी, पुणे आणि संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र.२००४, भ्रमणध्वनी : ८२०८५४६६१४, ई-मेल : amrutc014@gmail.com

देशांसाठी शेती हे विकासाचे इंजिन मानले जाते. म्हणून, शेतीची पर्यावरण मित्रत्व हा मानवाच्या टिकाऊपणाचा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. (हारोन, इफफात आणि सहजाद, २०१४).

**संशोधन पद्धती:**

**२.१ विश्लेषणात्मक रचना:**

सालेथ आणि स्वामिनाथन (१९९३) च्या संदर्भात SLS ची संकल्पना कार्यान्वित करण्यासाठी, खालील सूत्र मांडले आहेत: SAIij ला jth घटकाशी संबंधित SAI च्या ith घटकासाठी निर्देशांक बनू द्या (राज्य संदर्भात जिल्हे) आणि Xij करू द्या jth घटकाशी संबंधित SAI च्या ith घटकाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या चल मूल्य असेल. नंतर jth घटकाच्या SAI च्या ith घटकाची अनुक्रमणिका खालीलप्रमाणे मोजली जाऊ शकते:

**३. परिणाम आणि चर्चा:**

सांगली जिल्हा हा कृषी उत्पादनाच्या बाबतीत पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख जिल्ह्यांपैकी एक आहे. सांगली जिल्ह्यातील शाश्वत शेतीच्या यशस्वी विकासासाठी दुष्काळी आणि बिगर दुष्काळ प्रवण असे दोन्ही गट आहेत. दोन वेगवेगळ्या कालावधीसाठी म्हणजे कालावधी १ (२०१२) आणि कालावधी २ (२०२२) साठी कृषी शाश्वततेचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

$$SAI_{ijk} = \frac{X_{ijk} - Min_{ijk}}{Max_{ijk} - Min_{ijk}}$$ -------------- सकारात्मक संकेतकांसाठी

$$SAI_{ijk} = \frac{Max\,X_{ijk} - X_{ijk}}{Max_{ijk} - Min_{ijk}}$$ ------------------नकारात्मक संकेतकांसाठी

जसे की ,

i = चल (१,२,३ .............. I)

j = घटक (१,२,३ .............. J)

k = तालुका (१,२,३ ...........K)

**३.१ महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याचा पर्यावरणीय सुरक्षा निर्देशांक:**


मानवी क्रियाकलापांमुळे पर्यावरणीय वातावरणात लक्षणीय बदल घडून आले आहेत. जे एखाद्या प्रदेशातील पर्यावरणीय सुरक्षिततेवर थेट परिणाम करू शकतात. शहरीकरणाचा वेगवान विकास, जमीन वापर हस्तांतरणामुळे निर्माण होणारे परिणाम, प्रादेशिक पर्यावरण आणि परिसंस्थेच्या सेवांवर खूप परिणाम करतात. सातत्याने बदलणाऱ्या कृषी पद्धतींचा पर्यावरणावर परिणाम होत आहे आणि त्याच्याविरुद्ध पर्यावरण बदलांचा कृषी उत्पादनावर परिणाम झालेला दिसून येतो (चेंबर्स, १९८६).

तक्ता १ मध्ये सांगली जिल्ह्याच्या पर्यावरणीय सुरक्षा निर्देशांकाचे (ESI) मापन करण्यासाठी निर्देशांकाची सामग्री दर्शवितो. २०१२ आणि २०२२ मधील शाश्वत कृषी निर्देशांक (SAI) मधील तुलना विविध दुय्यम स्त्रोतांकडून गोळा केलेल्या कच्चा सामग्रीवर आधारित आहे. तसेच वर नमूद केलेल्या पद्धती वापरून निर्देशांक मूल्ये तयार केली आहेत.

सामग्रीच्या आधारे आम्हाला असे आढळले की, तक्ता २ मध्ये, दोन्ही कालखंडात जतमध्ये लोकसंख्येची घनता निर्देशांक सर्वाधिक आहे, तर मिरजमध्ये सर्वात

### २.२ अभ्यासात वापरण्यासाठी त्यांचे निकष, निर्देशक आणि वापरलेले घटक

**आकृती १: अभ्यासात वापरण्यासाठी त्यांचे निकष, निर्देशक आणि वापरलेले घटक**




(संदर्भ: देशमुख आणि पाटील, २०२०)

कमी आहे. त्याचप्रमाणे कालावधी १ साठी शिराळामध्ये सर्वाधिक एकूण वनक्षेत्र निर्देशांक आहे आणि दहा वर्षांनंतर ते कालावधी २ मध्ये पलूसमध्ये स्थलांतरित झाले. दोन्ही कालखंडातील एकूण पशुधन निर्देशांकाबद्दल बोलायचे तर पलूसमध्ये सर्वाधिक निर्देशांक मूल्य आहे तर कडेगावमध्ये सर्वात कमी आहे.

आर्थिक कार्यक्षमता निर्देशांकाची गणना तक्ता ४ मधील उपरोक्त कच्ची सामग्री वापरून केलेली आहे. संशोधनाअंती आम्हाला असे आढळून आले की, वाळव्यामध्ये दोन्ही कालखंडात सर्वाधिक खत वापर निर्देशांक आहे, तर मिरज हा सांगली जिल्ह्याचा शहरी भाग असल्याने त्याचा निर्देशांक सर्वात कमी आहे. शिराळा तालुक्यामध्ये लागवडीखालील निव्वळ क्षेत्र हे २०१२ मध्ये सर्वाधिक होते आणि दहा वर्षांनंतर कडेगावने शिराळ्याला मागे टाकले. क. महांकाळमध्ये लागवडीखालील निव्वळ क्षेत्र सर्वात कमी राहिले. दूध उत्पादन हे पश्चिम महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पलूस हे दोन्ही कालखंडात सर्वोच्च स्थानावर आहे, तर कडेगावचे निर्देशांक मूल्य सर्वात कमी आहे.

तक्ता ६ मध्ये वरील नमूद केलेल्या कच्च्या सामग्रीचा वापर करून सामाजिक समता निर्देशांक (SEI) तयार केलेला आहे. त्यातून असे दिसून आले

**तक्ता १: कालावधी-१ (२०१२) आणि कालावधी-२ (२०२२) साठी महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याचे पर्यावरणीय सुरक्षा निर्देशक**

| तालुका | लोकसंख्येची घनता (प्रति १०००) | | एकूण वनक्षेत्र (हेक्टर) | | एकूण पशुधन (संख्या) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२ | २०२२ | २०१२ | २०२२ | २०१२ | २०२२ |
| शिराळा | २५८ | २६० | १३१२२ | २१९१२ | ७८८६१ | ७९१४१ |
| वाळवा | ७५४ | ८४२ | २९५२ | २९५२ | १७०८१० | १६५५६७ |
| पलूस | ५११ | ५५५ | २९५२ | २९५२ | ५७४५७ | ६३५०३ |
| खानापूर | २३१ | २३३ | १०९३६ | १०९३६ | ७२८६१ | ८०६३४ |
| आटपाडी | ५८७ | ८७३ | ७४८७.२ | ५७६३ | १०५५७१ | ९०१४९ |
| तासगाव | २९२ | ३०७ | ३३७२.८ | ३९०२ | १२२६६१ | १५४७९७ |
| मिरज | ८७४ | ८७४ | ३४०८.२ | २३३२ | १३७६५४ | १३७७८७ |
| क. महांकाळ | २०७ | २१० | १०१७ | ९८६ | १३१६८७ | ११६३६१ |
| जत | १४३ | १४७ | ५०७६.४ | ५१५३ | २०२२३४ | १३२१३७ |
| कडेगाव | २४३ | २४८ | ११३०५ | ३३०७८ | २२७१४८ | ३०२५१५ |
| सांगली | १८१४ | २०३० | ४७५९३ | ७७९२० | १३०६९४४ | १३२२५९१ |

संदर्भः सांगली- २०१२ आणि २०२२ चा सामाजिक आर्थिक आढावा.

आहे की, कालावधीत १ (२०१२) मध्ये खानापूर तालुक्याचा तर कालावधीत २ (२०२२) मध्ये आटपाडी तालुक्याचा दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचा निर्देशांक सर्वाधिक होता. याचा अर्थ असा की, दोन्हीकडे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या सर्वात कमी आहे. तसेच मिरज आणि क. महांकाळ या तालुक्यांमध्ये, कालावधीत अनुक्रमे १ आणि २ मध्ये दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या सर्वाधिक होती. त्यामुळे त्यांचा दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचा निर्देशांक सर्वात कमी आहे. एकूण साक्षरतेबद्दल (शहरी + ग्रामीण) बोलायचे झाल्यास मिरजेचा साक्षरता निर्देशांक कालावधी १ (२०१२) मध्ये सर्वाधिक होता, तर दहा वर्षांनंतर पलूस मिरजेला मागे टाकत एकूण साक्षरता निर्देशांकमध्ये अव्वल स्थानावर होता. तसेच, जत आणि कडेगाव हे तालुके एकूण साक्षरता निर्देशांकमध्ये सर्वात कमी आहेत.

दरडोई वीज उपभोग हा निर्देशक जीवनमानाचा सामाजिक आर्थिक निर्देशक आहे. संशोधनअंती असे आढळून आले की, खानापूरमध्ये दरडोई विजेचा सर्वाधिक वापर आहे त्यामुळे तेथे दरडोई वीज वापर निर्देशांक सर्वात जास्त आहे. तर आटपाडी आणि शिराळामध्ये अनुक्रमे कालावधी १ (२०१२) आणि २ (२०२२) मध्ये सर्वात कमी आहे.

शाश्वत कृषी निर्देशांक (SAI) हा पर्यावरणीय सुरक्षा निर्देशांक (SEI), आर्थिक कार्यक्षमता निर्देशांक (EEI) आणि सामाजिक समता निर्देशांक (SEI) यांचा संमिश्र निर्देशांक आहे. पर्यावरणीय सुरक्षा निर्देशांक (ESI) आणि आर्थिक कार्यक्षमता निर्देशांक (EEI) मध्ये अनुक्रमे शिराळा (०.९०६) आणि वाळवा (१.००) सर्वोच्च क्रमांकावर आहेत तर मिरज (०.२४२ ) आणि आटपाडी (०.१४८) अनुक्रमे सर्वात कमी आहे.

### तक्ता २ : कालावधी-१ (२०१२)आणि कालावधी-२ (२०२२) साठी महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याचे पर्यावरणीय सुरक्षा निर्देशांक

| तालुका | लोकसंख्या घनता निर्देशांक | | एकूण वनक्षेत्र निर्देशांक | | एकूण पशुधन निर्देशांक | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२ | २०२२ | २०१२ | २०२२ | २०१२ | २०२२ |
| शिराळा | ०.८४३ | ०.८४५ | १.००० | ०.६५२ | ०.८७४ | ०.९३५ |
| वाळवा | ०.१६४ | ०.०४४ | ०.१६० | ०.०६१ | ०.३३२ | ०.५७३ |
| पलूस | ०.४९७ | ०.४३९ | ०.१६० | ०.०६१ | १.००० | १.००० |
| खानापूर | ०.८८० | ०.८८२ | ०.८१९ | ०.३१० | ०.९०९ | ०.९२८ |
| आटपाडी | ०.३९३ | ०.००१ | ०.५३५ | ०.१४९ | ०.७१६ | ०.८८९ |
| तासगाव | ०.७९६ | ०.७८० | ०.१९५ | ०.०९१ | ०.६१६ | ०.६१८ |
| मिरज | ०. ००० | ०. ००० | ०.१९८ | ०.०५१ | ०.५२७ | ०.६८९ |
| क. महांकाळ | ०.९१२ | ०.९१३ | ०. ००० | १.००० | ०.५६३ | ०.७७९ |
| जत | १.००० | १.००० | ०.३३५ | ०.१९२ | ०.१४७ | ०.७१३ |
| कडेगाव | ०.८६३ | ०.८६१ | ०.८५० | १.००० | ०. ००० | ०. ००० |
| सांगली | ०.६६५ | ०.५७६ | ०.४२५ | ०.२५७ | ०.५६८ | ०.७१२ |

संदर्भ: तक्ता १ वर आधारित लेखकांची गणना.

## ३.२ महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याचा आर्थिक कार्यक्षमता निर्देशांक:

### तक्ता ३ : कालावधी-१ (२०१२) आणि कालावधी-२ (२०२२) साठी महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याचे आर्थिक कार्यक्षमता निर्देशक

| तालुका | खताचा वापर (मेट्रिक टन) | | निव्वळ लागवडी खालील क्षेत्र (हेक्टर) | | दूध उत्पादन (००० लि.) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२ | २०२२ | २०१२ | २०२२ | २०१२ | २०२२ |
| शिराळा | २३८८५ | ९७३९ | ३९०६४ | ३९३६१ | ६३९१३ | ३३४२६ |
| वाळवा | ४८०४५ | ११६१५ | ५७९०२ | ८७४८९ | १५४१०६ | ९८२३७ |
| पलूस | ३१००५ | १०५६८ | ५७२६५ | ५७२६५ | ८९५६५ | ४०२१६ |
| खानापूर | १७२२५ | ११८२७ | २८६४२ | ५१४७३ | ६५५०७ | १५७६२ |
| आटपाडी | २०९४३ | १२४८७ | १९६२५ | ४८७५० | ६६६६६ | ३७६९६ |
| तासगाव | ३३६८५ | २२०१६ | २२७८७ | ३५३९८ | ११४९७५ | ३३०८८ |
| मिरज | ३८०८६ | १३०२४ | १९०९६ | ७००३१ | ११४९७५ | ५०२५८ |
| क. महांकाळ | २५०१५ | ११२५१ | १७६५८ | ८३६१९ | ९१५९४ | ४७८५६ |
| जत | ३१५५५ | १२६०६ | २४४१३ | ५७२६५ | ६९५६५ | ४१७५२ |
| कडेगाव | २१४८५ | २३४७७ | ५७२६५ | १९२१२२ | ३३८१६ | २८९९३ |
| सांगली | २९०९२९ | १३५६१० | १६५२०६ | ६९४३८२ | ८६४७३४ | ४२७२८३ |

संदर्भ: सांगली- २०१२ आणि २०२२ चा सामाजिक आर्थिक आढावा.

**तक्ता ४ : कालावधी-१ (२०१२) आणि कालावधी-२ (२०२२) साठी महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याचे आर्थिक कार्यक्षमता निर्देशक**

| तालुका | खताचा वापर निर्देशांक | | निव्वळ लागवडीखालील क्षेत्र निर्देशांक | | दूध उत्पादन निर्देशांक | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२ | २०२२ | २०१२ | २०२२ | २०१२ | २०२२ |
| शिराळा | ०.२१६ | ०.००० | ०.५३२ | ०.०२५ | ०.२५० | ०.२१४ |
| वाळवा | १.००० | ०.१३७ | १.००० | ०.३३२ | १.००० | १.००० |
| पलूस | ०.४४७ | ०.०६० | ०.९८४ | ०.१४० | ०.४६३ | ०.२९७ |
| खानापूर | ०.००० | ०.१५२ | ०.२७३ | ०.१०३ | ०.२७३ | ०.००० |
| आटपाडी | ०.१२१ | ०.२०० | ०.०४९ | ०.०८५ | ०.२७३ | ०.२६६ |
| तासगाव | ०.५३४ | ०.८९४ | ०.१२७ | ०.००० | ०.६७५ | ०.२१० |
| मिरज | ०.६७७ | ०.२३९ | ०.०३६ | ०.२२१ | ०.६७५ | ०.४१८ |
| क. महांकाळ | ०.२५३ | ०.११० | ०.००० | ०.३०८ | ०.४८० | ०.३८९ |
| जत | ०.४६५ | ०.२०९ | ०.१६८ | ०.१४० | ०.२९७ | ०.३१५ |
| कडेगाव | ०.१३८ | १.००० | ०.९८४ | १.००० | ०.००० | ०.१६० |
| सांगली | ०.३८५ | ०.३०० | ०.४१५ | ०.२३५ | ०.४३८ | ०.३२७ |

संदर्भ: तक्ता ३ वर आधारित लेखकांची गणना.

### ३.३ महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याचा सामाजिक समता निर्देशांक:

**तक्ता ५ : कालावधी-१ (२०१२) आणि कालावधी-२ (२०२२) साठी महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याचे सामाजिक समता निर्देशक**

| तालुका | घरातील बीपीएल (संख्या) | | एकूण साक्षरता (%) | | दरडोई विजेचा वापर (किलो. वॅट/तास) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२ | २०२२ | २०१२ | २०२२ | २०१२ | २०२२ |
| शिराळा | ५५४३ | ५५४३ | ७३.३० | ७८.९० | २९४ | ३३३ |
| वाळवा | १०५५३ | १०५५३ | ७९.४० | ८५.२२ | ५५० | ५२५ |
| पलूस | ५१३० | ५१३० | ६९.५५ | ८६.१५ | ४६९ | ५६६ |
| खानापूर | ४२८१ | ४६६८ | ६५.९३ | ८१.०० | ५५२ | ९९८ |
| आटपाडी | ४३३९ | ४२८१ | ६६.४० | ८२.२५ | २१५ | ८७९ |
| तासगाव | ६८९८ | ४३३९ | ६७.६७ | ७२.७७ | ५२५ | ७१० |
| मिरज | ११८३४ | ६८९८ | ८२.१० | ८३.३५ | ५३८ | ५६४ |
| क. महांकाळ | ५०५१ | ११८३४ | ७३.०० | ८४.५० | ४२७ | ५३७ |
| जत | ९९१० | ५०५१ | ६३.०० | ७८.६० | ४२७ | ८२० |
| कडेगाव | ४६६८ | ९९१० | ६६.५४ | ७०.४७ | ५१९ | ८६३ |
| सांगली | ६८२०७ | ६८२०७ | ७६.६२ | ८१.५८ | ४९० | ६३१ |

संदर्भ: सांगली- २०१२ आणि २०२२चा सामाजिक आर्थिक आढावा.

**तक्ता ६ : कालावधी-१ (२०१२) आणि कालावधी-२ (२०२२) साठी महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याचे सामाजिक समता निर्देशक**

| तालुका | दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचा निर्देशांक | | एकूण साक्षरता निर्देशांक | | दरडोई वीज वापर निर्देशांक | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२ | २०२२ | २०१२ | २०२२ | २०१२ | २०२२ |
| शिराळा | ०.८३३ | ०.८२८ | ०.५३९ | ०.५४१ | ०.२३४ | ०.००० |
| वाळवा | ०.१७० | ०.१४७ | ०.८५९ | ०.९४३ | ०.९९४ | ०.२८९ |
| पलूस | ०.८८८ | ०.८८५ | ०.३४३ | १.००० | ०.७५४ | ०.३५० |
| खानापूर | १.००० | ०.९४७ | ०.१५३ | ०.६७५ | १.००० | १.००० |
| आटपाडी | ०.९९२ | १.००० | ०.१७८ | ०.७५२ | ०.००० | ०.८२१ |
| तासगाव | ०.६५४ | ०.९९२ | ०.२४५ | ०.१४६ | ०.९२० | ०.५६७ |
| मिरज | ०.००० | ०.६४४ | १.००० | ०.८२२ | ०.९५८ | ०.३४७ |
| क. महांकाळ | ०.८९८ | ०.००० | ०.५२४ | ०.८९८ | ०.०३६ | ०.३०७ |
| जत | ०.२५५ | ०.८९५ | ०.००० | ०.५२२ | ०.६२९ | ०.७३२ |
| कडेगाव | ०.९४९ | ०.२३४ | ०.१८५ | ०.००० | ०.९०२ | ०.७९७ |
| सांगली | ०.६६४ | ०.६५७ | ०.४०३ | ०.६३० | ०.६४३ | ०.५२१ |

संदर्भ: तक्ता ५ वर आधारित लेखकांची गणना.

त्याचप्रमाणे, सामाजिक समता निर्देशांक (SEI) मध्ये, खानापूर (०.७१८) सर्वाधिक आहे आणि जत (०.२९५) सर्वात कमी आहे. शेवटी, संमिश्र निर्देशांकासाठी म्हणजेच शाश्वत कृषी निर्देशांक (SAI) साठी वाळवा (०.६३१) सर्वोच्च क्रमांकावर आहे, तर आटपाडी (०.३६२) हे दुष्काळी क्षेत्र असल्याने कालखंड १ मध्ये सांगली जिल्ह्यातील सर्व तालुक्यामध्ये सर्वात खालच्या क्रमांकावर आहे.

तक्ता ८ व आकृती २ मध्ये कालावधी २ (२०२२) साठी शाश्वत कृषी निर्देशांक (SAI) ची गणना करण्यात आली आहे. पर्यावरणीय सुरक्षा निर्देशांक (ESI) मध्ये शिराळा (०.८१०) हा अव्वल तालुका होता. तर वाळवा (०.२२६) सर्वात खराब कामगिरी करणारा होता. आर्थिक कार्यक्षमता निर्देशांक (EEI) मध्ये कडेगाव (०.७२०) सर्वोच्च आणि शिराळा (०.०८०) सर्वात कमी होता, कारण शिराळा तालुकामध्ये संशोधन काळातील दहा वर्षात खतांचा वापर आणि दूध उत्पादनात प्रचंड घट झाली होती. सामाजिक समता निर्देशांक (SEI) मध्ये खानापूर (० .८७४) सर्वोच्च आणि कडेगाव (०.३४४) शेवटच्या क्रमांकावर होता. तसेच, शाश्वत कृषी निर्देशांक (SAI) मध्ये कडेगाव (०.५६१) सर्वोच्च क्रमांकावर होता, तर मिरज (०.३८१) कालखंड २ (२०२२) मध्ये सांगली जिल्ह्यातील सर्व तालुकामध्ये खालच्या स्थानावर होता.

शाश्वत कृषी निर्देशांक (SAI) चा वापर करून सांगली जिल्ह्यातील कृषी स्थिरतेचे मूल्यांकन करण्यासाठी दोन कालखंडातील तुलनात्मक अभ्यास विचारात घेतला गेलेला आहे. या अभ्यासात २०१२ ते २०२२ या कालावधीत शाश्वत कृषी निर्देशांकातील घसरणीचा कल आणि निव्वळ बदल -०.०४० इतका दिसून आला. शाश्वत कृषी निर्देशांक (SAI) मध्ये शिराळा, वाळवा, पलूस, खानापूर, तासगाव आणि


### ३.४ महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याचा शाश्वत कृषी निर्देशांक:

**तक्ता ७ : शाश्वत कृषी निर्देशांक (SAI) ची गणना कालावधी १ (२०१२)**

| तालुका | पर्यावरणीय सुरक्षा निर्देशांक (ESI) | आर्थिक कार्यक्षमता निर्देशांक (EEI) | सामाजिक समता निर्देशांक (SEI) | शाश्वत कृषी निर्देशांक (SAI) | स्थान |
|---|---|---|---|---|---|
| शिराळा | ०.९०६ | ०.३३३ | ०.५३६ | ०.५९१ | ३ |
| वाळवा | ०.२१९ | १.००० | ०.६७४ | ०.६३१ | १ |
| पलूस | ०.५५२ | ०.६३२ | ०.६६१ | ०.६१५ | २ |
| खानापूर | ०.८६९ | ०.१७९ | ०.७१८ | ०.५८९ | ४ |
| आटपाडी | ०.५४८ | ०.१४८ | ०.३९० | ०.३६२ | १० |
| तासगाव | ०.५३६ | ०.४४५ | ०.६०६ | ०.५२९ | ६ |
| मिरज | ०.२४२ | ०.४६२ | ०.६५३ | ०.४५२ | ७ |
| क. महांकाळ | ०.४९२ | ०.२४४ | ०.४८६ | ०.४०७ | ८ |
| जत | ०.४९४ | ०.३१० | ०.२९५ | ०.३६६ | ९ |
| कडेगाव | ०.५७१ | ०.३७४ | ०.६७९ | ०.५४१ | ५ |
| सांगली | ०.५४३ | ०.४१३ | ०.५७० | ०.५०८ | - |

संदर्भ: तक्ता २, ४ आणि ६ वर आधारित लेखकांची गणना.

**आकृति १ : कालावधी १ (२०१२) साठी शाश्वत कृषी निर्देशांक (SAI) ची गणना**




मिरज ह्या तालुक्यांमध्ये निव्वळ बदल दिसून आला आहे, तर आटपाडी, क. महांकाळ, जत आणि कडेगाव यांनी शाश्वत कृषी निर्देशांक मूल्यांमध्ये वाढता कल दर्शविला गेलेला आहे.

### ४. निष्कर्ष :

शाश्वत कृषी निर्देशांक हा अभ्यास क्षेत्रात शाश्वत

शेतीच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक वैशिष्ट्ये दर्शवितो. तक्ता १० मध्ये सांगली जिल्ह्यातील शाश्वत कृषी निर्देशांकाच्या विविध घटकांमध्ये सुधारणा आवश्यक असलेले तालुके दर्शवतात.


निष्कर्ष काढण्यासाठी धोरण निर्मात्यांनी महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याच्या शाश्वत विकासाच्या विविध क्षेत्रांवर आणि शाश्वत कृषी विकासाच्या पैलूवर अधिक लक्ष केंद्रित केले पाहिजे. विश्लेषणातून असे

**तक्ता ८ : शाश्वत कृषी निर्देशांक (SAI) ची गणना कालावधी २ (२०२२)**

| तालुका | पर्यावरणीय सुरक्षा निर्देशांक (ESI) | आर्थिक कार्यक्षमता निर्देशांक (EEI) | सामाजिक समता निर्देशांक(SEI) | शाश्वत कृषी निर्देशांक(SAI) | स्थान |
|---|---|---|---|---|---|
| शिराळा | ०.८१० | ०.०८० | ०.४५७ | ०.४४९ | ७ |
| वाळवा | ०.२२६ | ०.४९० | ०.४५९ | ०.३९२ | ९ |
| पलूस | ०.५०० | ०.१६५ | ०.७४५ | ०.४७० | ५ |
| खानापूर | ०.७०७ | ०.०८५ | ०.८७४ | ०.५५५ | २ |
| आटपाडी | ०.३४६ | ०.१८४ | ०.८५८ | ०.४६३ | ६ |
| तासगाव | ०.४९६ | ०.३६८ | ०.५६९ | ०.४७८ | ४ |
| मिरज | ०.२४७ | ०.२९३ | ०.६०४ | ०.३८१ | १० |
| क. महांकाळ | ०.५६४ | ०.२६९ | ०.४०२ | ०.४१२ | ८ |
| जत | ०.६३५ | ०.२२१ | ०.७१७ | ०.५२४ | ३ |
| कडेगाव | ०.६२० | ०.७२० | ०.३४४ | ०.५६१ | १ |
| सांगली | ०.५१५ | ०. २८७ | ०.६०३ | ०.४६८ | |

संदर्भ: तक्ता २, ४ आणि ६ वर आधारित लेखकांची गणना.

**आकृती २ : कालावधी २ (२०२२ ) साठी शाश्वत कृषी निर्देशांक (SAI) ची गणना**




दिसून आले आहे की, महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याची शाश्वत स्थिती दहा वर्षांनंतर ०.५०८ ते ०.४६८ इतकी कमी झाली आहे. कालावधी १ ते २ दरम्यान सांगली जिल्ह्याला शाश्वततेची कामगिरी सुधारण्यासाठी सर्वोत्तम पर्यावरणीय, आर्थिक आणि सामाजिक धोरणांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**तक्ता ९ : शाश्वत कृषी निर्देशांक (SAI) मध्ये निव्वळ बदल**

| **तालुका** | **शाश्वत कृषी निर्देशांक (SAI) २०१२** | **शाश्वत कृषी निर्देशांक (SAI) २०२२** | **शाश्वत कृषी निर्देशांकात निव्वळ बदल (SAI)** |
|---|---|---|---|
| शिराळा | ०.५९१ | ०.४४९ | -०.१४२ |
| वाळवा | ०.६३१ | ०.३९२ | -०..२३९ |
| पलूस | ०.६१५ | ०.४७० | -०..१४५ |
| खानापूर | ०.५८९ | ०.५५५ | - ०.०३३ |
| आटपाडी | ०.३६२ | ०.४६३ | ०.१०१ |
| तासगाव | ०.५२९ | ०.४७८ | -०.०५१ |
| मिरज | ०.४५२ | ०.३८१ | -०.०७१ |
| क. महांकाळ | ०.४०७ | ०.४१२ | ०.००४ |
| जत | ०.३६६ | ०.५२४ | ०.१५८ |
| कडेगाव | ०.५४१ | ०.५६१ | ०.०२० |
| सांगली | ०.५०८ | ०.४६८ | -०.०४० |

संदर्भ: तक्ता ७ आणि ८ वर आधारित लेखकांची गणना.

**आकृती ३ : शाश्वत कृषी निर्देशांकात निव्वळ बदल (SAI) कालावधी १ (२०१२) पासून कालावधी २ (२०२२)**



**तक्ता- १० : महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील शाश्वत कृषी निर्देशांकाच्या विविध घटकांमध्ये सुधारणा आवश्यक असलेले ब्लॉक**

| क्र. | तालुका | पर्यावरणीय सुरक्षा निर्देशांक (ESI) | आर्थिक कार्यक्षमता निर्देशांक (EEI) | सामाजिक समता निर्देशांक (SEI) | शाश्वत कृषी निर्देशांक (SAI) |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिराळा | | * | * | * |
| २ | वाळवा | * | | | |
| ३ | पलूस | | | | |
| ४ | खानापूर | | * | | |
| ५ | आटपाडी | * | * | | |
| ६ | तासगाव | | | | |
| ७ | मिरज | * | | | |
| ८ | क. महांकाळ | | | * | * |
| ९ | जत | | | | |
| १० | कडेगाव | | | * | * |

(संदर्भ: लेखक संकलित), (टीप: '*' हे चिन्ह सांगली जिल्ह्यातील विविध तालुका मध्ये ESI, EEI, SEI आणि SAI मूल्यांसाठी आवश्यक सुधारणा दर्शवते)

**संदर्भ ग्रंथ सूची :**


- Barbier, E.B. (1987). The concept of sustainable Economic Development, Environment Conservation, Vol.14-2, pp 101-110.
- Chambers, R. (1986). Sustainable livelihoods: An opportunity for the World Commission on Environment and Development. Institute of Development Studies, University of Sussex, Brighton, UK.
- Conway, G. (1985). Agro Ecosystem Analysis, Agricultural Administration, Vol.20-1, pp-31-35.
- Daly, Herman, E. (1992). Allocation, Distribution and scale: Towards an Economics that is Efficient, Just and Sustainable, Ecological Economics, Vol. 6-2, pp-185-193.

  Deshmukh, M. S. and Patil, D. R. (2020). Agricultural Sustainability and Livelihood Security of Sangli District: An Empirical Illustration Using SLSI Approach, Journal of humanities and Social Seciences , vol 53 issue 2, pp 24-54.
- FAO (1991). Sustainable agriculture and rural development in Asia and Pacific, Regional document No.2, FAO/ Netherlands conference on Agriculture and Environment, Hertogenbosch. The Netherlands, 15-19 April.
- Government of India (2001). Census Report, Office of the Registrar General & Census Commissioner, India.
- Government of India (2011). Census Report, Office of the Registrar General & Census Commissioner, India.
- Government of Maharashtra (2009-19). Socio-Economic of Sangli

District, Directorate of Economics and Statistics, Planning Department, Government of Maharashtra, Mumbai.

- Hatai, L. D., and C. Sen. (2008). An economic analysis of agricultural sustainability in Orissa. Agricultural Economics Research Review, pg: 273-282.
- Harron, Iffat and Shahzad (2014). Assessing spatiotemporal variation in Agricultural Sustainability Using Sustainable Livelihood Security Index: Empirical Illustration from Vaishali District of Bihar, India, Agro ecology and sustainable food system, 11 May 2014, published by Taylor & Francis.
- Kareemulla, Venkattakumar and Samuel (2017). An analysis on agricultural sustainability in India. Current Science, 25 January 2017, pg: 258-266.
- MOSP (2018-2019). Ministry of Statistics and Programme imlementation, Government of India.
- Swaminathan, M. S. (1991). From Stockholm to Rio de Janeiro: The road to sustainable agriculture, M. S. Swaminathan Research institution. Madras, India.
- Singh, P. K., and B. N. Hiremath. (2012). Sustainable livelihood security index in a developing country: A tool for development planning. Ecological Indicators, October- 2012, pg: 442-451.
- Saleth, R. M., and M. S. Swaminathan. (1993). Sustainable livelihood security at the household level: Concept and evaluation methodology. In Proceedings of an interdisciplinary dialogue on eco technology and rural employment, April 12-15, pg: 105-122. Madras, India.
- World Commission on Environment and Development. (1987), our common future, Oxford University Press. New York.

◆

मानवी विकासात गुंतवणुकीशिवाय आर्थिक विकास अशक्य आहे आणि अनैतिक आहे.

**- अमर्त्य सेन**

# मराठवाड्याच्या औद्योगिक विकासात एमआयडीसीची भूमिका

गायके अप्पासाहेब विठ्ठल †
प्रशांत एन. देशमुख ††

**प्रस्तावना**

आधुनिक युगात औद्योगिक विकासाला प्रचंड महत्त्व प्राप्त झाले आहे. औद्योगिक विकास आणि आर्थिक विकास यामध्ये घनिष्ट आणि सकारात्मक संबंध आहे. आधुनिक युगात देशाची प्रगती ही निरनिराळ्या घटकांवर अवलंबून असते. भारत हा कृषिप्रधान देश असून आजही भारतातील दोन तृतीयांशपेक्षा अधिक लोक ग्रामीण भागात वास्तव्य करतात. या बहुसंख्य लोकांच्या उपजीविकेचे व रोजगार पुरविण्याचे साधन म्हणून शेती व तिच्याशी निगडित व्यवसायाकडे पाहिले जाते. आधुनिक युगात कोणत्याही देशाच्या स्थायी आणि निरंतर विकासासाठी फक्त शेतीक्षेत्रावर अवलंबून राहून हे साध्य होणार नाही. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने औद्योगिकीकरणाला प्रोत्साहन देऊन जलदगतीने विकास करणे आवश्यक आहे. औद्योगिकीकरणाच्या वेगावर देशाचा आर्थिक विकासाचा वेग अवलंबून असतो. त्यासाठी प्रत्येक देश इतर देशांच्या तुलनेत आपल्या देशाचा जलद आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी औद्योगिकीकरणावर भर देत असल्याचे दिसून येते. भारताच्या स्वांतत्र्यानंतर शेतीक्षेत्राचा एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील (GDP) वाटा वेगाने कमी होत आहे. परंतु त्यामानाने शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या त्या तुलनेत कमी होत नाही म्हणूनच भारताने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून शेतीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि रोजगार निर्माण करण्यासाठी उद्योगांच्या विकासाला योजनेत महत्त्वपूर्ण स्थान दिल्याचे दिसते.

**भारताचा औद्योगिक विकास**

देशात आर्थिक नियोजनाचा प्रारंभ झाला तेव्हा देशात अत्यंत मोजके उद्योग अस्तित्वात होते. यात प्रामुख्याने परंपरागत स्वरूपाच्या उद्योगांचा समावेश असल्यामुळे उत्पादन पातळी आणि उत्पादन दर्जा निम्न पातळी होता. भारतासारख्या विकसनशील देशात औद्योगिकरण म्हणजचे विकास होय. भारत सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंचवार्षिक योजनामध्ये जलद व संतुलित औद्योगिकरणाचे उद्दिष्ट समोर ठेवून विविध

† संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद,
आजीव सदस्य क्रमांक : २००५, भ्रमणध्वनी : ९१५८८१८८२८, ई-मेल : gaykeappa123@gmail.com
†† सहयोगी प्राध्यापक, जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, छत्रपती संभाजी नगर.
आजीव सदस्य क्र. : १६०५, भ्रमणध्वनी : ८००७३९३३३९, ई-मेल : prashantdeshmukh67@gmail.com

कार्यक्रम राबविण्यात आले. उद्योग, वाहतूक, दळणवळण इत्यादीच्या विकासाकरिता पंचवार्षिक योजनामध्ये एकूण खर्चाच्या पन्नास टक्केपेक्षा जास्त खर्च करण्यात आला. सरकारने सार्वजनिक क्षेत्रामध्ये एकूण खर्चाच्या पन्नास टक्केपेक्षा जास्त खर्च करण्यात आला. सरकारने सार्वजनिक क्षेत्रामध्ये अनेक उद्योग स्थापन केल्यामुळे सुदृढ पायावर देशाचा औद्योगिक विकास घडून आला. योजना काळात सरकारी पातळीवरून करण्यात आलेल्या प्रयत्नामुळे देशात नवीन उद्योगांची स्थापना झाली, उद्योगांचा विस्तार व विकास घडून आला, उद्योगामधील उत्पादनाच्या पातळीमध्ये वाढ झाली, उद्योगामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येऊ लागला, सर्व प्रकारच्या वस्तूंची उपलब्धता वाढली. एकीकडे लोकांना रोजगार मिळाला तर दुसरीकडे लोकांच्या जीवनमानात सुधारणा घडून आली.

पंचवार्षिक योजना काळात शेती, उद्योगधंदे, वाहतूक, बँकिंग, विज्ञान व तंत्रज्ञान अशा सर्व क्षेत्रांत प्रगती झाली. अन्नधान्य उत्पादन १९५० च्या तुलनेत आज तिप्पट आहे. अभियांत्रिकी, अवजड सामग्री, रसायने, वाहने, इलेक्ट्रॉनिक्स, संगणक हे उद्योग नव्याने आकाराला येऊन भरभराटीला लागले. स्वातंत्र्याच्यावेळी सार्वजनिक क्षेत्रात फक्त ५ उपक्रम होते. आज ती संख्या २५० च्या वर पोहचली आहे. कच्चा माल, उत्पादित वस्तू, तंत्रज्ञान अशा सर्व गोष्टी पंचवीस वर्षांपूर्वी आयात कराव्या लागत; परंतु आता आयात न करता निर्यात करण्याची क्षमता देशात तयार झाली आहे. भारताचा विदेशी व्यापार पूर्वी इंग्लंड व राष्ट्रकुल देशांशी मर्यादित होता. आता तो अमेरिका, जपान, रशिया, पूर्व युरोपीय राष्ट्रे, आग्नेय आशिया अशा अनेकविध राष्ट्रांशी अनेक पटीने वाढला आहे.

गेल्या काही वर्षांत विकेंद्रीकरण, खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण यांचे युग सुरू झाले आहे. डंकेल प्रस्तावावर स्वाक्षरी करून जागतिक व्यापार संघटनेत भारताने नव्या युगात प्रवेश केला आहे. १९९८ मध्ये अणुचाचण्या करून आंतरराष्ट्रीय राजकीय व आर्थिक संबंधामध्ये भारताचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली.

**महाराष्ट्राचा औद्योगिक विकास**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला १ मे, २०११ रोजी ५१ वर्षे पूर्ण झाली आहेत. महाराष्ट्राने विविध क्षेत्रांत देशाच्या तुलनेत बरीच प्रगती केली आहे. राज्याचे दरडोई उत्पन्न देशाच्या तुलनेत ४० प्रतिशतने जास्त आहे, शहरीकरण ५० प्रतिशतने जास्त आहे. २००८-०९ मध्ये भारतात कृषी, उद्योग व सेवाक्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा अनुक्रमे १८, २९ आणि ५३ प्रतिशत होता. राज्यातील या क्षेत्रांचा वाटा अनुक्रमे १३, २५ आणि ६२ प्रतिशत होता.

राज्याच्या औद्योगिक विकासात मोठ्या प्रमाणात प्रादेशिक विषमता दिसून येते. महाराष्ट्रातील विशाल औद्योगिक प्रकल्पांचे केंद्रीकरण मुंबई, पुणे व नाशिक विभागात झालेले आढळते. विभागनिहाय विचार करता विशेष आर्थिक क्षेत्रांची संख्या विदर्भ व मराठवाड्यात कमी आहे. विभागनिहाय सुविधा केंद्रांची संख्या बरीच संतुलित आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची प्रगती विभागनिहाय विषम आहे. विभागनिहाय सहकारी औद्योगिक वसाहतीत बरीच तफावत आहे. सूक्ष्म, लहान, मध्यम व मोठ्या उपक्रमाबाबतसुद्धा विभागनिहाय विषमता आढळते. विभागनिहाय दरडोई उत्पन्न २००७-०८ मध्ये मुंबई विभागाचे ७३,९३० रु. तर अमरावती विभागाचे २९,५०३ रु. होते. महाराष्ट्राचे ४७, ०५१ रु. होते. कोकण (६६,१९७ रु.), पुणे (५२०७५ रु.), नागपूर (४०,५३९ रु.), नाशिक (४०,७४९ रु.) तर छत्रपती संभाजीनगर विभागाचे ३०,४९९ रु. होते.

राज्याच्या आर्थिक विकासामध्ये औद्योगिक क्षेत्राची प्रमुख भूमिका आहे. राज्य उत्पन्नात वस्तू निर्माण क्षेत्राचा

वाटा १८ प्रतिशत आहे. तो राष्ट्रीय स्तरावर १६ प्रतिशत आहे. राज्य शासनाचे औद्योगिक धोरण हे देशाच्या औद्योगिक धोरणाशी नेहमीच सुसंगत राहिले आहे. राज्य शासनाने २००६ मध्ये नवीन औद्योगिक, गुंतवणूक व पायाभूत सुविधा धोरण जाहीर केले. या धोरणात प्रादेशिक समतोल विकासावर भर देण्यात आला.

महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती वेगाने होत आहे, असे शासनाला वाटते. औद्योगिक गुंतवणुकीसह थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यातही राज्याला यश मिळाले आहे. औद्योगिक गुंतवणुकीत सातत्य निर्माण करण्याच्या दृष्टीने तसेच परकीय कंपन्या आणि थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यातील आघाडी, देशातील सर्वात जास्त विशेष आर्थिक क्षेत्रांना (सेझ) मंजुरी इत्यादींचा विचार करता महाराष्ट्राने देशाच्या औद्योगिक मंजुरी देण्यात प्राधान्य, आणि योग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उच्चाधिकार समितीची स्थापना, एक खिडकी योजनेचा अभिनव प्रयोग यामुळे सकारात्मक बदल घडून आलेत.

भारताच्या पश्चिम भागात स्थित महाराष्ट्र हे सर्वात जास्त औद्योगिकीकरण झालेले राज्य आहे. सन २०२१ मध्ये स्थूल राज्य उत्पन्न २६,२७,५४२ कोटी होते. सकल राज्य उत्पादन (SGDP) असलेली महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही भारतातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. सन २०२०-२१ मधील महाराष्ट्राचा वाटा हा भारताच्या एकूण सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (GDP) १४.० टक्के होता, तर राज्याचा दरडोई उत्पन्न २,१५,२३३ एवढे होते.[१] महाराष्ट्र राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्ये उत्पादन, वित्तसेवा, आंतरराष्ट्रीय व्यापार, जनसंपर्क माध्यमे, तंत्रज्ञान, पेट्रोलियम, फॅशन, वस्त्रोद्योग, जडजवाहिरे, आभूषणे, माहिती व तंत्रज्ञान, सहाय्यभूत सेवा व पर्यटन उद्योगांचा मोठा वाटा आहे. महाराष्ट्राची राजधानी व देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत अनेक कॉर्पोरेट व वित्तीय संस्थांची मुख्यालये स्थित आहेत. भारताचे मुख्य रोखे बाजार (Stock Exchanges-BSE&NSE) व वायदे बाजार (commodity exchange) तसेच भांडवल बाजार या शहरात आहेत. महाराष्ट्रामध्ये उत्तम संस्थापित औद्योगिक, आर्थिक वातावरण व व्यवहारिक नेतृत्व यामुळे हे राज्य एक अग्रेसर औद्योगिक व आर्थिक केंद्र बनले आहे. राज्याने देशी तसेच प्रख्यात परदेशी गुंतवणूकदारांद्वारे मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक आकर्षित केली आहे. भारत सरकारच्या औद्योगिक धोरण व प्रोत्साहन विभागानुसार (DIPP), एप्रिल-२००० ते डिसेंबर-२०२२ या कालावधीत महाराष्ट्रात १०,८८,५०२ कोटी रु. इतकी थेट परदेशी गुंतवणूक झाली असून, ती आखिल भारताच्या एकूण थेट परदेशी गुंतवणुकीच्या २८.५ टक्के असल्याचे आढळते.

वार्षिक उद्योग पाहणी ही औद्योगिक सांख्यिकीचा प्रमुख स्त्रोत आहे. या पाहणीद्वारे नोंदणीकृत वस्तुनिर्माण क्षेत्रातील निविष्ठी, स्थिर व खेळते भांडवल, रोजगार, उत्पादन, मूल्यवृद्धी, इत्यादींबाबतचे अंदाज उपलब्ध होतात. वार्षिक उद्योग पाहणीत कारखाना अधिनियम, १९४८ च्या विभाग-दोन एम (१) आणि एम (२) खाली नोंदणी झालेल्या सर्व कारखान्यांचा आणि विडी व सिगारेट कामगार (रोजगाराच्या अटी) अधिनियम, १९६६ नोंदणी झालेल्या विडी व सिगारेट कारखान्यांचा समावेश आहे.[२] वार्षिक उद्योग पाहणी २०१९-२० वर आधारित उद्योगांची निवडक वैशिष्ट्ये तक्ता क्र. १ मध्ये दिली आहेत. वरील माहितीच्या आधारे दिसून येते की, सन २०१९-२० मध्ये महाराष्ट्र राज्यातील उद्योगांची संख्या २५,६१० होते, तर भारतात एकूण २,४६,५०६ उद्योगांची संख्या होती. महाराष्ट्रातील उद्योगांची संख्या भारताच्या १०.४ टक्के प्रमाणात असल्याचे दिसून येते. उद्योग क्षेत्राच्या रोजगाराच्या अभ्यासातून दिसून येते की, महाराष्ट्रात जवजवळ २० लाख रोजगार निर्माण झाला असून हे प्रमाण देशाच्या

**तक्ता क्र. १ : वार्षिक उद्योग पाहणीवर आधारित उद्योगांची निवडक वैशिष्ट्ये २०१९-२०**

(रु. कोटी)

| वैशिष्ट्ये | महाराष्ट्र | अखिल भारत | अखिल भारताशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| उद्योग (संख्या) | २५,६१० | २,४६,५०४ | १०.४ |
| रोजगार (लाख) | २०.३८ | १६६.२४ | १२.३ |
| स्थिर भांडवल | ४,३३,२०४ | ३६,४१,३५२ | ११.६ |
| खेळते भांडवल | १,३५,१६८ | ८,८३,३०१ | १५.३ |
| एकूण उत्पादन | १२,३९,७६९ | ८९,८३,३०१ | १३.८ |
| एकूण निविष्ठी | १०,२३,९०८ | ७४,९७,५५६ | १३.७ |
| स्थूल मूल्यवृद्धी | २,१५,८६० | १४,८५,७४५ | १४.५ |
| निव्वळ मूल्यवृद्धी | १,७७,९३६ | १२,१२,६४८ | १४.७ |
| नफा | ६०,६६२ | ४,६९,४७३ | १२.९ |

स्त्रोतः राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन २०१९-२०

१२ टक्के असल्याचे दिसून येते. तसेच महाराष्ट्र राज्याचे एकूण उत्पन्न १२,३९,७६९ एवढे असून भारताचे उत्पन्न ८९,८३,३०१ एवढे आहे.[३] भारताच्या उत्पन्नाच्या प्रमाणात महाराष्ट्राचे उत्पन्न १३.८ टक्के असल्याचे आढळते. म्हणजेच देशातील एकूण उत्पादनात महाराष्ट्र राज्याचा वाटा सर्वाधिक असल्याचे आढळते.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (M.I.D.C.)**

महाराष्ट्र राज्याची निर्मिती सन १९६० साली होवून १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी औद्योगिक विकासासाठी 'बोर्ड ऑफ इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट' या नावाचं एक मंडळ स्थापन केलं. या मंडळाने संपूर्ण राज्याचा भौगोलिक व इतर घटकांचा अभ्यास केला व राज्याच्या उद्योगाचा विकास आराखडा तयार केला. औद्योगिक विकासासाठी कायमस्वरूपी महामंडळाची आवश्यकता वरील अभ्यासात दिसून आली. यशवंतराव यांचे नेतृत्व दूरदृष्टी होते. त्यांनी एकसमान औद्योगिक विकास व्हावा यासाठी 'महाराष्ट्र उद्योग कायदा' मंजूर केला. यशवंतराव चव्हाण यांच्या मते, 'आपले राज्य हे उद्योगधंद्याच्या बाबतीत भारतात सर्वांत आघाडीवर आहे. त्यामुळे राज्यातील उद्योगधंद्याचा केवळ राज्याचाच नव्हे, तर सर्व देशाच्या अर्थव्यवस्थेवर भलाबुरा परिणाम होतो. उद्योगधंद्याचा पाया बळकट असल्याखेरीज आपल्या पंचवार्षिक योजना पूर्णपणे यशस्वी होऊ शकणार नाहीत. तेव्हा अशा परिस्थितीत औद्योगिकीकरणाची गती ज्यामुळे रोखली जाईल व राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होईल असे काहीही न करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य ठरते. उत्पादन सारखे होत राहाण्यासाठी व त्यात वाढ होण्यासाठी उद्योगधंद्यांचा कारभार सुरळीत चालला पाहिजे यासाठी उद्योगांचे नियोजन करणे महत्त्वाचे आहे.'[४] महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ज्याला सर्वजण एम.आय.डी.सी. म्हणून ओळखतात. त्याची स्थापना १ ऑगस्ट, १९६२ ला तात्कालीन माननीय मुख्यमंत्री कै. श्री. यशवंतराव चव्हाण व उद्योगमंत्री स.गो. बर्वे यांच्या प्रयत्नाने झाली.

महाराष्ट्र राज्य हे सतत दुष्काळी राज्य म्हणून प्रसिद्ध

होते. तेथील महत्त्वाचा व्यवसाय म्हणजे शेती. ही शेती पूर्णतः पावसावर अवलंबून होती. पावसाचे प्रमाण हे कधी जास्त तर कधी कमी, असे असल्याने येथील लोकांचे जीवनमान हे अगदीच हालाखीचे होते. मुंबईस लाभलेल्या भौगोलिक परिस्थितीमुळे तेथे उद्योगधंदे भरभराटीला आले.[५] इतर ठिकाणी मुंबईप्रमाणे उद्योगधंद्याची वाढ होऊ शकली नाही. इतर भाग हा औद्योगिकदृष्ट्या मागासलेला होता. महाराष्ट्रातील दुष्काळ कायमच घालवावयाचा असेल तर केवळ शेतीवर अवलंबून राहाता कामा नये. त्यासाठी उद्योगधंद्याची वाढ करणे आवश्यक आहे. तसेच उद्योगधंद्याची वाढ ही केवळ मुंबई-पुणे या मोठ्या शहरापुरतीच न राहाता ती खेड्यापाड्यातही झाली पहिजे. उद्योगधंद्यांची वाढ ही महाराष्ट्रात सगळ्याच ठिकाणी व जलद गतीने होण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली (एम.आय.डी.सी.). तसेच महामंडळ शासनाच्या इतर खात्याप्रमाणे कायदे कानूनमध्ये अडकून राहू नये, त्याचप्रमाणे महामंडळावर राजकीय वरचष्मा राहू नये यासाठी स्वायत्तता देण्यात आली आहे.

**एमआयडीसीचे प्रमुख उपक्रमः**

महामंडळ स्थापन झाल्यावर उद्योगधंदे मुंबईच्या बाहेर पडण्यासाठी ठाण्यातील वागळे इस्टेट येथे, त्याप्रमाणे अंधेरीतील मरोळ येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन केली. वरील औद्योगिक क्षेत्रांत उद्योजकांनी चांगला प्रतिसाद दिला. हा प्रतिसाद लक्षात घेऊनच महामंडळाचे सन १९६५ साली ठाणे-बेलापूर, टी.टी.सी., नाशिक (सातपूर), औरंगाबाद, नागपूर व कोल्हापूर येथे औद्योगिक क्षेत्रे स्थापन केली. राज्य शासनाची प्रमुख औद्योगिक पायाभूत विकास संस्था म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची (एमआडीसी) स्थापना करण्यात आली. नियोजित आणि सुयोग्यरीत्या औद्योगिक विकास होण्यासाठी औद्योगिक क्षेत्र निर्माण करणे; तसेच औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कार्य करणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे देशातील सर्व औद्योगिक विकास महामंडळामध्ये सर्वाधिक औद्योगिक जमिनीची मालकी असलेल्यापैकी एक आहे.

औद्योगिक क्षेत्रे, विशेष आर्थिक क्षेत्रे, विल्वर झोन आणि माहिती तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान, वाईन (द्राक्ष प्रक्रिया) व रत्ने ही विशेष संकुले विकसित केली आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सन २०२२ डिसेंबर पर्यंत २९० औद्योगिक क्षेत्रे निर्माण केली असून, त्यापैकी १४३ मोठे औद्योगिक क्षेत्रे, १०५ लघु औद्योगिक क्षेत्रे व ३९ विकासकेंद्रे आहेत, तर १,९४,०११ कोटी गुंतवणूक व १९.०८ लाख रोजगार क्षमता असलेले ५०.७८८ उद्योग घटक आहेत. एकूण ९६,६३७ विकसित भूखंडापैकी सुमारे ७२ टक्के भूखंडांचे वाटप उद्योजकांना करण्यात आले.[६]

महाराष्ट्र औद्येगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटकांची माहिती तक्ता क्र. २ मध्ये दिली आहे. उद्योग घटकांचा विचार करता सर्वाधिक १५,६८७ उद्योग घटक संख्या पुणे विभागत असून, १,६७,८०१ कोटी रु. गुंतवणुकीत ९.५५ लाख रोजगार निर्मिती झाली आहे. सर्वात कमी उद्योग घटकांची संख्या २,८३६ अमरावती विभागात असून, ११,२२९ कोटी गुंतवणुकीतून ०.५९ लाख रोजगार निर्मिती झाल्याचे आढळते. औरंगाबाद विभागात एकूण १०,२१५ उद्योग घटकसंख्या असून, यात ३१,५२५ लाख कोटी रु. एवढ्या गुंतवणुकीतून १.०१ लाख रोजगार निर्मिती झाल्याचे दिसून येते. म्हणजेच महाराष्ट्र व औरंगाबाद जिल्ह्यात औद्योगिक वसाहतीमुळे उद्योगांच्या विकासाला गती मिळत असल्याची दिसून येते. महराष्ट्रातील एमआयडीसी क्षेत्रातील एकूण ५७,०२४ उद्योग घटकांची संख्या असून, ३१,५२५ कोटी रु. गुंतवणुकीतून १९.८९ लाख रोजगार निर्मिती झाल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. २ : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील विभागनिहाय औद्योगिक घटकांची माहिती**

(दि. ३१ डिसेंबर, २०२२)

| विभाग | घटक (संख्या) | गुंतवणूक (रु. कोटी) | रोजगार (लाख) | विकसित भूखंड (संख्या) |
|---|---|---|---|---|
| कोकण (मुंबई वगळून) | १४,२६६ | ८४,७०२ | ४.८४ | १३,८७८ |
| मुंबई | १,०१२ | २०,६८५ | १,३९ | ९,१३१ |
| नाशिक | ८,९८८ | १३,५६९ | १.२१ | ९,८८७ |
| पुणे | १५,६८७ | १,६७,८०१ | ९.५५ | २८,६१२ |
| औरंगाबाद | १०,२१५ | ३१,५२५ | १.०१ | २०,१३९ |
| अमरावती | २,८३६ | ११,२२९ | ०.५९ | ८,९९८ |
| नागपूर | ४,०२० | ५०,०३४ | १.३० | ९,६०५ |
| एकूण | ५७,०२४ | ३,७९,५४५ | १९.८९ | १,००,२५० |

स्त्रोतः महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन, २०२२

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची उद्दिष्ट्येः**

महाराष्ट्राचा तीव्र गतीने व नियोजनबद्धतेने औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी 'महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ' (एमआयडीसी) स्थापन करण्यात आले. महाराष्ट्र औद्योगिक विकास कायदा १९६१ नुसार, १ ऑगस्ट, १९६२ ला एमआडीसी प्रत्यक्ष अस्तित्वात आली.

महाराष्ट्राच्या समतोल आर्थिक विकास घडवून आणण्याच्या कामाला नियोजनबद्ध पद्धतीने गती देण्यासाठी एमआयडीसी स्थापना करण्यात आलेली आहे. प्रत्येक जिल्ह्यांच्या विविध भागांत आणि मागासलेल्या विभागांत उद्योग निर्माण व्हावे, या हेतुने औद्योगिक क्षेत्र निर्माण करून उद्योगासाठी लागणाऱ्या अत्यावश्यक सेवासुविधा उपलब्ध करून देण्याचा त्यामागे उद्देश होता. त्या सोयी-सुविधांमध्ये मागासलेल्या भागांतील उद्योजक पुढे येतील आणि सहस्तक्षेपतेने उद्योग सुरू करतील हे ग्रहीत होते.[७]

१. सुनियोजित व पद्धतशीर औद्योगिक विकासासाठी जमीन अधिग्रहित करून औद्योगिक क्षेत्र विकसित करणे व अशा जमिनीवर भूखंड आखणी करून वाटप करणे.

२. उद्योग क्षेत्र विकासाठी विशेष नियोजन अधिकार मंडळ म्हणून कार्य करणे.

३. 'उद्यमात सकल समृद्धी' (औद्योगिकीकरणातून सर्वांची समृद्धी) हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे घोषवाक्य व तत्त्वज्ञान आहे.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रमुख कार्यः**

१. औद्योगिक वसाहत उभारण्यासाठी योग्य ठिकाण शोधून जमीन संपादित करून औद्योगिक क्षेत्रे विकसित करणे.

२. संपादित केलेल्या औद्योगिक क्षेत्रात नियोजित आराखडा तयार करून भूखंड पाडणे, भूखंडाचे वितरण, भाड्याने देणे इ. द्वारे जमिनीची योग्य विल्हेवाट लावणे.

३. औद्योगिक वसाहतीत रस्ते, पथदिवे, पाणी पुरवठा, वीज, ड्रेनेज इ. पायाभूत सुविधा पुरवणे.

४. योग्य प्रमाणात व शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी जलशुद्धीकरण केंद्र स्थापन करणे.

५. औद्योगिक वसाहतीतून काही प्रमाणात दुषित पाणी, रसायनयुक्त सांडपाणी, दुषित हवा इ. घटक बाहेर पडत असतात, यांची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी पायाभूत सुविधा पुरविणे.

६. औद्योगिक परिसरात गृहनिर्माण सोसायट्या किंवा राहाण्यासाठी सामूहिक सुविधा स्थापन करण्यात मदत करणे. तसेच परिसरात फायर स्टेशन, वैद्यकीय सुविधा, पोलीस स्टेशन, बँकींग सुविधा, पोस्ट ऑफिस इ. सुविधा निर्माण करण्यास मदत करणे.

७. औद्योगिक वसाहतीमध्ये साफसफाई, वृक्षलागवड व पायाभूत सुविधांची देखभाल करणे.

८. उद्योग उभारणीसाठी इच्छुक लघुउद्योजकांना प्रोत्साहन योजना राबविणे आणि विविध सवलती देणे.

९. शासकीय व निमशासकीय प्रकल्प राबविणे.

**एमआयडीसीची प्रमुख वैशिष्ट्ये :**

१. एमआयडीसी हे एक वैधानिक महामंडळ असून महाराष्ट्र शासनाचा एमआयडीसी कायदा १९६१ अंतर्गत स्थापन झालेले आहे.

२. एमआयडीसी ही देशातील प्रमुख पायाभूत सुविधा एजन्सी आहे.

३. 'उद्यमात सकल समृद्धी' (औद्योगिकीकरणातून सर्वांची समृद्धी) हे एमआडीसीचे ब्रीदवाक्य आहे.

४. एमआयडीसीचे मुख्य कार्यालय मुंबईत आहे आणि इतर कार्यालये जसे की, क्षेत्रीय कार्यालये, मंडळ कार्यालये, विभागीय कार्यालये इ. राज्यांत वेगवगळ्या ठिकाणी आहेत.

५. एमआयडीसीचे व्यवस्थापन राज्य सरकारने नियुक्त केलेल्या संचालक मंडळाद्वारे केले जाते.

६. एमआयडीसीतील पाणीपुरवठा योजना, औद्योगिक क्षेत्र उभारणी तसेच इतर पायाभूत सुविधांची पूर्तता करण्यासाठी निधी हा विविध स्त्रोताद्वारे संकलित करत असते.

७. एमआयडीसीद्वारे औद्योगिक क्षेत्रात पाणीपुरवठा तर केला जातोच; पण त्यासोबत औद्योगिक क्षेत्राव्यतिरिक्त पाणीपुरवठा करून सामाजिक जबाबदारी पार पाडते.

८. औद्योगिक भागात पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी सांडपाण्याची शास्त्रशुद्ध पद्धतीने विल्हेवाट लावते व मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यास प्रोत्साहन देते.

**औद्योगिकीकरणाची भूमिका**

औद्योगिकीकरण असे अभियान आहे की, ज्याद्वारे विकसनशील राष्ट्रे विकासातील दोष तथा उणिवा दूर करू शकतात. तसेच अल्पविकसित राष्ट्रेही आपले दारिद्र्य व बेकारीचे निवारण करून, धनधान्य व समृद्ध राष्ट्र होऊ शकते. अल्पविकसित या शब्दातील अल्प, हा शब्द नष्ट करण्याची शक्ती फक्त औद्योगिकरणातच आहे. 'औद्योगिकीकरणावरच कोणत्याही देशाचा विकास अवलंबून आहे', असे पं. जवाहरलाल नेहरूंनी म्हटले होते.[८] व्यापक रूपाने या शब्दाचा अर्थ पाहिला तर तो असा आहे की, आर्थिक विकास तसेच जीवनमान उंचविण्याची किल्ली म्हणजे औद्योगिकीकरण असे म्हणता येईल. प्रो. एम. डी. ब्राईसने असे म्हटले आहे की, 'विकासाच्या कोणत्याही सुदृढ कार्यक्रमामध्ये औद्योगिक विकास आवश्यक व अंतिम रूपाने महत्त्वपूर्ण भूमिका निभावतो.[९]

औद्योगिकीकरणाचा भारतीय जीवनावर व्यापक प्रभाव पडला आहे आणि तो अजूनही पडत आहे. यातून भारतीय सामाजिक जीवनात आमूलाग्र बदल झालेले दिसतात. भारतीय ग्रामीण संस्कृती, परंपरा यांनाच प्रभावित न करता, भारतीय कुटुंब पद्धती, नागरिक

जीवन, विवाह, जाति-प्रथा, धर्म आणि विश्वास इ. सर्व घटकांवर प्रभाव झाल्याचे आढळते. एवढेच नाही तर धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनावर देखील पर्याप्त प्रभाव पडल्याचे दिसते. औद्योगिकीकरणामुळे भारतीय समाजजीवनावर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडला आहे. भारतात संघटित व असंघटित क्षेत्रात उद्योगांची वाढ झाली आहे. संघटित क्षेत्रातील उद्योगांत लोखंड, पोलाद, सिमेंट, साखर, ताग, खते, कापडे, अभियांत्रिकी अशा उद्योगांचा समावेश होतो. देशाच्या दृष्टीने संघटित व असंघटित अशा दोन्ही क्षेत्रातील महत्त्व मोठे आहे. लोखंड व पोलाद, सिमेंट, खते, पेट्रोलियम, अभियांत्रिकी इ. उद्योग देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत, तर असंघटित क्षेत्रातील उद्योग भारतातील ग्रामीण भागात महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे.[१०]

औद्योगिकीकरणामुळे सर्व उत्पादन कार्यामध्ये क्रमबद्ध परिवर्तन घडून उपक्रमांचे यांत्रिकीकरण, नवीन उद्योगांची निर्मिती, नव्या बाजाराची स्थापना तसेच एखाद्या नवीन क्षेत्राचा विकास होत असतो. त्याचप्रमाणे एखाद्या देशामध्ये भांडवलाचा गहन व व्यापक उपयोग केला जाऊ शकतो. हा प्रयोग यांत्रिकीकरण - बृहत प्रमाणावरील उद्योगांची स्थापना व उत्पादनास प्रोत्साहन देतो. या प्रयोगामुळे उत्पादन होऊन मोठ्या प्रमाणात संशोधन सुरू होते. थोडक्यात म्हणजे औद्योगिकीकरणाची कास धरून कोणतेही राष्ट्र उद्यमी बनू शकते.[११]

**१) उत्पादनात वाढ :**

औद्योगिकीकरणामुळे विकासाचा वेग वाढतो. कारण उद्योग क्षेत्रात, शेती क्षेत्रापेक्षा उत्पादक व प्रमाण वाढीचा दर जास्त असतो. त्यामुळे शेतीवर आधारलेल्या देशातील उत्पादन व उत्पन्न औद्योगिकदृष्ट्या प्रगत राष्ट्राच्या उत्पादन व उत्पन्नापेक्षा कमी असते. त्यामुळे विकसनशील देशांनी आर्थिक विकासासाठी त्यांनी औद्योगिकीकरण करून उत्पन्न वाढून आर्थिक विकास होवू लागतो.

तक्ता क्र. ३ मध्ये सन १९६१ पासून ते २०२१ पर्यंतचे एकूण राज्य उत्पन्न, क्षेत्रनिहाय उत्पन्न आणि दरडोई राज्य उत्पन्न दिलेले आहे. सन १९६१ मध्ये राज्याची एकूण उत्पन्न २,२४९ कोटी रु. होते. यात सन २०२१ मध्ये वाढ होऊन २६,९०,५२५ कोटी रु. झाले. उद्योग क्षेत्रातील उत्पन्न सन १९६१ मध्ये ५५६ कोटी रु. (एकूण उत्पन्नाच्या २४.६८ टक्के) होते, सन २०२१ मध्ये वाढून ६,३८३०८ कोट रु. (एकूण उत्पन्नाच्या २९ टक्के) झाल्याचे दिसून येते. तसेच दरडोई उत्पन्न सन १९६१ मध्ये ५७६ रु. होते. २०२१ मध्ये दरडोई उत्पन्न २१५२३३ रु. झाले.[१२] एकूणच राज्यातील विकासाचा परिणाम राज्याच्या एकूण उत्पन्नावर, उद्योगावर होऊन दरडोई उत्पन्नास योग्य प्रमाणात वाढ झाल्याचे आढळले.

आलेख क्र. १ मध्ये महाराष्ट्राच्या एकूण उत्पन्नात कृषि, उद्योग आणि सेवाक्षेत्रनिहाय उत्पन्नातील वाटा दर्शवला आहे. राज्याच्या एकूण उत्पन्नात सेवाक्षेत्र आणि उद्योग क्षेत्रात कृषी क्षेत्राच्या तुलनेत अधिक वाढ झाल्याचे दिसून येते. २०११ नंतर राज्यातील सेवाक्षेत्राचा विकास झपाट्याने होत असल्याचे आढळून येते.

**२) रोजगारात वाढः**

औद्योगिकीकरणामुळे विविध उद्योगांमध्ये वाढ होऊन रोजगाराच्या संधी वाढू लागतात. उद्योगांच्या विकासामुळे शेतीक्षेत्र तसेच सेवाक्षेत्रांचा विकास होऊ लागतो. यातून सर्व क्षेत्रामध्ये रोजगारात वाढ होऊ लागते, म्हणजे अर्थव्यवस्थेतील बेकारी कमी होत जाते. सन २०२१ पर्यंत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) ५२,६२३ औद्योगिक भूखंड वितरित केले असून, यात ३,१९,१९७ कोटी रु. गुंतवणूक झाली आहे. यातून १६.२९ लाख रोजगार निर्मिती झाल्याचे दिसून येते.[१३]


**तक्ता क्र. ३ : महाराष्ट्र राज्यातील सन १९६१ पासून ते २०२१ पर्यंतचे एकूण, विभागनिहाय, दरडोई उत्पन्न**

| सांकेतिक राज्य उत्पन्न | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०२०-२१ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण राज्य उत्पन्न (GDP) (रु. कोटी) | २,२५२ | ५,७७७ | १९,३७७ | ६८,८९८ | २,४३,५८४ | ९,५०,७७० | २६,९०,५२५ |
| कृषि व संलग्न कार्य क्षेत्र (रु. कोटी) | ५८५ (२५.९७) | १,०७८ (१८.६६) | ३,७५६ (१९) | १२,३६३ (१८) | ३२,७११ (१३) | १,२२,९३२ (१२) | ३,५६,६५५ (१३) |
| उद्योग क्षेत्र (रु. कोटी) | ५५६ (२४.६८) | १,७३२ (२९.९८) | ६,२२४ (३२) | २२,५५४ (३३) | ६४,९४२ (२७) | २,६३,५१२ (२८) | ६,३८,३०८ (२९) |
| सेवा क्षेत्र (रु. कोटी) | १,१११ (४९.३३) | २,९६९ (५१.३९) | ९,३९७ (४८) | ३३,९८१ (४९) | १,४५,९३१ (६०) | ५,६४,२२६ (६१) | १३,५६,९७५ (५८) |
| दरडोई राज्य उत्पन्न (रु.) | ५७६ | १,१६८ | ३,११२ | ८,८११ | २८,५४० | ८४,८५८ | २,१५,२३३ |

स्त्रोतः महाराष्ट्रातील आर्थिक पाहणी अहवाल २०२२-२३ प्रमाणे आहे. टीपः दरडोई उत्पन्न चालू किंमतीवर आधारित आहे.

✻ एकूण राज्य उत्पन्न (GDP) बाजारभाव

**आलेख क्र. १ : महाराष्ट्रातील सन १९६१ ते २०२१ पर्यंतचे क्षेत्रनिहाय एकूण उत्पन्नातील वाटा**




स्त्रोतः महाराष्ट्रातील आर्थिक पाहणी अहवाल २०२१-२२

### ३) निर्यातीत वाढः

शेती क्षेत्रातील उत्पादनाच्या मागणीची लवचिकता म्हणजे एकूण मागणी कमी असते, त्यामुळे विकसित देशात शेतीक्षेत्रातील उत्पादनाचे प्रमाण जास्त असते. थोडक्यात, प्राथमिक क्षेत्रातील वस्तूंची मागणी फारशी वाढू शकत नाही. विकासाच्या गरजा भागविण्यासाठी विदेशी विनिमयाची या देशांना गरज असते. त्यासाठी औद्योगिकीकरण करणे आवश्यक असते, त्यामुळे उत्पादनात विविधता येते. याशिवाय अशा वस्तूंना असलेली मागणी मोठी आणि वाढती असते, त्यामुळे निर्यात वाढू लागते. परिणामी, आर्थिक विकासाची गती वाढते. भारतातून आणि महाराष्ट्र राज्यातून निर्यात होणारी प्रमुख उत्पादने म्हणजेच रत्ने, दागिने, पेट्रोकेमिकल्स, अभियांत्रिकी वस्तू, धातू आणि धातू उत्पादने, औषधी आणि फार्मास्युटिकल्स, कापड, कृषी-आधारित उत्पादने, प्लास्टिक वस्तू इ. समावेश आहे. सन १९९१ मध्ये भातातून ४४०४१ कोटी रु. तर महाराष्ट्र ातून १२३८२ कोटी रुपयांची निर्यात केली जात असत. सन २०२१ मध्ये निर्यातीत वाढ होऊन २१,५९,०४३ कोटी रु. भारतातून तर, महाराष्ट्रातून ४,३१,५३२ कोटी रु. निर्यात झाली असल्याचे दिसून येते.[१४]

### ४) सेवाक्षेत्राचा विकासः

औद्योगिक क्षेत्र आणि सेवाक्षेत्र एकमेकांस पूरक क्षेत्र आहे. महाराष्ट्रातील सेवाक्षेत्राचा एकूण उत्पन्नातील वाटा तक्ता क्र. १.१ मध्ये दिल्याप्रमाणे सन १९६१ मध्ये ४९ टक्के (१,१११ कोटी रु.) होता, यात वाढ होऊन सन २०२१ मध्ये ५७ टक्के (१३,५६,९७५ कोटी रु.) झाल्याचे दिसून येते. औद्योगिक विकासामुळे सेवाक्षेत्राला उपयोग होतो. वाहतूक व दळणवळण, बँक विमा, व्यापार विमा, हॉटेल, आरोग्य, शिक्षण इ. क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान वापरून दर्जेदार सेवा कमी किंमतीत पुरवण्यास मदत होते.[१५]

### ५) बाजाराचा विकासः

विविध प्रकारच्या उद्योगांच्या विकासामुळे बाजाराचा विकास व विस्तार होण्यास मदत होते. उद्योगांच्या विकासामुळे वेगवगळ्या प्रकारच्या कच्च्या मालाच्या बाजारपेठेचा विस्तार होतो. तसेच उद्योगात तयार होणाऱ्या पक्क्या मालाची बाजारपेठ वाढते. उद्योगात विविध प्रकारच्या वस्तुंचे उत्पादन कमी खर्चात होऊन अशा उत्पादनाची बाजापेठ विस्तारते.

### ६) आर्थिक स्थैर्यः

शेतीक्षेत्रावरील फार मोठे अवलंबित्व आर्थिक अस्थैर्य निर्माण होण्यास कारणीभूत ठरते. दुष्काळसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. उद्योगांची चांगली वाढ झालेली असेल तर अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात आर्थिक स्थिरता निर्माण होण्यास मदत होते. भारतीय शेतीचे निसर्गावर असलेले फार मोठे अवलंबित्व लक्षात घेता आर्थिक स्थैर्य राखून ठेवण्यात औद्योगिक क्षेत्राची भूमिका महत्त्वाची ठरते.

### ७) भांडवल निर्मितीच्या वेगात वाढः

देशातील औद्योगिकीकरणात झालेल्या वाढीमुळे भांडवलनिर्मितीत व भांडवलनिर्मितीच्या दरात वाढ होते. उद्योग गुंतवणुकीत झालेल्या वाढीमुळे भांडवलनिर्मितीचा दर वाढतो. भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगही देशातील स्थूल देशांतर्गत भांडवलनिर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सन २०२० मध्ये भातातील स्थिर भांडवल ३६,४१,३५२ कोटी रु. होते, तर महाराष्ट्राचे ४,३३,२०४ कोटी रु. (भारताशी हे ११.६ टक्के) होते. तसेच देशातील खेळते भांडवले ८,८३,३०१ कोटी रु. तर राज्याचे १,३५,१६८ कोटी रु.[१६] (भारताच्या १५.३ टक्के प्रमाणात) असल्याचे दिसून येते.

### ८) विदेशी गुंतवणुकीत महत्त्वाचा वाटाः

विकसनशील अर्थव्यवस्था जर विकसित व्हायच्या असतील तर तेथील उद्योग व्यवसायात वाढ झाली

पाहिजे. परंतु, त्यांच्या वाढीसाठी भांडवलाची गरज महत्त्वाची असते. देशांतर्गत भांडवल पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्यास परकीय गुंतवणुकीची आवश्यकता असते. देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील आर्थिक व सामाजिक परिस्थिती बऱ्यापैकी असल्यामुळे परकीय गुंतवणूकदार महाराष्ट्राला प्राधान्य देत आलेले आहेत. परकीय थेट गुंतवणुकीच्यासंदर्भात देशात महाराष्ट्र राज्याचा प्रथम क्रमांक आहे.. सन २०२०-२१ मधील महाराष्ट्राचा वाटा हा भारताच्या एकूण सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (GDP) १४.० टक्के होता, तर दरडोई राज्य उत्पन्न २,१५,२३३ होते.[१७] ही गुंतवणूक देशातील एकूण परकीय गुंतवणुकीचा हा ओघ वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे, येथील आधारभूत संरचनांचा विकास आणि सरकारचे प्रोत्साहनात्मक (Pro-active) धोरण होय. राज्यातील सेवा, माहिती तंत्रज्ञान, आधारभूत संरचना, ऑटोमोबाईल्स आणि अभियांत्रिकी ही विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीची मुख्य क्षेत्रे असल्याचे आढळते. औद्योगिक विकासासाठी विदेशी थेट गुंतवणूक महत्त्वाची असल्याचे आढळते.

**९) समतोल क्षेत्रीय विकासः**

सुरुवातीपासूनच भारतीय अर्थव्यवस्था ही मोठ्या प्रमाणावर शेतीवर अवलंबून असून, देशातील फार मोठी लोकसंख्या व मोठ्या प्रमाणावर भांडवल या क्षेत्रात आहे. भारतात कोणत्या ना कोणत्या भागात दुष्काळ, पूर अशा समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे त्याचा त्या भागातील शेती उत्पादनावर परिणाम होतो. देशातील औद्योगिकीकरणाच्या वाढत्या वेगामुळे समतोल क्षेत्रीय विकास साध्य करणे शक्य होऊन शेतीवरील अवलंबित्व काही प्रमाणात कमी होईल. अविकसित भागात उद्योगांना चालना देऊन त्या भागास विकासाच्या प्रवाहात आणता येईल, यात औद्योगिकीकरण महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

**१०) नैसर्गिक साधनसामग्रीचा योग्य वापरः**

देशातील मोठ्या प्रमाणावरील नैसर्गिक साधनसामग्रीचा वापर विविध अशा संघटित व असंघटित क्षेत्रातील उद्योगांमुळे शक्य झालेला आहे. भारतात अजूनही मोठ्या प्रमाणावर खनिज साधनसामग्री आणि जंगल व कृषी आधारित साधनसामग्री आहे. नवी औद्योगिक उत्पादन संस्थांच्या विकासाद्वारे या साधनसामग्रीचा महत्तम उपयोग करणे शक्य आहे.[१८]

**मराठवाड्याची वैशिष्ट्ये**

सामाजिक संशोधन करीत असताना संशोधनातील समस्यांचा सर्व अंगाने अभ्यास करणे हा सामाजिकशास्त्राच्या संशोधनाचा गाभा होय. प्रस्तुत संशोधनात औद्योगिक विकासातील MIDC च्या भूमिकेचा अभ्यास करायचा असला तरी यात छत्रपती संभाजीनगर जिल्हा व मराठवाडा विभागाची ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक पार्श्वभूमी तपासावी लागेल. कारण याचा उपयोग प्रस्तुत समस्या समजून घेण्यासाठी होईल, ही त्या मागची धारणा आहे. यात प्रामुख्याने मराठवाड्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, प्राचीन काळातील मराठवाडा, मध्ययुगीन कालखंडातील मराठवाडा, मराठवाड्याची भौगोलिक वैशिष्ट्ये, लोकसंख्या, मराठवाड्यातील औद्योगिक वसाहती या घटकांचा अभ्यास करणार आहोत. मराठवाडा विभाग हा प्राचीन काळापासून सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध व गौरवशाली इतिहास लाभलेला प्रदेश आहे. मराठवाडा म्हणजेच गोदावरी (दक्षिणगंगा) आणि गोदावरीच्या उपनद्यांच्या प्रवाहाच्या रेषेत असलेला महाराष्ट्रातील एक भाग होय.[१९] याच नद्यांच्या प्रवाहाच्या रेषेत असलेला महाराष्ट्रातील एक भाग होय. याच नद्यांचा पाण्याने स्वभावतः, स्वरूपात एक वेगळी चव असणारी इथली माती आणि माणसं! मराठवाड्यात महाराष्ट्राचं कुलदैवत आई तुळजाभवानी, तसेच घृष्णेश्वर, वैद्यनाथ, नागनाथ अशी बारा

जोतिर्लिंगापैकी महत्त्वाची जोतिर्लिंग विराजमान आहेत. तसेच गौरवशाली इतिहासाचा ठेवा म्हणजेच प्रसिद्ध अजिंठा-वेरुळ लेणी, गुंफा, मंदिरे, अनेक संतांचे-पंथाचे, राजे, राजवटींचे, धर्मियांचे आश्रयस्थान असणारी भूमी म्हणजेच मराठवाडा. महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीत स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणारी भूमी. सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकुट, चालुक्य, यादव आणि निजाम अशा वेगवेगळ्या राजवटी पाहाणारी भूमी. आजच्या महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली या आठ जिल्ह्यांचा समावेश मराठवाडा या प्रदेशात केला जातो.

**मराठवाड्यातील औद्योगिक वसाहती**

देशात औद्योगिकीकरणाला चालना मिळावी याकरिता स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारी पातळीवरून जे संस्थात्मक स्वरूपाचे प्रयत्न करण्यात आले. त्यामध्ये औद्योगिक वसाहतींच्या कार्यक्रमामुळे समाजात उद्योजकतेची वाढ होण्यास फार सहाय्य झाले. भारतामधील लघु उद्योग विकास आयुक्त या नात्याने डॉ. पी. सी. अलेक्झांडर यांना लघुउद्योग तसेच औद्योगिक वसाहतींच्या विकासकार्याचा दीर्घ अनुभव आहे. डॉ. अलेक्झांडर यांनी औद्योगिक वसाहतीची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. 'औद्योगिक वसाहत म्हणजे सोयीस्कर ठिकाणी पुरेशा प्रमाणावर बांधण्यात आलेल्या कारखान्यांचा एक समूह आहे. या ठिकाणी पाणी, वाहतूक, वीज, बँक सुविधा, पोस्ट ऑफिस, कॅन्टीन, सुरक्षितता, प्रथमोपचार यासंबंधीच्या सोयी व त्याशिवाय तांत्रिक मार्गदर्शन आणि सामान्य सेवेच्या सोयी प्रदान करण्यासाठी विशेष व्यवस्था उपलब्ध असते. राज्यशासनाची प्रमुख औद्योगिक पायाभूत विकास संस्था म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची (एमआयडीसी) स्थापना करण्यात आली. नियोजित आणि सुयोग्यरीत्या औद्योगिक विकास होण्यासाठी औद्योगिक क्षेत्र निर्माण करणे; तसेच औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कार्य करणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे देशातील सर्व औद्योगिक विकास महामंडळामध्ये सर्वाधिक औद्योगिक जमिनीची मालकी असलेल्यापैकी एक आहे. औद्योगिक क्षेत्रे, विशेष आर्थिक क्षेत्रे, विल्वर झोन आणि माहिती तंत्रज्ञान, जैव तंत्रज्ञान, वाईन (द्राक्ष प्रक्रिया) व रत्ने ही विशेष संकुले विकसित केली आहेत. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने २८९ औद्योगिक क्षेत्रे निर्माण केली असून, त्यापैकी १४३ मोठे औद्योगिक क्षेत्रे, ९५ लघु औद्योगिक क्षेत्रे व ५१ विकासकेंद्रे आहेत, तर १.९४,०११ कोटी गुंतवणूक व १५.०८ लाख रोजगार क्षमता असलेले ५०.७८८ उद्योग घटक आहेत. एकूण ९६,६३७ विकसित भूखंडापैकी सुमारे ७२ टक्के भूखंडांचे वाटप उद्योजकांना करण्यात आले.[२०]

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर व जालना पट्ट्यात उद्योगांचा विकास झालेला आहे.

इतरत्र एवढा विकास झाल्याचे दिसत नाही. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर हे मोठे शहर असून, ते १९६० पर्यंत उद्योगांच्या संदर्भात मागासलेलेच होते. मागास प्रदेशाच्या औद्योगिक विकासासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली तेव्हापासून मराठवाड्यातील प्रत्येक तहसील व जिल्ह्याच्या ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना केली गेली. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात औद्योगिक विकास होत असून, छत्रपती संभाजीनगर-जालना हा औद्योगिक पट्टा देशातील बीज उत्पादन कंपनीसाठी प्रसिद्ध आहे. मराठवाडा विभागात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, नांदेड, उस्मानाबाद, हिंगोली व लातूर जिल्ह्यांचा समावेश होतो. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची पहिली औद्योगिक वसाहत छत्रपती

संभाजीनगर येथे एप्रिल १९६३ मध्ये स्थापन झाली. त्यानंतर उद्योगांची वाढती संख्या लक्षात घेऊन सप्टेंबर १९६५ मध्ये छत्रपती संभाजीनगर लगत चिखलठाणा येथे व एप्रिल १९८३ मध्ये वाळूज येथे स्थापन झाली. त्याबरोबरच जिल्ह्यात पैठण येथे सप्टेंबर १९८३ मध्ये तर २००१ च्या दरम्यान शेंद्रा याठिकाणी नव्याने महाराष्ट्र औद्योगिक वसाहत विकसित करण्यात आली.

**छत्रपती संभाजीनगर औद्योगिक वसाहती**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात 'महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ' स्थापनेपूर्वी कोणत्याही प्रकारचे मोठे उद्योग नव्हते. सन १९६२ मध्ये काही उद्योजक एकत्र आले आणि त्यांनी रेल्वे स्टेशन परिसरात सुरू केलेल्या अभियांत्रिकी क्षेत्रातील उद्योगांमुळे शहरात खऱ्या अर्थाने उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली गेली. सन १९६३ मध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील रेल्वे स्टेशन भागात पहिली एमआयडीसी स्थापना झाली. नव्वदच्या दशकात बजाज व व्हिडीओकॉन सारख्या नामांकित कंपन्या येथे आल्या आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये उद्योग क्षेत्राच्या भरभराटीला सुरुवात झाली. नव्वदीच्या दशकात सर्वाधिक वेगाने वाढणारे औद्योगिक शहर असा नावलौकिक मिळवणाऱ्या छत्रपती संभाजीनगरच्या औद्योगिक प्रगतीचा आलेख पुढील तीन दशकांत वाढतच गेला. त्यातूनच छत्रपती संभाजीनगर-पुणे-नाशिक हा उद्योगांचा सुवर्ण त्रिकोण तयार झाला. नवीन उद्योगांच्या विस्तारासाठी छत्रपती संभाजीनगर पसंतीचे शहर ठरू लागले व अल्पावधीतच आशियातील वेगाने वाढणारे औद्योगिक क्षेत्र म्हणून जिल्ह्याची ओळख निर्माण झाली. ऑटोमोबाइल, ऑटो कॅम्पोनंट, ऑटो ॲन्सिलरी, गर्भनिरोधक हब, फार्मा हब आणि मद्यनिर्मिती हब म्हणून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याची नवीन ओळख निर्माण केली आहे. याशिवाय शहराच्या औद्योगिक प्रगतीला भारतातील पहिले ग्रीनफील्ड आणि स्मार्ट औद्योगिक शहर ठरलेल्या औरंगाबाद इंडस्ट्रियल टाऊनशिप लिमिटेड (एआयटीएल) म्हणजेच 'ऑरिक'चे बळ मिळाले.

स्वातंत्र्यपूर्व काळातील छत्रपती संभाजीनगरची औद्योगिक प्रगती समाधानकर होती. मात्र मध्यंतरी निजामकालीन राजवटीत छत्रपती संभाजीनगर औद्योगिक प्रगती मंदावल्याचे दिसून येते. सन १९४७ भारत स्वातंत्र्यानंतर, हैद्राबाद संस्थान (मराठवाडा) १७ सप्टेंबर १९४८ म्हणजेच छत्रपती संभाजीनगर स्वतंत्र झाले व निजामी राजवटीतून मराठवाड्याची जनता मुक्त झाली. भाषावार प्रांतरचनेनुसार १ मे १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. सन १९६०-६१ मध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कारखाने ११४ नोंदणीकृत कारखाने होते आणि यातून जवळपास ६,३०५ लोकांना रोजगार मिळत असल्याचे दिसून येते.[२१]

**जालना**

जालना जिल्ह्यात जालना येथे एप्रिल १९६४ मध्ये तर ऑगस्ट १९७७ च्या दरम्यान जालन्यालगत नव्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची औद्योगिक वसाहत विकसित करण्यात आली. त्यानंतर भोकरदन (मे १९९१), जाफराबाद (डिसेंबर १९९६), अंबड (जुलै १९९७) आणि परतून (फेब्रुवारी १९९८) याप्रमाणे औद्योगिक वसाहती विकसित करण्यात आल्या.

**हिंगोली**

मेंढ्यांपासून लोकर मिळवून लोकरीपासून घोंगड्या विणण्याचा उद्योग हिंगोली येथे चालतो. कळमनुरी तालुक्यातील डोंगरकडा येथेही हातमागावर कापड विणले जाते. वसमत तालुक्यात रेशीम किडे जोपासण्याचा उद्योग चालतो. कातडी कमावणे व त्यापासून वस्तू तयार करण्याचा व्यवसाय हिंगोली येथे चालतो. हिंगोली, वसमत, कळमनुरी, सेनगाव व औंढा नागनाथ या ठिकाणी जिनिंग व प्रेसिंग कारखाने आहेत. हिंगोली येथे पाईपचा कारखाना आणि वसमत येथे प्लायवूडचा कारखाना आहे.

सन २००८-०९ मध्ये जिल्ह्यात नोंदणीकृत चालू कारखान्यांची संख्या ८१ होती. कामगार संख्या २६५९ एवढी होती. साखर कारखाने ३ तर सूतगिरण्यांची संख्या १ एवढी होती.

**बीड**

औद्योगिकदृष्ट्या बीड जिल्हा अविकसित जिल्हा समजला जातो. परळी आणि बीड तालुक्यात सूतगिरण्या आहेत. परळी औष्णिक वीज केंद्र आहे. परळी, बीड, आंबेजोगाई तालुक्यात तेलगिरण्या आहेत. वडवणी आणि बीड येथे रासायनिक पदार्थ, प्लास्टिक वस्तू तयार करण्याचे कारखाने आहेत. बीड येथे एमआयडीसीच्या औद्योगिक वसाहती आहेत. बीड जिल्ह्यात बीड येथे सप्टेंबर १९७१ मध्ये तर जानेवारी १९९८च्या दरम्यान आष्टी येथे औद्योगिक वसाहती विकसित करण्यात आल्या. सन २००८-०९ मध्ये जिल्ह्यात नोंदणीकृत चालू कारखान्यांची संख्या ८७ होती. कामगार संख्या ४७४५ एवढी साखर कारखाने ८ तर सूतगिरण्यांची संख्या ६ एवढी होती.

**परभणी**

जिल्ह्याचे क्षेत्रफळ ६,२१४ चौ. कि. मी. म्हणजेच राज्याच्या २ टक्के एवढे आहे. जिल्ह्यातील प्रमुख पिके कापूस, ज्वारी, हरभरा, ज्वारी, सोयाबीन, हिरवे हरभरे, काळे हरभरे आणि कुतिराचे वाटाणे इ. जिल्ह्याचा जीडीपी राज्याच्या जीडीपीच्या १.६५ टक्के एवढा आहे.

परभणी जिल्ह्यात परभणी येथे सप्टेंबर १९७६ मध्ये आणि हिंगोली येथे नोव्हेंबर १९८८ मध्ये, कळमनुरी येथे नोव्हेंबर १९९२, वसमत येथे मार्च १९९३ व गंगाखेड येथे मार्च १९९६ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहती विकसित करण्यात आल्या.

औद्योगिकदृष्ट्या मागासलेला जिल्हा आहे. जिल्ह्यात ८४ लघुउद्योग कार्यरत असल्याचे दिसून येते. जिल्ह्यात कापूस उद्योग आणि दूध उद्योगाला मोठा वाव असून डाळ मिल, रवा गिरण्या मोठ्या प्रमाणात दिसून येतात.

**नांदेड**

नांदेड जिल्ह्यात नांदेड येथे जून १९७० मध्ये, देगलूर येथे ऑगस्ट १९९२ मध्ये, कंधार येथे जानेवारी १९९३ मध्ये तर कुशनूर नांदेड येथे नोव्हेंबर १९९८ याप्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहती विकसित करण्यात आल्या. नांदेड, कुंडलवाडी, धर्माबाद, मुखेड, कंधार आणि देगलूर येथे हातमाग उद्योग आहेत. तसेच खादी टेरीकॉट उद्योगही आहेत. किनवट, नांदेड, देगलूर कंधार, तासमा येथे जिनिंग व प्रेसिंग मिल आहेत. नांदेड येथे सूतगिरणी आणि टेक्स्टाईल मिल आहेत. नांदेड, देगलूर, कंधार, हदगाव, भोकर, मुखेड येथे एमआयडीसीच्या औद्योगिक वसाहती आहेत.

सन २००८-०९ मध्ये जिल्ह्यात नोंदणीकृत चालू कारखान्यांची संख्या २०३ होती. कामगार संख्या २१८० एवढी होती. साखर कारखाने ७ तर सूतगिरण्यांची संख्या ४ एवढी होती.

**लातूर**

लातूर हे जिल्ह्यातील औद्योगिक केंद्र आहे. लातूर, उदगीर, अहमदपूर व चाकूर येथे कापूस कारखाने आहेत. लातूर, उदगीर, औसा येथे तेल गाळप उद्योग मोठ्या प्रमाणावर चालतो. लातूर, उदगीर, औसा व मुरूड येथे हातमाग यंत्रमाग उद्योग मोठ्या प्रमाणावर चालतो. लातूर, उदगीर व लामजना येथे कातडी कमविण्याचा उद्योग असून या परिसरात मोठ्या प्रमाणावर स्टिल व पितळेची भांडी बनविण्याचे कारखाने आहेत. उदगीर येथे दुधापासून भुकटी तयार करण्याचा प्रकल्प आहे.

लातूर जिल्ह्यात लातूर येथे सप्टेंबर १९७६ मध्ये, निलंगा (ऑगस्ट १९९३), औसा (मार्च १९९५) व अहमदपूर येथे (ऑक्टोबर १९९६) तर नव्याने लातूरसंलग्न याठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास

महामंडळाच्या औद्योगिक वसाहती विकसित करण्यात आल्या. सन २००८ मध्ये जिल्ह्यात नोंदणीकृत चालू कारखान्यांची संख्या ९८ होती. कामगार संख्या १२९६ एवढी होती. साखर कारखाने १२ तर सूतगिरण्यांची संख्या २ एवढी होती.

**उस्मानाबाद जिल्हा**

उस्मानाबाद जिल्हा औद्योगिकदृष्ट्या अप्रगत गणला जातो. जिल्ह्यात उस्मानाबाद तालुक्यात ढोकी व तुळजापूर तालुक्यात तामलवाडी येथे सूतगिरणी आहे. परांडा, भूम व कळंब येथे दूध शीतकरण केंद्र आहेत. परांडा तालुक्यात चांदणी येथे मत्सबीज उत्पादन केंद्र आहे. उस्मानाबाद तालुक्यात तेरणानगर व तुळजापूर तालुक्यात नळदुर्ग येथे सहकारी साखर कारखाने आहेत. जिल्ह्यातील एकमेव औद्योगिक वसाहत उस्मानाबाद शहरात आहे. सन २००८-०९ मध्ये जिल्ह्यात नोंदणीकृत चालू कारखान्यांची संख्या ३७ होती. कामगार संख्या १३९३ एवढी होती. साखर कारखाने ११ तर सूतगिरण्यांची संख्या ४ एवढी होती.

**समारोपः**

औद्योगिकीकरणाचे महत्त्व लक्षात घेता भारतासारख्या विकसनशील राष्ट्राला विकसित राष्ट्र करण्यासाठी औद्योगिकीकरण महत्त्वाची भूमिका बजावत आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापनेपासून मराठवाडा व महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात उद्योगांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करत आहे. यामुळे उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्मिती होऊन राज्याच्या आर्थिक, सामाजिक प्रगतीत मोलाचे योगदान औद्योगिक क्षेत्र देत आहे.

महाराष्ट्राच्या औद्योगिक विकास महामंडळाचा मुख्य उद्देश म्हणजेच महाराष्ट्राचा समतोल औद्योगिक विकास हा असून, यात काही प्रमाणात महामंडळाला यश आल्याचे दिसून येते. मराठवाड्याचा औद्योगिक क्षेत्राचा विचार केल्यास, छत्रपती संभाजीनगर जिल्हा सोडता इतर जिल्ह्यात औद्योगिक विकास दिसून येत नाही. म्हणजेच केंद्र आणि राज्यशासन व एमआयडीसी आणि इतर औद्योगिक विकास संस्था उद्योगांसाठी विविध सोयी, सवलती व सुविधा देऊन देखील महाराष्ट्र आणि मराठवाड्यात असमतोल औद्योगिक विकास झाल्याचे दिसून येते.

**संदर्भः**


१. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल २०२२-२३, पृ. १.

२. Report of the Indian Industrial Commission 1916-1918, Cornell University Library, 2010, pp. 98.

३. वार्षिक अहवाल २०१९-२०, भारत सरकार सांख्यिकी आणि कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय, न्यू दिल्ली, पृ. १०१.

४. लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, ऑक्टोबर २०१२, पृ. १०.

५. डॉ. श्रीकांत कारलेकर, महाराष्ट्राचा भूगोल, डायमंड प्रकाशन, पुणे, पृ. १३२.

६. महाराष्ट्राची अर्थिक पाहणी अहवाल, २०२२-२३, पृ. १५९.

५. An Outline of Activites MIDC (G.O.M. Undertaking) Public Relations Dividion, MIDC, Bombay, 1985, pp.02.

८. Ravidra Kuma Sharam, Indstrial Development of India in Pre and Post Reform Period, IOSR Journal of Humanites And Social Science, volume 19, Isser 10, 2014, pp. 1-2.

९. Ravidra Kuma Sharam, Indstrial Development of India in Pre and Post Reform Period, IOSR Journal of Humanites And Social Science, volume 19, Isser 10, 2014, pp. 1-2.

१०. डॉ. कोडेवार यू.बी., 'औद्योगिक अर्थशास्त्र' शोभाभारती प्रकाशन, अहमदपूर, पृ. ३४२.
११. Devid Rogers, "Industrialisation, Income, Benefits and the Rural community", Rural Socioligy, Vol. 43, No.2, pp. 250-264.
१२. Economic Survey of Maharashtra 2022-23 p.p 3.
१३. Economic Survey of Maharashtra 2021-22 p.p 143.
१४. Directorate of Industries, GoM, 2021-22.
१५. डॉ. सुमित्रा पवार, औद्योगिक अर्थशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २०१९, पृ. १३, १४.
१६. Annual Report 2019-20, Government of India, Ministry of Statistics and Programme Imlementation, New Delhi, P. 103.
१७. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल २०२२-२३, पृ. ९.
१८. लिमन एम. एस, वाडेकर पी. एस., व्यवसाय पद्धती आणि समाज, शेठ पब्लिकेशन, मुंबई, पृ. ६ ते १२.
१९. Law B.C., Hishtorical Geography of Aciant India, Paris, Society Asiatic De Paris, 1954. P. 21
२०. डॉ. दिलीप पांढरपट्टे, लोकराज्य अंक ४, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, नोव्हेंबर २०२०, पृ. क्र. ५५-५२, http://dgipr.maharashtra.gov.in
२१. District Census Handbook, Aurangabad, Census of India 1961, The Director, Government Printing and Stationery, Maharashtra State, Bombay, 1964, PP. 45.

◆

## निवेदन - अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना आवाहन करण्यात येते की, अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखांवर आपण ५० ते १०० शब्दांची आपली प्रतिक्रिया संपादकांकडे पाठवावी. याबरोबरच आपण अर्थशास्त्रीय विनोदी चुटकुले तसेच अर्थशास्त्रीय प्रबोधनात्मक लहान गोष्टी देखील पाठवू शकता. निवडक योग्य प्रतिक्रिया, अर्थशास्त्रीय विनोदांना व प्रबोधनात्मक अर्थशास्त्रीय गोष्टींना अर्थसंवाद मधून प्रसिद्धी देण्यात येईल.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# लाभांशाच्या चक्रव्युहात सहकारी बँकांचे भागधारक

**विजय मारुती कुंभार** †

**प्रस्तावना :**

भारतातील सहकारी बँकिंग क्षेत्रामध्ये विविध प्रकारच्या सहकारी बँकांचे अस्तित्व असल्याचे दिसून येते. विशेषतः बँकिंग या प्रवर्गामध्ये येणाऱ्या राज्य सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व नागरी सहकारी बँका तथा प्राथमिक सहकारी बँकांचा समावेश होतो. नागरी सहकारी बँकांमध्ये सर्वसाधारण सभासदांच्या नागरी सहकारी बँका व पगारदार नोकरांच्या नागरी सहकारी बँका असे दोन महत्त्वाचे प्रकार असल्याचे दिसून येते. देशातील नागरी सहकारी बँका, भारतीय बँकिंग नियमन कायदा १९४९ मधील कलम २३ मधील तरतुदीनुसार, भारतीय रिझर्व्ह बँकेकडून बँकिंगचा परवाना प्राप्त करतात व त्यानुसार देशात बँकिंग व्यवसाय करताना दिसून येतात. नागरी सहकारी बँकांमध्ये देखील प्रामुख्याने शेड्युल्ड नागरी सहकारी बँका व नॉन शेड्युल्ड नागरी सहकारी बँका त्याबरोबरच एकल राज्य नागरी सहकारी बँका व बहुराज्य नागरी सहकारी बँका तसे दोन प्रकार असल्याचे ज्या बँकांचा समावेश भारतीय रिझर्व्ह बँक कायदा १९३४ मधील शेड्युल्ड दोन मध्ये करण्यात आलेला असतो, त्यांना शेड्युल्ड बँक तर उर्वरित बँकांना नॉन शेड्युल्ड सहकारी बँक असे म्हटले जाते. सप्टेंबर २०२३ मधील माहितीनुसार, देशात ५१ शेड्युल्ड नागरिक सहकारी बँका कार्यरत आहेत. यामधील बहुतांश बँका महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँका आहेत. उदाहरणार्थ, भारतीय सहकारी बँक लिमिटेड, कॉसमॉस सहकारी बँक लिमिटेड, डोंबिवली नागरी सहकारी बँक लिमिटेड, कल्याण जनता सहकारी बँक लिमिटेड, शामराव विठ्ठल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, राजारामबापू सहकारी बँक लिमिटेड, प्रवरा सहकारी बँक लिमिटेड इत्यादींचा समावेश होतो. याव्यतिरिक्त भारतात सध्या १९४९ शेड्युल्ड नागरी सहकारी बँका कार्यरत आहेत.

**संशोधन पद्धती, तथ्ये व उद्देश :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी आवश्यक माहिती व सांख्यिकी सहकारी बँकेच्या वार्षिक अहवालातून घेण्यात आलेली असून, सदर विश्लेषण हे प्राथमिक माहिती व दुय्यम माहितीवर आधारित आहे. प्रस्तुत निबंधातील विश्लेषण आणि निष्कर्ष हे सांख्यिकीय माहितीबरोबरच या बँकेचे सभासद, अधिकारी, कर्मचारी आणि संचालक यांच्याशी केलेल्या चर्चेवर आधारित असून

† सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा, घटक महाविद्यालय, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा ४१५००१
आजीव सभासद क्र. १२८६, भ्रमणध्वनी : ९८६०१७६०५९, ई-मेल : kumbharvm@gmail.com

सांख्यिकीय विश्लेषणाचा कालावधी सन २०१३-१४ ते २०२२-२३ हा आहे.

१. विश्लेषण कालावधीत नमुना बँकेने केलेल्या प्रगतीचा आढावा घेणे.
२. विश्लेषण कालावधीत नमुना बँकेने भरलेल्या उत्पन्नकाराचे व दिलेल्या लाभांशाचे विश्लेषण करणे.
३. सहकाराची उद्दिष्ट्ये व प्रस्तुत सहकारी बँकिंग व्यवसाय यातील द्वंद्व अभ्यासणे.
४. प्रस्तुत सहकारी बँकेच्या सभासद हितासाठी शिफारशी करणे.

**सहकारी बँकिंग व्यवसाय :**

भारतातील नागरी सहकारी बँकांमध्ये पगारदार नोकरांच्या सहकारी बँका या एक वैशिष्ट्यपूर्ण नागरी सहकारी बँका असून, या बँका विशिष्ट क्षेत्रातील किंवा विशिष्ट संघटनामधील पगारदार नोकरांच्या आर्थिक व सामाजिक कल्याणासाठी कार्यरत असणाऱ्या वित्तीय संस्था असतात. या संस्था केवळ विशिष्ट प्रकारच्या व्यक्तींनाच आपल्या बँकेचे सभासदत्व देतात. तसेच त्यांनाच विविध प्रकारच्या बँकिंग सेवासुविधा उपलब्ध करून देत असतात (Siddaraju, 2012), (Stoop et al 2021). विशेषतः महाराष्ट्रात अशा प्रकारच्या पगारदार नोकरांच्या सहकारी बँकांची संख्या सर्वाधिक असल्याचे दिसून येते.

तक्ता क्र.१ वरून असे दिसून येते की, नमुना बँकेची सभासद संख्या, भांडवल, ठेवी, कर्जवाटप आणि लाभांश याबाबतची माहिती मिळते. शासकीय पदभरती कमी असल्याने, कायम सेवकांची संख्या सतत कमी होत असल्याने, नवीन सभासद होणाऱ्यांचे कमी प्रमाण आणि निवृत्त होणाऱ्या सेवकांची संख्या अधिक असल्याने, सदर बँकेची सभासद संख्या कमी होत असली, तरी आर्थिक स्थिती मात्र दिवसेंदिवस उत्तम होत असून, बँकेच्या मालमत्तेत व आर्थिक उलाढालीत सतत वाढ होत आहे.

**तक्ता क्र. १ नमुना बँकेचे, सभासद, भांडवल, ठेवी, कर्जे व लाभांश**
**(रक्कम लाख रु. मध्ये)**

| अ.न. | वर्ष | सभासद | भागभांडवल | ठेवी | कर्जे | लाभांश |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०१३-१४ | १३०८१ | ३६८४ | ६९०५२ | ५०३२५ | ११.२५ |
| २ | २०१४-१५ | १२८६२ | ४१६६ | ७६९७० | ५७५५७ | ११.०० |
| ३ | २०१५-१६ | १२६२३ | ४५८२ | ८२७०७ | ६३२६४ | ११.२५ |
| ४ | २०१६-१७ | १२३०५ | ४८३५ | ९२२०५ | ६४१८० | ११.५० |
| ५ | २०१७-१८ | ११८७८ | ५०६३ | ९६०१५ | ६५३२८ | ११.७५ |
| ६ | २०१८-१९ | ११४९२ | ५२७१ | १०२५५४ | ६६०३९ | ११.७५ |
| ७ | २०१९-२० | ११११२१ | ५७४४ | ११४३२० | ७१७०९ | १.७५* |
| ८ | २०२०-२१ | १०५८९ | ६१०४ | १२७२८२ | ७८१५७ | ११.७५ |
| ९ | २०२१-२२ | १०२५८ | ६५०४ | १२९५४३ | ८४६७५ | ११.०० |
| १० | २०२२-२३ | ९९१० | ६९९४ | १३२६५३ | ९३३४८ | १२.५० |

संदर्भ : दि रयत सेवक को ऑपरेटीव्ह बँक लि. सातारा या बँकेचे वार्षिक अहवाल.

*लाभांश रक्कम रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार राखीव निधीत वर्ग करण्यात आलेली आहे.

**बँकेचा नफा व लाभांश :**

सहकारी संस्था या प्रामुख्याने सभासदांचे आर्थिक व सामाजिक कल्याण साध्य करण्यासाठी स्थापन झालेल्या संस्था असतात. या संस्थांच्या माध्यमातून सभासदांना आवश्यक असणाऱ्या सेवासुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. विशेषतः सहकारी बँकांनी आपल्या सभासदांना कमीत कमी व्याजदराने कर्जपुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात व त्यांचे आर्थिक व सामाजिक कल्याण साध्य करावे, हा मुख्य हेतू आहे (Stoop et al 2021); परंतु अलीकडील काळात बँकिंग क्षेत्रातल्या स्पर्धेमुळे सहकारी बँकादेखील नफेखोरीकडे वळत असल्याचे दिसून येत आहे. डेन्मार्क, स्पेन, नॉर्वे, इटली, फ्रान्स इत्यादी युरोपियन सहकारी बँकांमध्ये अशी नफेखोरी दिसून येत नाही (Ayadiet al 2010). तथापि, राष्ट्रीयकृत व खाजगी बँकांनी मिळवलेला नफा आणि सहकारी बँकांनी मिळवलेल्या नफा यामध्ये खूप मोठा फरक आहे. कारण इतर बँका आपल्या भागधारकांबरोबरच इतर ग्राहकांनाही कर्जपुरवठा करत असतात (Sangappaet al 2023). मात्र सहकारी बँकांमध्ये बँकेचे भागधारक म्हणजे बँकेचे अंशात्मक मालक असतात. अशा कर्जदारांच्या खिशातून अधिक व्याज रक्कम काढून घेणे आणि बँकेचा नफा वाढवणे म्हणजे हे एक प्रकारचे आर्थिक शोषणच आहे (Majee and Hoyt, 2010, Ayadiet al 2010); परंतु सहकार क्षेत्रातील सभासदांचे अज्ञान व व्यवस्थापनाचे दुर्लक्ष आणि धोरणकर्त्यांच्या निष्काळजीपणामुळे सहकार क्षेत्रात अशा प्रकारची नफेखोरी वाढत आहे. ज्यामधून सभासदांचे आर्थिक कल्याण साध्य होत नाही. याउलट त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे (Elorza, & Garmendia, 2021, Trento, S., & Catturani, I. (2010).

विशेषतः सहकारी बँकांमधील सभासदांकडून अधिक अधिक लाभांशाची अपेक्षा केली जाते. मात्र आपल्या बँकेकडून अधिक लाभांशाची अपेक्षा करणे म्हणजे हा आपलाच आत्मघात आहे (Ayadiet al 2010, Jones et al 2016), याबाबतची जाणीव सभासदांच्यामध्ये नसल्याचे दिसून येत आहे (Siddaraju, 2012). कारण बँकेकडून दिला जाणारा लाभांश हा त्याच बँकेच्या सभासदांना दिलेल्या विविध प्रकारच्या कर्जावरील व्याज उत्पन्नाचाच भाग असतो. सभासदांच्या खिशातून शंभर रुपये इतकी व्याजाची रक्कम काढून घेतली असता ते बँकेचे उत्पन्न होते व त्या उत्पन्नामधून खर्च वजा जाता जो निव्वळ नफा शिल्लक राहातो, त्या निव्वळ नफ्यावर शासनास बँकेला ३० टक्के बँक इन्कम टॅक्स भरावा लागतो आणि त्यामधून उरलेल्या ७० रुपयांमधूनच राखीव निधी, धर्मादाय निधी, आकस्मिक निधी, शैक्षणिक निधी, निवडणूक निधी, प्रशिक्षण निधी, इतर निधी व लाभांश या तरतुदी कराव्या लागत असतात. याचाच अर्थ असा होतो की, लाभांश व राखीव निधीसाठी ७० रुपये इतका निधी जमवण्यासाठी सभासदांच्या खिशातून शंभर रुपये काढावे लागतात. या बाबीवरती सहकार क्षेत्राचे व्यवस्थापन गांभीर्याने विचार करत नाही व त्याबाबत सभासदांचे प्रबोधन करत नाही, असे दिसून येते.

उदा. बँकेस १०० कोटी रु. निव्वळ नफा झाल्यास त्यातील ३० कोटी रु. इन्कम टॅक्स भरावा लागतो आणि उर्वरित ७० कोटी रुपयांमधून किमान २५% राखीव निधी काढून राहिलेली रक्कमच लाभांशासाठी विचारात घेता येऊ शकते. असे असले तरी राहिलेल्या ७० कोटीमध्ये फक्त लाभांश नसतो, तर १% टक्का धर्मादाय देणगी आणि इतर प्रकारच्या निधींची तरतूद द्यावी लागते आणि उर्वरित निव्वळ नफ्याचा वापर लाभांशासाठी व अन्य निधीसाठी वापरता येऊ शकते.

**तक्ता क्र. २ वास्तविक स्थूल नफा व स्पष्टीकरणासाठी कमी केलाला स्थूल नफा**

**(रक्कम लाख रु. मध्ये)**

| वर्ष | स्थूल नफा | भरलेला आयकर | स्पष्टीकरणासाठी कमी केलेला स्थूल नफा | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ९५% | ९०% | ८५% | ८०% | ७५% |
| २०१३-१४ | १०१७.४० | ३९०.२४ | ९६६.५३ | ९१५.६६ | ८६४.७९ | ८१३.९२ | ७६३.०५ |
| २०१४-१५ | ११८६.५३ | ४६२.०७ | ११२७.२० | १०६७.८८ | १००८.५५ | ९४९.२२ | ८८९.९० |
| २०१५-१६ | १२९४.४९ | ४२०.०५ | १२२९.७७ | ११६५.०४ | ११००.३२ | १०३५.५९ | ९७०.८७ |
| २०१६-१७ | १६४५.०७ | ५७१.७० | १५६२.८२ | १४८०.५६ | १३९८.३१ | १३१६.०६ | १२३३.८० |
| २०१७-१८ | २०४३.८२ | ४७०.०० | १९४१.६३ | १८३९.४४ | १७३७.२५ | १६३५.०६ | १५३२.८७ |
| २०१८-१९ | १५५०.०३ | ५३०.०० | १४७२.५३ | १३९५.०३ | १३१७.५३ | १२४०.०२ | ११६२.५२ |
| २०१९-२० | १७७३.७६ | ६०९.५० | १६८५.०७ | १५९६.३८ | १५०७.७० | १४१९.०१ | १३३०.३२ |
| २०२०-२१ | १७७७.६३ | ५२०.०० | १६८८.७५ | १५९९.८७ | १५१०.९९ | १४२२.१० | १३३३.२२ |
| २०२१-२२ | २५५६.५१ | ६२७.५० | २४२८.६८ | २३००.८६ | २१७३.०३ | २०४५.२१ | १९१७.३८ |
| २०२२-२३ | २५७६.१२ | ६५०.०० | २४४७.३१ | २३१८.५१ | २१८९.७० | २०६०.९० | १९३२.०९ |
| एकूण | १७४२१.३६ | ५२५१.०६ | १६५५०.२९ | १५६७९.२२ | १४८०८.१६ | १३९३७.०९ | १३०६६.०२ |

संदर्भ : दि रयत सेवक को ऑपरेटीव्ह बँक लि. सातारा या बँकेचे वार्षिक अहवाल.

**निव्वळ नफा आणि बँकेला भरावा लागणारा आयकर :**

तक्ता २ मध्ये नमुना सहकारी बँकेला मागील दहा वर्षांत त्या-त्या आर्थिक वर्षात प्राप्त झालेला वास्तविक स्थूल नफा दिलेला आहे, तर स्पष्टीकरणासाठी कमी केलेल्या स्थूल नफ्यामध्ये हा वास्तविक नफा न वाढवता कर्जाचे व्याजदर कमी करून नफा कमी ठेवला असता, तर नेमकी काय परिस्थिती राहिली असती याचे विवेचन देण्यात आलेले आहे. त्याकरिता हा नफा ५%, १०%, १५%, २०% व २५% कमी केला असता तर या बँकेला किती इन्कम टॅक्स भरावा लागला असता व किती रक्कम वाचू शकली असती, याचे विवेचन देण्यात आलेले आहे.

तक्ता क्र. ३ वरून असे दिसून येते की, या बँकेने त्या त्या आर्थिक वर्षात दर्शविलेल्या निव्वळ नफ्यावर भरलेला आयकर हा एकूण ५२.२१ कोटी इतका आहे. म्हणजे सन २०१३-१४ ते २०२२-२३ या कालावधीत लाभांश देण्यासाठी आपल्या स्थूल व निव्वळ नफ्यात वाढ दाखवलेली असून, प्रत्येक वर्षी वाढीव बँक इन्कम टॅक्स भरावा लागलेला आहे. सन २०१३-१४ मध्ये ३.९० कोटी रु. तर सन २०२२-२३ मध्ये ६.५ कोटी रु. इन्कम टॅक्स भरलेला आहे. सदर रक्कम ही शासन दरबारी भरण्यात आलेली असली, तरी या बँकेच्या विविध कर्जदारांना दिलेल्या कर्जावरील व्याज उत्पन्नातून मिळालेली ही रक्कम असून सदर रक्कम शासनास टॅक्स रूपाने भरण्यात आलेली असल्याचे दिसून येते. अर्थात, बँकेला नफा झाला असता शासकीय नियमानुसार इन्कम टॅक्स भरणे हे आवश्यक असते. परंतु सहकारी बँक ही नफ्यावर लक्ष केंद्रित करणारी वित्तीय संस्था असू नये, तर ती सभासद कल्याणाचा विचार करणारी संस्था असावी, तिचे मुख्य ध्येय अधिकाधिक नफा मिळवणे हे असू नये, तर सभासदांचे जास्तीत जास्त आर्थिक हित साध्य करणे, त्यांना कमीत कमी व्याजदराने कर्जसुविधा उपलब्ध करून देणे हे असावे. याचा अर्थ,

**तक्ता क्र. ३ वास्तविक स्थूल नफा व स्पष्टीकरणासाठी कमी केलेला स्थूल नफ्यावरील देय आयकर**
**(रक्कम लाख रु. मध्ये)**

| वर्ष | स्थूल नफ्यावर भरलेला आयकर | स्पष्टीकरणासाठी कमी केलेल्या स्थूल नफ्यावरील देय आयकर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ९५% | ९०% | ८५% | ८०% | ७५% |
| २०१३-१४ | ३९०.२४ | ३७०.७३ | ३५१.२२ | ३३१.७० | ३१२.१९ | २९२.६८ |
| २०१४-१५ | ४६२.०७ | ४३८.९७ | ४१५.८६ | ३९२.७६ | ३६९.६६ | ३४६.५५ |
| २०१५-१६ | ४२०.०५ | ३९९.०५ | ३७८.०५ | ३५७.०४ | ३३६.०४ | ३१५.०४ |
| २०१६-१७ | ५७१.७० | ५४३.१२ | ५१४.५३ | ४८५.९५ | ४५७.३६ | ४२८.७८ |
| २०१७-१८ | ४७०.०० | ४४६.५० | ४२३.०० | ३९९.५० | ३७६.०० | ३५२.५० |
| २०१८-१९ | ५३०.०० | ५०३.५० | ४७७.०० | ४५०.५० | ४२४.०० | ३९७.५० |
| २०१९-२० | ६०९.५० | ५७९.०३ | ५४८.५५ | ५१८.०८ | ४८७.६० | ४५७.१३ |
| २०२०-२१ | ५२०.०० | ४९४.०० | ४६८.०० | ४४२.०० | ४१६.०० | ३९०.०० |
| २०२१-२२ | ६२७.५० | ५९६.१३ | ५६४.७५ | ५३३.३८ | ५०२.०० | ४७०.६३ |
| २०२२-२३ | ६५०.०० | ६१७.५० | ५८५.०० | ५५२.५० | ५२०.०० | ४८७.५० |
| एकूण | ५२५१.०६ | ४९८८.५१ | ४७२५.९५ | ४४६३.४० | ४२००.८५ | ३९३८.३० |
| मूळ आयकर | ५२५१.०६ | ५२५१.०६ | ५२५१.०६ | ५२५१.०६ | ५२५१.०६ | ५२५१.०६ |
| आयकर बचत | ०.०० | -२६२.५५ | -५२५.११ | -७८७.६६ | -१०५०.२१ | -१३१२.७७ |

संदर्भ : दि रयत सेवक को ऑपरेटीव्ह बँक लि. सातारा या बँकेचे वार्षिक अहवाल.

असा होत नाही की सहकारी बँकांनी नफा मिळवूच नये. नफा मिळवण्यासाठी इतर अनेक मार्ग उपलब्ध असतात त्याचा वापर करावा. जसे की, रोखे बाजारात योग्य प्रमाणात गुंतवणूक करून नफा मिळवता येतो. आयुर्विमा, सर्वसाधारण विमा, निधी हस्तांतरण सुविधा इत्यादी मार्गांनी चांगले उत्पन्न मिळवता येते, त्याचा वापर करावा. अन्यथा, व्यापारी बँका आणि सहकारी बँकांमध्ये फरकच राहाणार नाही.

स्पष्टीकरणासाठी कमी केलेल्या स्थूल नफ्यावरील देय आयकर आकडे हे केवळ आभासी असले तरी या आकडेवारीवरून सदर बँकेस करदायित्व कमी करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक होते. मात्र सभासदांकडून सतत होणाऱ्या वाढीव लाभांशाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी स्थूल नफा आणि निव्वळ नफा वाढवण्याच्या प्रयत्नात बँकेचे करदायित्व मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसत आहे. सदर करदायित्वाची रक्कम बँकेच्या उत्पन्नातून गेलेली दिसत असली तरी प्रत्यक्षात हा पैसा सभासदांनी त्यांच्या कर्जावर भरलेल्या व्याज उत्पन्नाचाच भाग आहे, ही बाबदेखील लक्षात घेणे आवश्यक आहे.

**स्थूल नफा कमी झाला असता तर :**

बँकेने नफा महत्तमीकरणापेक्षा सभासदांना दिल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या कर्जावरील व्याजाचे दर कमी करून व्याज उत्पन्न कमी केले असते तर काय घडले असते याबाबतच्या काही शक्यता तक्ता क्र. ४ मध्ये देण्यात आलेल्या आहेत.

**तक्ता क्र. ४ वास्तविक स्थूल नफा व स्पष्टीकरणासाठी कमी केलाला स्थूल नफ्यावरील देय आयकर**
**(रक्कम लाख रु. मध्ये)**

| तपशील | स्थूल नफ्यावर भरलेला आयकर | स्पष्टीकरणासाठी कमी केलाल्या स्थूल नफ्यावरील देय आयकरातील बचत | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ९५% | ९०% | ८५% | ८०% | ७५% |
| २०१३-१४ | २६३.७५ | १९.५१ | ३९.०२ | ५८.५४ | ७८.०५ | ९७.५६ |
| २०१४-१५ | ३०९.९७ | २३.१० | ४६.२१ | ६९.३१ | ९२.४१ | ११५.५२ |
| २०१५-१६ | ३४६.३३ | २१.०० | ४२.०१ | ६३.०१ | ८४.०१ | १०५.०१ |
| २०१६-१७ | ४४८.३१ | २८.५९ | ५७.१७ | ८५.७६ | ११४.३४ | १४२.९३ |
| २०१७-१८ | ४३०.१५ | २३.५० | ४७.०० | ७०.५० | ९४.०० | ११७.५० |
| २०१८-१९ | ४५०.०१ | २६.५० | ५३.०० | ७९.५० | १०६.०० | १३२.५० |
| २०१९-२० | ४७९.७८ | ३०.४८ | ६०.९५ | ९१.४३ | १२१.९० | १५२.३८ |
| २०२०-२१ | ४५९.७९ | २६.०० | ५२.०० | ७८.०० | १०४.०० | १३०.०० |
| २०२१-२२ | ५७५.४० | ३१.३८ | ६२.७५ | ९४.१३ | १२५.५० | १५६.८८ |
| २०२२-२३ | ६०६.८३ | ३२.५० | ६५.०० | ९७.५० | १३०.०० | १६२.५० |
| आयकराची बचत | ५२५१.०६ | २६२.५५ | ५२५.११ | ७८७.६६ | १०५०.२१ | १३१२.७७ |

संदर्भ : दि रयत सेवक को ऑपरेटीव्ह बँक लि. सातारा या बँकेचे वार्षिक अहवाल.

- वास्तविक, स्थूल नफ्यावर भरलेला आयकर जास्तीत जास्त लाभांश देण्यासाठी बँकेच्या स्थूल नफ्यामध्ये वाढ केलेली आहे. त्यामुळे बँकेने विश्लेषणाच्या १० वर्षांच्या कालावधीत एकूण ५२ कोटी २१ लाख रुपये इतका बँक आयकर भरलेला आहे.
- स्थूल नफा ५% नी कमी केला असता तर बँकेने आपला निव्वळ नफा पाच टक्क्यांनी कमी केला असता तर २०१३-१४ ते २०२२-२३ या कालावधीत द्यावा लागणारा आयकर रु. ४९ कोटी ८८ लाख झाला असता. म्हणजेच एकूण आयकरात २ कोटी ६२ लाख रुपयाची बचत झाली असती.
- स्थूल नफा १०% नी कमी केला असता तर बँकेने आपला निव्वळ नफा पाच टक्क्यांनी कमी केला असता तर २०१३-१४ ते २०२२-२३ या कालावधीत द्यावा लागणारा आयकर ४७ कोटी २५ लाख रुपये झाला असता म्हणजेच एकूण आयकरात ५ कोटी २५ लाख रुपयांची बचत झाली असती.
- स्थूल नफा १५% नी कमी केला असता तर बँकेने आपला निव्वळ नफा पाच टक्क्यांनी कमी केला असता तर २०१३-१४ ते २०२२-२३ या कालावधीत द्यावा लागणारा आयकर ४४ कोटी ६३ लाख रुपये झाला असता म्हणजेच एकूण आयकरात ७ कोटी ८७ लाख रुपयांची बचत झाली असती.
- स्थूल नफा २०% नी कमी केला असता तर बँकेने आपला निव्वळ नफा पाच टक्क्यांनी कमी केला असता तर २०१३-१४ ते २०२२-२३ या

कालावधीत द्यावा लागणारा आयकर ४२ कोटी रुपये झाला असता म्हणजेच एकूण आयकरात १० कोटी ५० लाख रुपयांची बचत झाली असती.

- स्थूल नफा २५% नी कमी केला असता तर बँकेने आपला निव्वळ नफा पाच टक्क्यांनी कमी केला असता तर २०१३-१४ ते २०२२-२३ या कालावधीत द्यावा लागणारा आयकर ३९ कोटी ३८ लाख रुपये झाला असता म्हणजेच एकूण आयकरात १३ कोटी ३२ लाख रुपयांची बचत झाली असती.

**व्याजदर-नफा आणि नफा-लाभांशाचे द्वंद्व :**

सहकारी बँका या प्रामुख्याने आपल्या सभासदांना विविध प्रकारचा कर्जपुरवठा करून व्याज उत्पन्नाच्या माध्यमातून तसेच सभासद व बिगर सभासदांना बँकिंग व वित्तीय सेवासुविधा देऊन त्यावर मिळणाऱ्या बिगर व्याज उत्पन्नातून नफा मिळवत असतात. तथापि, या संपूर्ण उत्पन्नात व्याज उत्पन्नाचा हिस्सा ८०% पेक्षा अधिक असल्याचे दिसून येते. म्हणजेच सहकारी बँकांच्या एकूण नफ्यामध्ये व्याज उत्पन्नाचा हिस्सा सर्वाधिक असल्याचे दिसून येते. याचाच अर्थ असा होतो की, सहकारी बँका आपल्या नफ्यात वाढ करण्यासाठी कर्जावरील व्याजदर जास्तीत जास्त आकारण्याचा प्रयत्न करतात; परंतु त्यामुळे सभासदांचे आर्थिक कल्याण साध्य न होता त्यांचे एक प्रकारे आर्थिक शोषणच होत असल्याचे दिसून येते (Stoop et al 2021).

दुसरीकडे सभासद त्यांच्या आर्थिक बाबीविषयीच्या अज्ञानामुळे सहकारी बँकांनी आपणास जास्तीत जास्त

**तक्ता क्र. ५ व्याजदर-नफा आणि नफा-लाभांशाचे द्वंद्व**

| अ.न. | तपशील | अधिक लाभांशाची मागणी करणारे सभासद (उदा.) | अधिक लाभांशाची मागणी न करणारे सभासद (उदा.) | लाभांशास महत्त्व न देणारे सभासद (उदा.) |
|---|---|---|---|---|
| १ | कर्जावरील व्याजदर | १० | ७ | ६ |
| २ | बँकेचे व्याज उत्पन्न | १०० कोटी रु. | ७० कोटी रु. | ६० कोटी रु. |
| ३ | इतर उत्पन्न | १० कोटी रु. | १० कोटी रु. | १० कोटी रु. |
| ४ | स्थूल नफा | ११० कोटी रु. | ८० कोटी रु. | ७० कोटी रु. |
| ५ | बँक आयकर (३०%) | ३३ कोटी रु. | २४ कोटी रु. | २१ कोटी रु. |
| ६ | निव्वळ नफा | ७७ कोटी रु. | ५६ कोटी रु. | ४९ कोटी रु. |
| ७ | २५% राखीव निधी | १९.२५ कोटी रु. | १४ कोटी रु. | १२.२५ कोटी रु. |
| ८ | १% धर्मादाय निधी | .७७ कोटी रु. | .५६ कोटी रु. | . ४९ कोटी रु. |
| ९ | इतर निधी १०% | ७.७ कोटी रु. | ५.६ कोटी रु. | ४.९ कोटी रु. |
| १० | लाभांशासाठी शिल्लक रक्कम | ४९.२८ | ३५.८४ | ३१.३६ |
| ११ | लाभांश | जास्त | मध्यम | कमी |
| १२ | व्याजाचा भुर्दंड | जास्त | मध्यम | कमी |
| १३ | सभासद हित | अत्यल्प हित | मध्यम हित | जास्त हित |

संदर्भ : दि रयत सेवक को ऑपरेटीव्ह बँक लि. सातारा या बँकेचे वार्षिक अहवाल.

लाभांश द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करत असतात (Majee and Hoyt, 2010) व या अपेक्षेची पूर्तता करण्यासाठी बँकेचे व्यवस्थापन व संचालक मंडळ स्थूल व निव्वळ नफा वाढवण्याचा प्रयत्न करत असतात. कारण निव्वळ नफ्यात वाढ झाल्याखेरीज बँकेच्या सभासदांना अधिकाधिक लाभांश देता येत नाही, त्यामुळे स्थूल नफा वाढवावा लागतो व ही वाढ करण्यासाठी कर्जावरील व्याजदर वाढवले जातात. Mukherjee, (2010); No ordinet al (2012). तक्ता ५ वरून अधिक लाभांशाची मागणी करणारे सभासद व लाभांशास महत्त्व न देणारे सभासद यांच्यातील फरक लक्षात येतो.

**प्रमुख निष्कर्ष :**

प्रस्तुत बँकेच्या १० वर्षांच्या कालावधीतील स्थूल नफा, निव्वळ नफा, व्याज उत्पन्न, करपात्र उत्पन्न आणि भरलेला कर आणि दिलेला लाभांश या सर्व बाबींचा अभ्यास करता पुढील बाबी दिसून येतात.

१. बहुतांश सहकारी बँकांमधील सभासदांना आपणास मिळणारा लाभांश व आपल्यावर तथा आपल्या सभासदावर पडणारा व्याजाचा भुर्दंड याबाबतची पुरेशी माहिती नाही. सहकारी बँकांचे भागधारक आपणास अधिक लाभांश मिळावा, अशी अपेक्षा धरतात. मात्र त्यामुळे भागधारकांचेच किती नुकसान होते, याची त्यांना जाणीव होत नसल्याचे दिसून येते. सहकारी बँकादेखील आपल्या सभासदांचे त्यादृष्टीने प्रबोधन करत नाहीत.

२. सहकारी बँकांच्या सभासदांच्याबाबतीत लाभांश हा आपल्याच सभासदांनी भरलेल्या व्याजातील रक्कम वाढवा म्हणून आपणास प्राप्त होते. मात्र त्यावर अकारण करदायित्व वाढत जाते, याबाबत पुरेशी जाणीव असल्याचे दिसत नाही (Babu & Selkhar (2012); Mallick & Das (2020). भागधारकांच्याकडून व्याज वसूल करून त्यातील ३०% रक्कम कर म्हणून सरकारला भरणे यामध्ये भागधारक कर्जदारांचे हित साध्य होत नाही, याची जाणीव करून देण्याची आवश्यकता आहे.

३. बँकेच्या या १० वर्षांच्या कालावधीत करदायित्व ३.९० कोटी रु. वरून ६.५० कोटी. रु. पर्यंत वाढलेले आहे. सदर रक्कम ही कर्जदार सभासदांनी बँकेस भरलेल्या व्याजातून बँकेस मिळालेल्या उत्पन्नाचाच भाग आहे. जेवढे व्याज अधिक आकारले जाते तेवढा नफा वाढतो आणि जेवढा नफा वाढेल त्यावर ३०% दराने अधिक कर भरावा लागतो.

४. सहकारी बँकांना अधिक लाभांश देण्यासाठी अधिक स्थूल नफा मिळवावा लागतो व त्यावर शासनास ३०% आयकर भरावा लागतो. आयकर भरून शिल्लक राहिलेल्या रकमेतून वैधानिक राखीव निधी (२५%) व धर्मादाय निधी (१%) भरून राहिलेल्या उर्वरित रकमेतून लाभांश वाटपाचा विचार करावा लागतो याची सभासदांना पुरेशी व परिणामकारक माहिती नाही असे दिसते.

५. सहकारी बँका सभासदांना अधिक लाभांश देण्यासाठी अधिक व्याजदराने कर्जे देऊन सभासदांचे आर्थिक शोषण करत आहे (Jones et al 2016). ज्या सहकारी बँकांना अधिक नफा होत आहे त्या बँका आपल्याच सभासदांचे अधिक आर्थिक शोषण करत आहे असे दिसून येते (Trento & Catturani 2010).

६. सहकारी बँकांना आर्थिक वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच प्रत्येक तिमाहीमध्ये व्याज खर्च आणि व्याज उत्पन्न याचा अंदाज येत असतो. त्यानुसार व्याजदर कमी करून नफा मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मात्र तसे होताना दिसत नाही (Sapovadia, 2008).

**शिफारशी व आवश्यक सुधारणा :**

१. सहकारी बँका या सभासदांचे आर्थिक कल्याण साध्य करण्यासाठी कार्यरत असणाऱ्या बँका असल्याने

त्यांनी नफा महत्तमीकरणापेक्षा सभासद हित आणि आर्थिक कल्याण या बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे (Elorza, & Garmendia, 2021, Sangappaet al 2023).

२. सहकारी बँकांचे व्याज उत्पन्न वाजवीपेक्षा वाढत असल्यास कर्जदारांना मध्यावधी कालावधीत व्याजाचा परतावा देऊन किंवा कर्जावरील व्याजदर कमी करून स्थूल नफा नियंत्रित ठेवायला हवा Mukherjee, (2010).

३. सहकारी बँकेतील व्याज परतावा हा केवळ कर्जदारांना मिळतो आणि लाभांश हा सर्व भागधारकांना मिळतो. त्यामुळे व्याज परतावा देण्याबाबत बिगर कर्जदार सभासद नाखूश असतात. मात्र बिगर कर्जदार सभासदांना अधिक लाभांश देण्यासाठी कर्जदार सभासदांची कुचंबणा होते, यावर विचार व्हायला हवा.

४. कर्ज न घेणारा सभासद हा साधारणपणे मध्यम किंवा उच्च उत्पन्न गटातील असतो. मात्र अशा मध्यम व उच्च उत्पन्न गटातील सभासदांना अधिक लाभांश मिळावा म्हणून अल्प उत्पन्न गटातील व गरजू सभासदांचे एक प्रकारे शोषण करणे हे सहकारी तत्त्वास अनुसरून नाही.

५. सहकारी बँकेतील ठेवीवरील व्याज व कर्जावरील व्याज तथा व्याज दुरावा जास्तीत जास्त १.५ ते २.०% असावा त्याहून अधिक व्याज दुरावा ठेवणे हे एक प्रकारे कर्जदार सभासदांचे आर्थिक शोषणच आहे.

६. सहकारी बँकांस एकदम आपला नफा कमी करता येणार नाही. मात्र प्रत्येक वर्षी आपल्या नफ्यात मोठी वाढ होणार नाही, याची काळजी घेण्यास हरकत नाही. कारण जादा नफा म्हणजेच जादा करदायित्व होय. हे दायित्व कमीत कमी राहील, असा प्रयत्न करावयास हवा (Babu, & Selkhar (2012); Mallick & Das (2020). कारण बहुतांश सहकारी संस्थेचे सभासद हे अल्प व मध्यम उत्पन्न गटातील व्यक्ती असतात.

७. सहकारी बँका व व्यापारी बँका यांच्या व्यवसायाच्या स्वरूपात फरक आहे. व्यापारी बँका नफ्यासाठी व्यवसाय करतात, तर सहकारी बँकांनी सभासद कल्याणासाठी व्यवसाय करावा, असे अपेक्षित आहे (Ayadiet al 2010). त्यामुळे सहकारी बँकांनी नफेखोरी करू नये. बँकेच्या सभासदांनी या बाबीस पायबंद घालावा.

**सारांश :**

सहकारी बँका या सामान्य जनतेच्या अर्थवाहिनी आहेत व त्या सामान्य जनतेच्या अर्थविषयक गरजांची पूर्तता करण्याचा प्रयत्न करीत असतात. या घटकांना सामान्य बँका व वित्तीय संस्था योग्य, पुरेसा व वेळेत कर्जपुरवठा करत नाहीत. त्यामुळे हे सर्व नागरिक सहकारी बँका व वित्तीय संस्थांवर अवलंबून असतात. त्यामुळे सहकारी बँकांनी त्यांची आर्थिक पिळवणूक व शोषण करू नये. सहकारी संस्थांमधील सभासदांचे शिक्षण आणि प्रशिक्षण हा नेहमीच वादाचा विषय राहिलेला आहे. साक्षर असणे आणि वित्तीयदृष्ट्या साक्षर असणे यामधील तफावत नेहमीच जाणवत असते. आम्हाला लाभांश जास्त मिळाला पाहिजे हा आग्रह म्हणजे आपणच आपले शोषण करण्यासाठी दिलेली एक प्रकारची सहमतीच असते. कारण जास्त व्याजाने कर्जे दिल्याशिवाय नफा वाढत नाही आणि नफा वाढल्याशिवाय लाभांश वाढत नाही हे सरळ सूत्र आहे. बहुतांश वेळा सहकारी बँकांमधील कर्ज घेणारे आणि कर्ज न घेणारे सभासद असे द्वंद्व असते. कर्ज घेणाऱ्या सभासदास कर्जे स्वस्त मिळवीत आणि लाभांश पण जास्त मिळावा असे वाटते; परंतु हे शक्य नाही. अशा सभासदांना कर्जे स्वस्त हवी असतील तर अधिक दराने लाभांश मिळाला पाहिजे, हा हट्ट सोडला पाहिजे. कर्जे न घेणाऱ्या सभासदांनीदेखील आपल्या शेअर्सवर

बाजारदरापेक्षा थोडा अधिक परतावा मिळत असेल, तर त्यावर समाधान मानायला हवे. कारण अशा सभासदांच्या वाढीव लाभांशाच्या मागणीमुळे आपल्याच बँकेचे कर्जदार सभासदांचे अहित होणार आहे, त्याच्या खिश्यातून काढलेल्या रक्कमेतील ३० टक्के आयकर जाणार आहे आणि उर्वरित रक्कम बँकेत राहील. त्यातून काही रक्कम आपणास लाभांश म्हणून मिळणार आहे, यावर चिंतन करण्याची गरज आहे. 'विना सहकार नाही उद्धार' हे बोधवाक्य सत्यात आणावयाचे असल्यास अधिक लाभांशाचा हव्यास सोडून रास्त व्याजदराने कर्जसुविधा, व्याजेत्तर उत्पन्नात वाढ व बँकेचे सक्षमीकरण या बाबीवर लक्ष द्यायला हवे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. Ayadi, R., Llewellyn, D. T., Schmidt, R. H., Arbak, E., & De Groen, W. P. (2010). Investigating Diversity in the Banking Sector in Europe: Key Developments, Performance and Role of Cooperative Banks. CEPS Paperbacks. September 2010.

२. Ayadi, R., Llewellyn, D.T., Schmidt, R., Arbak, E. and De Groen, W. (2010), Investigating Diversity in the Banking Sector in Europe: Key Developments, Performance and Role of Cooperative Banks, Centre for European Policy Studies, Brussels.

३.Annual Reports of Samle Bank -2013 to 2023.

४. Babu, J., & Selkhar, M. (2012). The Emerging Urban Co-Operative Banks (UCBS) In India: Problems and Prospects. Journal of Business and Management, 2(5), 01-05.

५. Elorza, U., & Garmendia, A. (2021). Basque industrial cooperative companies: A comparative analysis in terms of economic profitability and social welfare. In The preston model and community wealth building (pp. 208-222).

६. Jones, D. C., Jussila, I., & Kalmi, P. (2016). The determinants of membership in cooperative banks: Common bond versus private gain. Annals of Public and Co-operative Economics, 87(3), 411-432.

७. Majee, W. and Hoyt, A. (2010), "Are worker-owned cooperatives the brewing pots for social capital?", Community Development, Vol. 41 No. 4, pp. 417-430.

८. Mallick, S., & Das, S. (2020). Association between Management Capacity and Profitability of Scheduled Urban Co-Operative Banks in India. Indo-Asian Journal of Finance and Accounting, 1(1), 45-63.

९. Mukherjee, A. (2010). Product market cooperation, profits and welfare in the presence of labor union. Journal of Industry, Competition and Trade, 10, 151-160.

१०. Noordin, N., Rajaratnam, S., Said, S., Mohd Hanif, F., & Juhan, R. (2012). Dividend and profit allocation practices of performing cooperatives in Malaysia. Oñati Socio-Legal Series, 2(2).

११. Sangappa, D. R., Chandhini, K., Charishma, E., & Laxmi, B. (2023). Income inequalities of farmer producer organizations registered as Mutually Aided Co-operative Society

(MACS) in Anantapur district of Andhra Pradesh.

१२. Sapovadia, V. K. (2008). Good Cooperative Governance as a Tool to withstand Urban Coop Bank Crisis- A Case Study of Rajkot Nagarik Coop Bank, India. In ICA's 5th Research Conference, Hanoi, Vietnam, February (Vol. 12).

१३. Schott, D. (2017). Suburbanizing the masses for profit or welfare: Conflict and cooperation between private and municipal interests in German Cities, 1890-1914. In Suburbanizing the Masses (pp. 79-99).

१४. Siddaraju, V. G. (2012). Cooperatives and financial inclusion in India: Issues and challenges. International NGO Journal, 7(3), 46-54.

१५. Stoop, E., Brandsen, T. and Helderman, J.-K. (2021), "The impact of the cooperative structure on organizational social capital", Social Enterprise Journal, Vol. 17 No. 4, pp. 548-565. https://doi.org/10.1108/SEJ-08-2020-0063.

१६. Trento, S., & Catturani, I. (2010). Profit versus Non-Profit: A Third Way? The Case of Italian Mutual Cooperative Banks.

◆

## आनंद वार्ता

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना व अर्थसंवादच्या वाचकांना कळविण्यास आनंद होतो की, अर्थसंवाद या त्रैमासिकाचा समावेश यु.जी.सी. केअर लीस्ट जर्नलच्या यादीत १ जानेवारी, २०२४ पासून करण्यात आलेला आहे.

**- संपादक, अर्थसंवाद**

# शेतीपूरक व्यवसाय आणि ग्रामीण अर्थव्यवस्था

**प्रशांत यशवंत फडणीस** †

**प्रस्तावना :**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी कालखंडात एकच गोष्ट सातत्यपूर्ण आहे ती म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेचे 'कृषिप्रधान अर्थव्यवस्था' हे स्वरूप. देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा समजली जाणारी शेती आणि शेतीवर अवलंबित्व असणारी अर्थव्यवस्था हे चित्र आजही बदललेली नाही. भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ६४% लोक आजही ग्रामीण भागात राहातात. आज ही देशातील जवळपास ५८% लोकसंख्या ही प्राथमिक क्षेत्रावर अवलंबून आहे. मात्र राष्ट्रीय उत्पन्नामध्ये त्यांचा हिस्सा जवळपास २१.८% इतकाच आहे. शेती क्षेत्रातील अनिश्चितता, पर्जन्यावरील अवलंबित्व, शेतमालाच्या किमतीतील चढ-उतार, शेतीवर अतिरिक्त लोकसंख्येचा भार यासारख्या समस्यांवर कायमस्वरूपी उपाय शोधायचा असेल, तर ग्रामीण भागात शेतीपूरक व शेती प्रक्रिया व्यवसायांना चालना देणारे धोरण आखावे लागेल. ज्यामुळे शेतमालाचा कच्चामाल म्हणून वापर होऊ शकतो; तसेच पूरक व प्रक्रिया व्यवसायातून उत्पादन वाढीला चालना मिळून शेतीला प्रेरणा मिळू शकते. ग्रामीण अर्थव्यवस्थेचे स्वरूप कृषिप्रधान अर्थव्यवस्था इतके मर्यादित न राहाता शेती पूरक व शेती प्रक्रिया व्यवसायांची अर्थव्यवस्था असे करावे लागेल तरच ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना मिळेल व देशाचा आर्थिक विकास घडून येईल.

**उद्देश:**

१) देशातील कुकुटपालन व्यवसायाचा आढावा घेणे.

२) कुक्कुटपालन व्यवसायाचे आर्थिक व सामाजिक लाभ पाहाणे.

३) पाटण तालुक्यातील कुक्कुटपालन व्यवसायाचा आढावा घेणे.

**गृहीतक:**

कुक्कुटपालन व्यवसाय किफायतशीर शेतीपूरक व्यवसाय आहे.

**तथ्य संकलन:**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. पाटण तालुक्यातील ०५ पोल्ट्री व्यवसायिकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. भारतीय अर्थव्यवस्था, सरकारी अहवाल, मासिके तसेच वृत्तपत्रांमधील प्रकाशित

† अर्थशास्त्र विभागप्रमुख, बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण
आजीव सभासद क्र.१८३४, भ्रमणध्वनी : ९४२१२८४०५६, ई-मेल : pyphadnis@rediffmail.com

लेखांचा आढावा यामध्ये घेण्यात आलेला आहे.

**नमुना निवड:**

पाटण तालुक्यात एकूण २४ पोल्ट्री फार्म कार्यरत आहेत. त्यापैकी २०% म्हणजे ५ पोल्ट्री चालकांच्या मुलाखती घेऊन माहितीचे संकलन केले गेले आहे.

**मर्यादा:**

प्रस्तुत संशोधनांमध्ये कुक्कुटपालन या व्यवसायाचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच २०१३ ते २०२३ या कालावधीतील माहिती संकलन करण्यात आले आहे. तसेच मुलाखती केवळ पाटण तालुक्यातील पोल्ट्री व्यवसायिकांच्या घेण्यात आलेले आहेत. सदरचे संशोधन पाटण तालुक्यापुरते मर्यादित आहे.

**तक्ता क्र. १ : भारतातील अंडी व चिकन उत्पादन**

| वर्ष | अंडी उत्पादन (दशलक्ष) | वाढ / घट % | चिकन उत्पादन (दशलक्ष टन) | वाढ / घट % | भारतातील चिकनचा उपभोग (दशलक्ष टन) |
|---|---|---|---|---|---|
| २०१३-१४ | ७४.७५ | ७.२ | १.९२ | -२८.५० | २.८७ |
| २०१४-१५ | ७८.४८ | ४.९९ | ३.०५ | ५९.१६ | ३.०६ |
| २०१५-१६ | ८२.९३ | ५.६६ | ३.२६ | ६.७५ | ३.२८ |
| २०१६-१७ | ८८.१३ | ६.२८ | ३.४६ | ६.१३ | ३.४२ |
| २०१७-१८ | ९५.२ | ८.७३ | ३.५ | १.१५ | ३.५४ |
| २०१८-१९ | १०३.३ | ८.५० | ४.१६ | १८.८ | ३.७० |
| २०१९-२० | ११४.३८ | ८.७३ | ४.३४ | ४.३२ | ३.७३ |
| २०२०-२१ | १२२.०५ | ७.०१ | ५.११ | १७.७४ | ३.९५ |
| २०२१-२२ | १२९.०० | ६.१९ | ५.८४ | १४.२८ | ४.१० |
| २०२२-२३ | १२९.६० | ०.४६ | ६.२५ | ७.२० | ४.२५ |
| सरासरी | १०१.७८ | ६.३७ | ४.०८ | १०.७० | ३.५९ |

स्रोत : Department of Animal Husbandry, Dairying & Fisheries Ministry of Agriculture & Farmers Welfare Government of India

तक्ता क्र. १ वरून भारतातील कुक्कुटपालन व्यवसायाचा आढावा घेता येतो. दहा वर्षांत अंडी उत्पादन ७४ दशलक्षवरून जवळपास १३० दशलक्षपर्यंत वाढले आहे, तर चिकनचे उत्पादन जवळपास २ दशलक्ष टनावरून ६.२५ दशलक्ष टनापर्यंत वाढले आहे. अंडी उत्पादनामध्ये जवळपास दुप्पट तर चिकन उत्पादनामध्ये जवळपास तिप्पट वाढ झालेली आहे. याच कालावधीत भारतातील सरासरी चिकनचा उपभोग विचारात घेतला असता त्यामध्येही दीडपट वाढ झाल्याचे दिसून येते.

चिकनच्या उत्पादनामध्ये अमेरिका जगात एक नंबरचा देश असून, अंडी उत्पादनामध्ये चीनचा पहिला नंबर आहे. भारताचा अंडी उत्पादनामध्ये जगात तिसरा तर चिकनच्या उत्पादनामध्ये जगात सहावा क्रमांक लागतो. अंडी उत्पादनामध्ये पहिल्या क्रमांकाचा चीन हा भारतापेक्षा जवळपास सातपट अधिक उत्पादन करत असल्याचे दिसून येते. चिकन उत्पादनामध्ये पहिल्या

**तक्ता क्र. २ : जागतिक स्तरावर अंडी व चिकन उत्पादन**

| जागतिक क्रमांक | देश | अंडी उत्पादन (दशलक्ष टन) | जागतिक क्रमांक | देश | चिकन उत्पादन (दशलक्ष टन) |
|---|---|---|---|---|---|
| १. | चीन | २९.३६ | १. | अमेरिका | २०.३९ |
| २. | अमेरिका | ५.९७ | २. | चीन | १८.१९ |
| ३. | भारत | ३.९७ | ३. | ब्राझील | १३.०० |
| ४. | मेक्सिको | २.५७ | ४. | रशिया | ३.७७ |
| ५. | जपान | २.५० | ५. | मेक्सिको | २.९२ |
| जागतिक उत्पादन | | १०४.८९ | ६ | भारत | २.७६ |
| | | | जागतिक उत्पादन | | १३१.१२ |

स्रोत : Department of Animal Husbandry, Dairying & Fisheries Ministry of Agriculture & Farmers Welfare Government of India.

**तक्ता क्र. ३ : भारतातील चिकनच्या किमती**

| वर्ष | किमत | वाढ / घट |
|---|---|---|
| जुलै २०१३ | १३२.७१ | = |
| जुलै २०१४ | १४७.१६ | ११.३६ |
| जुलै २०१५ | १४५.६० | -१.३६ |
| जुलै २०१६ | १३१.७४ | -९.६५ |
| जुलै २०१७ | १५१.४३ | १५.२६ |
| जुलै २०१८ | १७३.८१ | १४.५६ |
| जुलै २०१९ | १३६.९२ | -२१.३८ |
| जुलै २०२० | ११४.०३ | -१६.१७ |
| जुलै २०२१ | १७७.३६ | ५५.२६ |
| जुलै २०२२ | २८१.२५ | ५८.७५ |
| जुलै २०२३ | २६८.१४ | -४.६२ |
| सरासरी | १६९.०९ | १०.२० |

स्रोत : Department of Animal Husbandry, Dairying & Fisheries Ministry of Agriculture & Farmers Welfare Government of India.

क्रमांकावरील अमेरिका भारताच्या सातपट अधिक चिकन उत्पादन करतो. पहिल्या तीन देशातील चिकनचे उत्पादन डबल डिजिट असून, भारतातील उत्पादन सिंगल डिजिट आहे. भारताला या व्यवसायामध्ये विस्तारण्याच्या खूप संधी उपलब्ध आहेत. भारतातील वाढत्या लोकसंख्येच्या आहाराच्या पोषणाची जबाबदारी अंडी आणि चिकन या माध्यमातून पूर्ण करता येऊ शकते.

तक्ता क्र. ३ मध्ये भारतातील चिकनच्या किमती दर्शविले आहेत. जुलै २०१३ ते जुलै २०२३ या दहा वर्षातील चिकनच्या किमती दर्शविले आहेत. या दहा

वर्षात चिकनच्या किमतीत दुप्पट वाढ झाल्याचे दिसून येते. कोविडच्या काळात जुलै २०२१ पासून चिकनच्या किमतीत प्रचंड वाढ झाल्याचेही दिसून येते. किंमत वाढ झाली असूनही भारतीय लोकांच्या आहारातून चिकनचे प्रमाण फारसे कमी झाले नाही, हे नमूद करावे लागेल.

**महाराष्ट्रातील कुक्कुटपालन :**

महाराष्ट्रातील कुक्कुटपालन विचारात घेताना पोल्ट्री फार्ममधील कुक्कुट वर्गीय पक्षी आणि घरगुती केलेले कुक्कुटपालन विचारात घेतले जाते. २००७ मध्ये महाराष्ट्रात पोल्ट्री फार्ममध्ये ४४.७४ दशलक्ष कुक्कुट वर्गीय पक्षांची संख्या होती जी २०१२ मध्ये ६०.२८ दशलक्षपर्यंत वाढली. मात्र त्यानंतर २०२० मध्ये ५२.१८ दशलक्षपर्यंत त्यात घट झाल्याचे दिसून येते. पोल्ट्रीमधील कोंबड्यांची संख्या विचारात घेता महाराष्ट्राचा देशात आंध्रप्रदेश आणि तामिळनाडूनंतर तिसरा क्रमांक लागतो तर चौथ्या क्रमांकावर कर्नाटक आणि पाचव्या क्रमांकावर पश्चिम बंगाल हे राज्य आहे. सातारा जिल्ह्यात ३४५ पोल्ट्री फार्म कार्यरत असून पाटण तालुक्यामध्ये २४ पोल्ट्री फार्म आहेत.

**तक्ता क्र. ४ : महाराष्ट्रातील अंडी आणि चिकनचे उत्पादन**

| वर्ष | चिकनचे उत्पादन (०००) | अंडी उत्पादन ( कोटी) |
|---|---|---|
| २०१४-१५ | ६३१ | ५०८ |
| २०१५-१६ | ६७५ | ५२९ |
| २०१६-१७ | ८४५ | ५४८ |
| २०१७-१८ | ९२५ | ५७० |
| २०१८-१९ | १०२१ | ५९६ |
| २०१९-२० | ११४० | ६३७ |
| २०२०-२१ | ११०९ | ६४० |
| २०२१-२२ | ११६३ | ६५२ |
| सरासरी | ९३८.६२ | ५८५ |

स्रोत : Maharashtra State Economic & Statistical Report various years.

२०१४-१५ ते २०२१-२२ या कालावधीतील महाराष्ट्रातील चिकन आणि अंड्यांचे उत्पादन तक्ता क्र. ४ मध्ये दिलेले आहे. २०२०-२१ मध्ये चिकनच्या उत्पादनामध्ये घट झाल्याचे दिसून येते. मात्र अंड्यांच्या उत्पादनामध्ये कोणतीही घट झालेली नाही. या कालावधीत चिकनचे उत्पादन सरासरी दुप्पट झाले असून, अंडी उत्पादनामध्ये सरासरी २५% वाढ झाल्याचे दिसून येते.

**पाटण तालुक्यातील कुक्कुटपालन व्यवसाय:**

पाटण तालुका साताऱ्याच्या पश्चिमेला असून अति पावसाचा प्रदेश समजला जातो. येथे थंडीचे प्रमाण अधिक असते. उन्हाळ्यात सरासरी तापमान ३० ते ४० या दरम्यान असते. पाटण तालुक्यात पोल्ट्री व्यवसायासाठी पोषक वातावरण आहे. पाटण तालुक्यात सद्यस्थितीस २४ पोल्ट्री फार्म कार्यरत आहेत. निव्वळ पोल्ट्री व्यवसायिक पाटणमध्ये नाहीत. शेतीला पूरक व्यवसाय म्हणूनच पोल्ट्री व्यवसाय करतात. सगुना किंवा नॅशनल यासारख्या कंपन्या पक्षी पुरवठा करतात. तसेच तयार पक्षी घेऊन जातात. त्यामुळे विपणनाची गरज नाही. पक्षी मोजून दिले जातात व मोजून घेतले जातात. त्यामुळे अन्यत्र पक्षी विक्री करता येत नाही. सहा ते सात रुपये प्रतिकिलो याप्रमाणे कोंबडीला दर दिला जातो. बारामती ॲग्रो आणि सगुना या सर्वाधिक

दर देणाऱ्या कंपन्या आहेत. ज्या ७.५ रुपये ते ९ रुपये पर्यंत प्रतिकिलो दर देतात. पूर्ण वाढ झालेले पक्षी अडीच किलोपर्यंत भरतो. मात्र या कंपन्यांचा मृत्यूदर जास्त आहे. याउलट नॅशनलसारख्या कंपनीत ६ ते ७ रुपये दर देतात. मात्र त्यांचा पक्षी मृत्यूदर कमी आहे. कंपन्यांच्यामार्फत खरेदी-विक्री होत असल्यामुळे सर्व तालुक्यात सर्व ठिकाणी दर एकसारखाच असतो. खाद्य पुरवठा कंपनीमार्फत होतो. कंपनीचा माणूस पक्षी मृत्यूदर तपासणी करण्यासाठी नेहमी येत असतो.

पोल्ट्री शेड, लाईट, पाणी इत्यादी खर्च स्वतः करावा लागतो. इतर खर्च वाढले आहेत त्यामुळे दर वाढवून मिळावा यासाठी संघटना पातळीवर प्रयत्न करता येत नाहीत. पोल्ट्री चालकांच्या स्वतंत्र संघटना नाहीत. शेती उद्योगामुळे घरगुतीपेक्षा कमी युनिटचा दर पोल्ट्रीसाठी आकारला जातो. पक्ष्यांची एक बॅच तयार होण्यासाठी ३५ ते ४० दिवस लागतात. वर्षाला सहा ते सात बॅच तयार होतात. सप्टेंबर ते फेब्रुवारीपर्यंत पक्ष्यांची वाढ चांगली असते. चांगला दर मिळतो. पक्ष्यांच्या वजनानुसार ८० ते ८५ हजार रुपये एका बॅचला मिळतात. सर्व खर्च वजा जाता २०,००० ते २२,००० निव्वळ नफा मिळतो. सकाळी दोन तास व संध्याकाळी दोन तास द्यावे लागतात. कंपनीचा उत्पादकाशी थेट संबंध असतो. मध्यस्थाची गरज नाही. स्मार्टफोन आणि इंटरनेटद्वारे बरीच कामे होतात. कंपनीशी करार असल्यामुळे स्थानिक पातळीवर पक्षी विकता येत नाहीत. मृत पक्ष्याचा फोटो आणि व्हिडिओ कंपनीला ऑनलाईन पाठवावा लागतो. पशुखाद्य व डॉक्टर कंपनीकडूनच उपलब्ध होतात. स्वतःची जागा असेल तर शेतीला पूरक व्यवसाय ठरू शकतो. पक्ष्यांच्याखाली कोंडा अंथरला जातो. त्याचे खत तयार होते. जे शेतीला वापरता येते. प्रत्येक बॅचसाठी स्वतंत्र कोंडा वापरला जातो. त्यामुळे उर्वरित खत विकूनही नफा मिळवता येतो. एका शेडमध्ये एका बॅचमध्ये चार ते पाच हजार पक्षी सरासरी असतात. दरवर्षी १२ ते १४ टन विक्रीसाठी उत्पादन तयार होते. कोविड काळात चिकन व अंडी खायला सांगितल्यामुळे धंदा तेजीत होता. चिकन उत्पादन पोल्ट्री फार्मसाठी सरकारी अनुदान कमी आहे. अंडी उत्पादन पोल्ट्री फार्मसाठी सरकारी अनुदान जास्त आहे. पाटण तालुक्यात अंडी उत्पादन पोल्ट्री फार्म नाहीत.

मार्केटिंगची गरज नाही, पैसे खात्यावर ऑनलाईन जमा होतात. शेती पाहात हा व्यवसाय करता येत असल्यामुळे १८०० रुपये टन याप्रमाणे खतदेखील कंपन्या विकत घेतात, तसा करार करता येतो. गावातही तुमच्याकडून खत विकत घेण्यासाठी लोक इच्छुक असतात, त्यामुळे दुहेरी लाभ होऊ शकतो. पाटणमध्ये पोल्ट्री व्यावसायिकांनी कोणतेही कामगार नेमलेले नाहीत. घरातीलच एक-दोन व्यक्ती खासकरून महिला पोल्ट्री व्यवसाय पाहातात. तीस ते पस्तीस हजारपर्यंत उत्पन्न मिळण्याची हमी यामधून प्राप्त होते.

**कुक्कुटपालनाचे आर्थिक लाभ :**

कुक्कुटपालन ग्रामीण भागात शेतीपूरक व्यवसाय म्हणून सर्वाधिक शेतकऱ्यांकडून केला जातो. प्रत्येक शेतकरी छोट्या प्रमाणात कोंबड्या पालन करतो. मात्र त्यास व्यावसायिक स्वरूप दिल्यास शेतकऱ्याला शेतीबरोबरच आर्थिक लाभही प्राप्त होतात. दरमहा विशिष्ट आर्थिक उत्पन्न मिळवता येते. कुक्कुटपालन व्यवसायामुळे झालेले आर्थिक लाभ खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) ग्रामीण भागातील दारिद्र्य व बेरोजगारी कमी होऊन आर्थिक विकासाला चालना मिळण्यास मदत झाली आहे.
२) अंडी आणि चिकन यांचे वाढते उत्पादन घेऊन शेतकरी शेतीला पूरक व जोडधंदा करत असल्यामुळे आर्थिक लाभ प्राप्त होत असल्याचे दिसून येते.
३) औद्योगिकीकरणाच्या संदर्भात विचार करता कुक्कुटपालनामुळे साबण, केक बनवणे, रंग निर्मिती, पशुखाद्य खते यासारख्या वस्तूंच्या निर्मितीमध्ये फायदा होत असल्याचे दिसून येते.
४) शेतीपूरक व्यवसाय सुरू केल्याने देशात २.१

दशलक्ष रोजगार संधी निर्माण झाल्या.

५) कुक्कुटपालनामुळे देशाला ४१.९ दशलक्ष कोटी महसुलाद्वारे आर्थिक लाभ प्राप्त झाला.

**कुक्कुटपालनाचे सामाजिक लाभ:**

कुक्कुटपालन व्यवसायात समाजातील अनेक जातीधर्मांचे लोक कार्यरत आहेत. आर्थिक लाभाबरोबरच कमी कालावधीत आणि कमी पैशात सामाजिक लाभ उपलब्ध करून देण्याचे साधन कुक्कुटपालन व्यवसाय बनला आहे. कुक्कुटपालन व्यवसायामुळे झालेले सामाजिक लाभ खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात अन्नधान्याची समस्या सोडविण्यामध्ये शेतीला पूर्ण यश मिळत नाही, त्यावेळी अंडी आणि मांस उत्पादनामधून कुक्कुटपालन अन्नाची निर्माण झालेली तूट भरून काढू शकते.

२) कोंबडीचे अंडे व मांस यामुळे चांगल्या पौष्टिक आहार मिळतो. आहारामध्ये प्रथिने, जीवनसत्व व क्षार भरपूर असतात. अंड्यांमध्ये १४% तर कोंबडीच्या मांसामध्ये २०% प्रथिने असतात.

३) अंड्यांमध्ये भेसळ होण्याची शक्यता नसते.

४) कोंबडी कमी दर्जाचे अन्न खावून त्याचे चांगल्या दर्जाच्या अन्नामध्ये रूपांतर करते.

५) चिकन आणि अंडी सर्वसामान्यांच्या आवाक्यात आहेत.

६) कुपोषणासारख्या समस्यांवर काही प्रमाणात कुक्कुटपालनाचा लाभ होतो.

७) दारिद्र्याची समस्या सोडवण्यास मदत झाली आहे.

८) ग्रामीण भागात गोरगरिबांच्या आहारात अंडी व चिकनचा समावेश कुक्कुटपालन व्यवसायामुळेच शक्य झाल्याचे दिसून येते.

९) पोषण आहारामुळे सामाजिक दरी कमी होण्यास मदत होते.

१०) पाटणच्या प्रदूषणविरहित हवामानामुळे पक्ष्यांमध्ये रोगांचे प्रमाण कमी आहे.

**पाटण पोल्ट्री चालकांच्या व्यावसायिक समस्या :**

पाटण तालुक्यातील पोल्ट्री व्यवसायिकांनी त्यांना व्यवसायामध्ये जाणवणाऱ्या समस्यांचे विवेचन केले त्यावरून खालीलप्रमाणे निष्कर्ष काढता आले.

१) हवामानाचा पोल्ट्री उद्योगावर परिणाम होतो. अतिपाऊसामुळे पक्ष्यांचे आजारपण वाढते; परंतु थंडीमुळे पक्ष्यांची चांगली वाढ होते.

२) पशुखाद्य दर वाढलेले आहेत. मात्रा कंपनीकडून ६ ते ७ रुपयेच मिळतात.

३) अंड्यांच्या वाढणाऱ्या किमती आणि ब्रॉयलर चिकनच्या वाढणाऱ्या किमती तुलनेने कमी आहेत.

४) पोल्ट्री व्यवसाय शेडउभारणीसाठी येणारा खर्च, जागा व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन यासाठी मनुष्यबळ उपलब्ध होत नाही. तसेच त्यांना प्रशिक्षण मिळत नाही.

५) ग्रामीण भागात शेती व्यवसायासाठी मनुष्यबळ उपलब्ध होत नाही. त्याचा परिणाम शेतीपूरक व्यवसायांवर होत असल्याचे पोल्ट्री मालकांनी सांगितले.

६) अंडी आणि चिकनची असणारी मागणी कोणत्या ठिकाणी किती प्रमाणात आहे, याबद्दल फारशी माहिती उपलब्ध होत नाही त्यामुळे वितरणामध्येदेखील समस्या येतात.

७) व्यापारी प्रत्येकवेळी जागेवर येऊन मालाची खरेदी करतील याची खात्री मालकांना राहिलेली नाही. त्याचाही परिणाम काही अंशी कुक्कुटपालन व्यवसायावर होताना दिसून येतो.

८) कमी उत्पादक्ता, साठवणुकीची समस्या, खाद्य समस्या, इत्यादी समस्या भेडसावतात.

९) बँकेकडून पोल्ट्री उभारणीसाठी कर्ज मिळते. पाटण तालुक्यामध्ये पोल्ट्रीधारकांची संघटना आहे, ज्याद्वारे विविध सरकारी योजनांची माहिती दिली जाते. मात्र व्यवसायामध्ये प्रतिस्पर्धी म्हणूनच पाहिले जात असल्यामुळे काही वेळेला पूर्ण माहिती दिली जात नाही.

**कुक्कुटपालन व्यवसायाचे महत्त्व:**

१) कमी भांडवल लागते. २) कमी जागेमध्ये पोल्ट्री शेड उभारता येते. ३) कमी कालावधीमध्ये जास्त परतावा प्राप्त होतो. ४) देखभालीची फारशी गरज नसते. ५) परवाना असणे सक्तीचा नाही. ६) जागतिकस्तरावर अंडी आणि चिकनला मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. ७) विपणन करणे सहज शक्य होते. ८) उत्पन्न आणि रोजगार संधी प्राप्त होतात. ९) कोंबडी खत हे उत्तम शेती खत म्हणून वापरले जाते. ज्यामध्ये स्फुरद व पालाशचे प्रमाण चांगले असते. सर्व पिकांसाठी उत्तम खत म्हणून उपयोग होतो. जमिनीची सुपीकता वाढते. १०) पक्ष्यांना कमी जागा लागते, त्यामुळे जिथे जागा कमी तिथे हा व्यवसाय करता येतो. पक्षी लवकर वयात येतात व पिल्ले देतात. त्यामुळे पैदाशीसाठी चांगला उपयोग होतो.

**गृहीतक चाचणी:**

प्रस्तुत संशोधनासाठी स्वीकारण्यात आलेल्या गृहीतकाचे कोणत्याही सांख्यिकी चलांचा वापर न करता घेतलेल्या मुलाखती आणि मिळालेल्या माहितीवरून असा निष्कर्ष काढता येतो की, कुक्कुटपालन हा किफायतशीर शेतीपूरक व्यवसाय आहे. याचा अर्थ, गृहीतक प्रमाणित झाले आहे.

**समारोप:**

भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधान असून वाढत्या लोकसंख्येला शेतीक्षेत्र सामावून घेण्यास असमर्थ ठरत आहे. अशावेळी कुक्कुटपालनासारखे शेतीपूरक व्यवसाय ग्रामीण भारतातील आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारण्यास मदत करतात. २०२० च्या आकडेवारीनुसार कुक्कुटपालन व्यवसाय यामधून २.१ दशलक्ष लोकांना रोजगार प्राप्त झालेला आहे, तर ४१.९ दशलक्ष कोटी रुपयांचा महसूल सरकारला प्राप्त झालेला आहे. देशाच्या आर्थिक विकासामध्ये कुक्कुटपालन व्यवसायाचे योगदान वाढत असल्याचे दिसून येते. रोजगारनिर्मितीबरोबरच गरिबांना आहार उपलब्ध करून देण्यास समर्थ ठरतात. कुक्कुटपालनसारख्या व्यवसायांना चालना दिल्यास शेतीमधील खताची समस्या सोडविण्यासही मदत होऊ शकते. ग्रामीण भारत समर्थ आणि सक्षम बनला तरच भारताच्या वाढत्या अर्थव्यवस्थेचे सामर्थ्य अधोरेखित झाल्यासारखे होईल. एकीकडे शेतमालाला हमीभाव मिळावा, अशी मागणी शेतकरी करतो. मात्र कोणताही हमीभाव न मिळतादेखील चिकन व अंडी उत्पादनापासून शेतकरी दुहेरी लाभ मिळवू शकतो. त्यामुळे शेती करत गावातच करता येणारा हा व्यवसाय शेतीला खऱ्या अर्थाने पूरक व्यवसाय ठरतो.

**संदर्भ ग्रंथ सूची:**


१) कदम (डॉ.) अनिता, (२०१५), 'व्यापारी कोंबडी पालन', तेजस पब्लिकेशन्स, कोल्हापूर.

२) कदम, (डॉ.) वि. स., (२०२३), 'पावसाळ्यात कोंबड्यांची निगा कशी राखाल', 'शेतकरी' पान नं.४५.

३) चौगुले एम. एम., (२०१५), 'फायदेशीर पशुपालन', तेजस पब्लिकेशन्स, कोल्हापूर.

४) पाटील डी. बी., (२०२२), 'शेतीला जोड व्यवसाय', 'शेतकरी' पान नं.५३.

५) वानकर, (डॉ.) ए. के., (२०२१), 'कोंबड्यांना होणारे आजार व उपाय', 'शेतकरी' पान नं.६७.

६) शिंदे जगन्नाथ, (२०१३), 'सुधारित कोंबडी पालन', गोदावरी पब्लिकेशन्स, नाशिक.

७) सिंह एस. पी., (२०२२), 'पशुपालन आणि विकास', 'शेतकरी' पान नं.२३.

८) National Action Plan for Egg & Poultry-2022, Department of Animal Husbandry, Dairying & Fisheries, Ministry of Agriculture & Farmers Welfare, Government of India, New Delhi.

९) Singh Ravishankar, (editor) (2001), 'Ecotourism and Sustainable Development'.Abhijeet Publications, New Delhi.


◆

# गिग इकॉनॉमी: सेवाक्षेत्रातील स्थित्यंतराचे नवे पर्व

**किशोर गजाजन सुतार**[†]

**प्रस्तावना :**

२०२० नंतरच्या दशकाला सुरुवात झाल्यानंतर कोरोनोत्तर जग आमूलाग्रपणे बदलताना दिसत आहे. हे बदल जसे सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक पातळीवर घडून येत आहेत, तसे किंबहुना त्याहीपेक्षा सखोलपणे आर्थिक आघाड्यांवर घडून देखील येत आहेत. ते डिजिटल इकॉनॉमी, अशा अनेक स्वरूपात परावर्तित होत आहे. एकूणच नव्वदच्या दशकानंतर पूर्वेकडील अनेक अर्थव्यवस्थांना मुक्त बाजारपेठी रचनेचे धुमारे फुटू लागले. आपला भारतदेखील याला अपवाद नव्हता. या मुक्त बाजारपेठी आर्थिक संरचनेतून पश्चिमात्त्य विकसित जगातील आधुनिक माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राला आशिया, आफ्रिका इ. जगतातील हक्काच्या बाजारपेठा मिळाल्या. ज्यातून या देशांत माहिती-तंत्रज्ञान, संगणक, इंटरनेट, करमणूक, व्यापार, वाणिज्य, वाहतूक, दळणवळण, पायाभूत सुविधा, स्टॉक मार्केट, विमा, आरोग्य, शिक्षण अशा सेवांशीसंबंधी क्षेत्राची भरभराट सुरू झाली. त्यातूनच पूर्वीची उत्तम शेती-मध्यम उद्योग-कनिष्ठ व्यापार ही त्रिसुत्री मागे पडून त्याऐवजी उत्तम सेवा-मध्यम उद्योग-कनिष्ठ शेती असा नवा आर्थिक ढाचा पुढे येत गेला. नव्वदच्या दशकापासून आजअखेर गेली पाच दशके हे सेवाक्षेत्र अनेक स्थित्यंतरातून जात जात आघाडीवर पोहोचले. नव्वदच्या दशकात ते खुले झाले. २०१० च्या दशकात ते तंत्रस्नेही बनले. २०२० च्या दशकात ते स्पर्धाक्षम बनले आणि आता अव्वल स्थानावर जाऊन पोहोचले आहे. कोरोनोत्तर काळात या सेवाक्षेत्रातील स्थित्यंतराचे एक नवे पर्व 'गिग इकॉनॉमी' या रूपात विकसित होत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विशेष संदर्भासह या गिग इकॉनॉमीचा परामर्श घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखाद्वारे केला आहे.

**काय आहे गिग इकॉनॉमी ? :**

गिग इकॉनॉमी (GIG Economy) म्हणजे एखाद्या मोठ्या व्यवसायात किंवा उद्योगांत एका वा त्यापेक्षा जास्त लोकांनी आपल्या सेवा देऊन त्याद्वारे उत्पन्न मिळविणे. गेली काही दशके जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणाच्या रेट्यातून अनेक नवनवे रोजगाराचे आयाम पुढे येत आहे. यातील बहुतांशी रोजगार संधी या सेवाक्षेत्राशी निगडित आहेत. अलीकडे सेवाक्षेत्रात नव्याने तयार होणाऱ्या या रोजगार

† सहायक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
आजीव सभासद क्र.१८४८, भ्रमणध्वनी : ८३२९३८९९७९, ई-मेल : kishorsutar2021@gmail.com

संधीचे एक व्यवच्छेदक लक्षण म्हणजे ते मिश्र अर्थव्यवस्थेतील रोजगाराप्रमाणे संघटित स्वरूपाचे, कायद्याच्या चौकटीतील, दीर्घकालीन शाश्वती असलेले, नियमानुसार चालणारे अशा स्वरूपाचे न राहाता ते नियमविरहित, लवचिक व असंघटित पद्धतीचे असतात. ही सर्व गुणवैशिष्ट्ये असणारी आधुनिक श्रम बाजारपेठ म्हणजेच 'गिग इकॉनॉमी' होय.

हा जो 'गिग' शब्द वा संज्ञा आहे ती मुळात 'जॅझ' या संगीत प्रकारातून प्रसव पावलेली आढळून येते. कारण सन १९१५ च्या दरम्यान या जॅझ संगीतकारांनी आपल्या वैयक्तिक व सांगितीक कलाविकासाच्या कामगिरीदाखल 'गिग' हा शब्दप्रयोग वापरला. यानंतर पुढे २००९ साली डिजीटल व्यवहार करणारे, नॉलेज इकॉनॉमीतील फ्रि-प्लोटींग प्रोजेक्ट, कन्सलटन्सी, पार्ट टाईम वर्कर्स इ. सर्वांकरिता एकत्रितरीत्या समुच्चयात्मक अर्थाने गिग इकॉनॉमी असा शब्दप्रयोग न्यूयॉर्क टाईम्सच्या संपादक टिना ब्राऊन यांनी वापरला. आपण जर शब्दकोषाच्या आधारे गिग इकॉनॉमीचा अर्थ पाहायला गेलो, तर तो वैश्विक माहितीचे जाळे असा होतो. गिग इकॉनॉमी ही गरजवंत अशा सेवा देऊ इ. अत्यंत तात्पुरत्या स्वरूपाची एक अशी मुक्त बाजारप्रणाली असते ती पूर्णत: असंघटित स्वरूपाची असून त्यामध्ये उच्च तंत्रज्ञान, इंटरनेट व कृत्रिम बुद्धिमत्तेचा आधार घेतलेला असतो. यातील कंपनी, कामगार व सेवांचे खरेदीदार यातील व्यवहार व त्यासाठीचे करार हे अत्यंत तात्पुरत्या स्वरूपाचे असतात.

**गिग इकॉनॉमीतील कामगार वर्गाचे स्वरूप :**

या श्रमबाजारात एखादे विशिष्ट काम किंवा प्रोजेक्ट पूर्ण करण्याकरिता कामगारांना मागणी केली जाते. विशेषत: यात अशा कंपन्या व ग्राहक एकत्र येतात ज्यांना एकच एक काम पूर्ण करावयाचे असते. जसे की, टॅक्सी चालवणे व त्यातून प्रवास करणे, नवीन वेबसाईट डिझाईन करणे - वेबसाईट वापरणे इ. चा यात अंतर्भाव होतो. याचाच अर्थ, या गिग इकॉनॉमीमध्ये अशा कंपन्या वा व्यवसायाचा समावेश होतो. ज्या त्यांच्यांशी करारबद्ध झालेल्या कामगारांना थेट ग्राहकांशी जोडतात. उदा. अमेझॉन, फ्लिप कार्ट, ओला, उबर, फिवर यांसारख्या ऑनलाईन मोडवर, अँडरॉईड ॲपद्वारे तत्काळ व तातपुरत्या स्वरूपातील मागणीच्या पूर्ततेसाठी सेवा देतात. या सर्व संरचनेतून जन्माला आलेली बाजारयंत्रणा म्हणजे 'गिग इकॉनॉमी' होय.

गिग इकॉनॉमीचा हा श्रमिक बाजार पूर्णवेळ निश्चित कराराऐवजी अर्धवेळ व फ्रिलान्स नोकऱ्यांनी भारलेला असतो. जिथे वेळेचे कसलेही बंधन नसते, काम करा आणि पैसा कमवा हे या बाजाराचे तत्त्व असते. टॅक्सी चालवणे, वस्तू व सेवांची डिलीव्हरी करणे, दस्ताऐवजांचे संपादन करणे, तांत्रिक सहकार्य करणे इ. चा यात समावेश होतो. स्विगी, डुंझो अशी याची काही उत्तम उदाहरणे देता येतील.

२०२० साली प्रकाशित झालेल्या गिग श्रमिक संहितेनुसार गिग कामगार या संज्ञेची दिलेली व्याख्या अशी आहे की, एखाद्या कामात भाग घेऊन काम करणारी व्यक्ती पारंपरिक कामगार-मालक पद्धतीत बांधली न जाता उत्पन्न मिळवते ती गिग कामगार ठरते. ज्याचे स्वरूप जरी तात्पुरते असले तरी त्यात अन्नपदार्थाची डिलीव्हरी करण्यापासून ते सॉफ्टवेअर डेव्हलपिंगपर्यंतच्या कामांचा समावेश होतो. ही कामे ठरावीक वेळेत केली जातात. पारंपरिक वा प्रमाणित कामाचे मापदंड याला लागू नसतात. याला फलेवसी स्टाफींग म्हणूनही संबोधले जाते. याबाबतीत जागतिक क्रमवारीत अमेरिका प्रथम स्थानावर असून त्यानंतर चीन, ब्राझील, जपान यांचा क्रमांक लागतो, तर यानंतरच्या पाचव्या स्थानावर भारताचा क्रमांक लागतो.

**भारतातील गिग वर्कर्सची स्थिती :**

अलीकडे भारतातील गिग वर्कर्स संदर्भात बोस्टन

कन्सल्टिंग ग्रुपने स्वतंत्ररीत्या केलेल्या सर्वेक्षण अहवालानुसार भारतात सॉफ्टवेअर, सामाजिक सेवा, व्यावसायिक सेवा यांसारख्या क्षेत्रात १५ दशलक्ष एवढी श्रमशक्ती गुंतलेली आहे. यामध्ये १८ ते २३ वयोगटातील १६ टक्के, २४ ते ३८ वयोगटातील सर्वाधिक म्हणजे ६४ टक्के, ३९ ते ५५ वयोगटातील १८ टक्के, उर्वरित २ टक्के श्रमिक ५५ पेक्षा जास्त वयाचे आहेत. या सर्वांमध्ये महिलांचे प्रमाण ३१ टक्के आहे. या गिग कामगारांचे पुढील दोन प्रकारांत वर्गीकरण केले जाते.

**प्लॅटफॉर्म कामगार :**

या प्रकारातील गिग कामगार हे ऑनलाईन सॉफ्टवेअर्स, अँडरॉईड ॲप्स्, संगणक, इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या वापरातून सेवा पुरवतात. यामध्ये ओला, उबर, झोमॅटो, डुंझो, अर्वन कंपनी, फ्लिप कार्ट, एअर बँल्ब, लिट, फ्रिलांसार, इस्टे, उडेमी या प्लेटफॉर्मसचा अंतर्भाव होतो.

**बिगर प्लॅटफॉर्म कामगार :**

या प्रकारातील कामगार हे अनौपचारिकरीत्या पारंपरिक क्षेत्रात अर्धवेळ अथवा पूर्णवेळ काम करत असतात. संगीतकार, गायक, वादक, नर्तक इ. कला व करमणूक क्षेत्रातील लोक यात येतात. संहितालेखन सॉफ्टवेअर, डेव्हलपर, समुपदेशक, व्यवस्थापक हे देखील यात बिगर प्लॅटफॉर्म गिग इकॉनॉमीचा भाग असतात. आहारतज्ज्ञ, योगा टिचर, जीम ट्रेनर हे देखील यात येतात. यात कोणताही करार वा नोंदणी, सभासदत्व नसते. भाडे, मजुरी, फी यांचे दर निश्चित व अधिकृत नसतात.

**भारतातील गिग इकॉनॉमीबाबत नीती आयोगाचा अहवाल :**

२०२०-२१ मध्ये भारतातील गिग इकॉनॉमीसंदर्भात नीती आयोगाने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार भारतात सध्या गिग वर्कर्सची संख्या २०२०-२१ मध्ये ७७ लाख एवढी असून ती एकूण कामगारांच्या १.५ टक्के एवढी होती. ती पुढे २०२९-३० मध्ये २३.५ दशलक्ष पर्यंत वाढून एकूण श्रमशक्तीच्या ४.१ टक्के होईल. विक्री व्यवसाय व किरकोळ व्यापारात त्याचे प्रमाण २.७ दशलक्ष असेल, तर वाहतूक व दळणवळण क्षेत्रात ते १.३ दशलक्ष एवढे राहील. आजघडीला भारतात जेवढे गिग श्रमिक कार्यरत आहेत. त्यातील सुमारे ४७ टक्केमध्ये कुशल आहेत, तर उच्च कौशल्य असणारे फक्त २२ टक्के आहेत. तर ३१ टक्के श्रमिक अकुशल आहेत. हा अहवाल असे सांगतो की, २०११-१२ व २०१९-२० या दोन आर्थिक वर्षात या गिग इकॉनॉमीमध्ये सर्वाधिक कामगार पुरवठा व रोजगार निर्मिती झालेली दिसून येते. आज शिक्षणासारख्या सेवाक्षेत्रात ५१ टक्के गिग वर्कर्स कार्यरत आहेत. एवढेच नव्हे, तर या गिग अर्थव्यवस्थेत आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये या गिग इकॉनॉमीने देशाच्या जीडीपीमध्ये १ टक्के योगदान दिले आहे.

**गिग अर्थव्यवस्थेतील रोजगारनिर्मितीच्या वाढत्या संधी :**

गिग इकॉनॉमीचा उद्योग हा मुळात सेवाक्षेत्राचा भाग असल्याने तो ऐन कोरोना काळात तेजीत राहिला होता आणि आता तर एका संशोधन अहवालानुसार येत्या तीन वर्षात या क्षेत्रात ९० ते ११० लक्ष लोकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. कारण विकसित देशांतील तरुणांप्रमाणेच भारतीय तरुणाईदेखील गिग उद्योगांकडे आकर्षित होत आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या उद्योगातील कामे स्वेच्छेने करता येतात व त्याचा मोबादलाही त्वरित मिळतो. तसेच एकाचवेळी विविध कामे करता व हाताळता येतात. या सर्वांचा अंतर्भाव फ्रिलान्स प्रकारात होतो. अलीकडेच काही लिडींग गिग उद्योगांच्या प्रमुखांशी केलेल्या संवादांतून या बाबी पुढे आल्या आहेत.

सध्या भारतात मोबाईल ॲप्सवर सेवा देणाऱ्या

कंपन्यांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. घरपोच सेवा, हितसेवांची पूर्तता यांना येत्या काळात मोठी मागणी राहील. त्यासाठी डिलिव्हरी बॉय व घरी जाऊन सेवा देणे इ.साठी श्रमिकांची प्रचंड मागणी राहील. यात पर्सनल केअर, ॲप्सवर बुकिंग केल्यावर घरी जाऊल क्लिनिंग व साफसफाई, वॉशिंग इ. सेवा देणे, हाऊस किपींग करणे, वाहनांची व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांची दुरुस्ती करणे, अन्न-किराणा, औषधे इ. सामान घरपोच देणे, वाहन चालवणे, विविध बाबींची कन्सलटन्सी देणे, घरगुती व कार्यालयीन वस्तू वा सेवांचा पुरवठा करणे. इ. सारख्या अगणित सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांना भावी काळात प्रचंड मोठ्य प्रमाणात श्रमशक्तीची गरज असणार आहे. शेती व उद्योग क्षेत्रात तसेच पारंपरिक सेवाक्षेत्रात एकीकडे कामगारांची मागणी असूनही पुरेसा व कुशल श्रमपुरवठा तिथे होत नाही. याउलट या गिग इकॉनॉमीत प्रचंड रोजगारनिर्मिती होऊनही अपुऱ्या श्रमशक्तीमुळे यातील कामे इंटरनेट, ॲप्स व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने केली जात आहे.

आज भारतात २२ टक्के गिग वर्कर्स हे फुड होम डिलिव्हरीत कार्यरत आहेत. तर वस्तूंच्या होम डिलिव्हरीत २६ टक्के लोक आहेत. तर हॉस्पीट्यॅलिटी-हाऊस किपींग-देखभाल-दुरुस्ती यामध्ये १६ टक्के लोक काम करत आहेत, तर सफाई कर्मचाऱ्यांचे प्रमाण १० टक्के आहे. यात सर्वाधिक कमी प्रमाण लहान मुले, वृद्ध व्यक्ती, दिव्यांग जन. इ.च्या सेवाशुश्रुषा व देखभालीमध्ये फक्त ७ टक्के लोक काम करतात. याशिवाय हा अहवाल असेही नमूद करतो की, ६२ टक्के लोकांची इच्छा व तयारी असूनही केवळ अपुऱ्या माहितीअभावी ते यातल्या संधींचा फायदा घेऊ शकत नाहीत. ३२ टक्के लोकांना या नोकऱ्यांकरता लागणाऱ्या विशिष्ट भाषेचे ज्ञान नसल्याने उदा. इंग्रजी ते याचा लाभ घेऊ शकत नाहीत. १० टक्के लोक असे आहेत की, त्यांना स्थानिक भाषेचे पुरेसे ज्ञान नसल्याने ते रोजगार मिळवू शकत नाहीत.

**गिग संदर्भातील भारतापुढील आव्हाने :**

एक विकसनशील देश म्हणून आपण विकासाचे अनेक टप्पे गाठले असले तरी दिवसागणिक वाढत जाणाऱ्या कार्यशील मनुष्यबळाला पूर्णवेळ रोजगार उपलब्ध करून देण्यात सरकारला अपेक्षित यश लाभलेले दिसत नाही, तर दुसरीकडे श्रमबाजारपेठेतील बहुतांश श्रमिक वर्ग सेवाक्षेत्रातील नव्याने निर्माण झालेल्या आधुनिक सेवांची निर्मिती करण्यास आणि त्यांचे कुशलतेने वितरण करण्यास म्हणावा तसा सक्षम नाही. भारतात आजही ४९ टक्के लोक ऑनलाईन सेवा आणि व्यवहारांपासून दूर आहेत.

पाश्चिमात्त्य विकसित देशांत सेवाक्षेत्रात ऑनलाईन पद्धतीने सेवा देणारे कामगार शासनाच्या सामाजिक सुरक्षितता क्रमांकाशी जोडलेले असतात. तेथील सरकारे या सामाजिक सुविधा क्रमांकाद्वारे अशा गिग वर्कर्सना बेरोजगार भत्ता, आरोग्य सेवा, बाळंतपणातील उपचार, विमा सरंक्षण, निवृत्तीवेतन इ. सुविधा देतात.

भारतातील गिग इकॉनॉमी आणि गिग वर्कर्सची वाढती व्याप्ती आणि संख्या पाहाता येणाऱ्या काळात भारतातील केंद्र व राज्य सरकारांना विकसित देशांच्या धर्तीवर अशा सामाजिक सोयी-सुविधा द्याव्या लागतील. २०२०-२१ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात या संदर्भात तरतूद करून गिग वर्कर्सना राज्य विमा योजनेचे लाभ देऊ केलेले आहेत. तसेच त्यांची राष्ट्रीय स्तरावर गणना करण्याची एक योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांच्या कामाच्या वेळा आणि त्यांची सुरक्षितता यासंदर्भातदेखील नव्याने नियमावली तयार केली आहे. अर्थात, गिग इकॉनॉमी व त्यातील श्रमिक यां संदर्भांत शासन स्तरावर सुरू असलेल्या योजना या स्वागतार्हच आहेत. मात्र त्यांच्या काटेकोर अंमलबजावणीशिवाय हे क्षेत्र सुधारून त्याचे लाभ कामगारांपर्यंत पोहोचणार नाहीत.

**भारतातील गिग इकॉनॉमीच्या वाढीची कारणमीमांसा :**

२०१९ पासून भारतात कोरोना साथीला जशी सुरुवात झाली तसतसे श्रमशक्तीच्या कामाच्या स्वरूपात आमूलाग्र बदल होत गेले. यातून गिग इकॉनॉमी जन्माला आली. त्याचाच परिपाक म्हणून टमटम कर्मचारी वर्ग वाढत गेला. असोसिएट चेंबर ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्री ऑफ इंडिया; (ASSOCCHAM)२०२४ पर्यंत भारताची आर्थिक वाढ ४५५ अब्ज अमेरिकी डॉलर्स होईल असा अंदाज वर्तविलेला आहे. जागतिक व्यवस्थापन सल्लागार संस्था वोस्टन कन्सल्टिंग ग्रुप (BCG) आणि मायकल अॅण्ड सुसान डेल फाऊंडेशन यांनी अलीकडेच प्रसिद्ध केलेला अहवालही याची पुष्टी करतो की, भारताची ही टमटम अर्थव्यवस्था पुढील तीन वर्षात तीन पटींनी वाढणार आहे. या काळात गिग इकॉनॉमी बिगरशेती क्षेत्रातील २४ दशलक्ष कामगारापर्यंत पोहोचणार आहे. सध्या गिग इकॉनॉमीमध्ये ८ दशलक्ष लोकांना रोजगार मिळतो. येत्या दहा वर्षांत त्यामध्ये लक्षणीयरीत्या वाढ होऊन ती १० दशलक्षपर्यंत उच्चांकी होईल. सध्या या अर्थव्यवस्थेतील होणाऱ्या उलाढालीचे एकूण मूल्य वा प्रमाणे २५० अब्ज अमेरिकी डॉलर्सपेक्षा जास्त आहे. भारताच्या जीडीपीमध्ये या गिग इकॉनॉमीद्वारे १.२५ टक्के योगदान दिले जात असल्याचेही हा अहवाल नमूद करतो.

ही अर्थव्यवस्था भारतात वाढीस लागण्याचे आणखी एक कारण म्हणजे यात टमटम वर्क कल्चरमुळे कंपन्यांचा ऑफिस स्पेस व कार्यालयीन उपकरणांवरील ओव्हरहेड खर्च मोठ्या प्रमाणावर वाचतो.

**गिगची आधारभूत वैशिष्ट्ये**

गिगची आधारभूत वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. सृजनशीलतेला वाव :**

सेवाक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अनेक कंपन्यांचे मुख्याधिकारी गेली काही वर्षे आपआपल्या पदांचे राजीनामे देऊन स्वत:ची वेगळी व नवी वाट चोखाळू लागलेले आहेत. यात सर्वाधिक पसंती, फ्रिलान्स स्वरूपातील कार्यसंस्कृतीकडे वळण्याकडे असलेली दिसून येते. त्यातून नवनवे आंत्रप्रेन्योर्स व मिड लेव्हल उद्योग उभे होत आहेत. यातून भारतातील तरुणाई सेवाक्षेत्रात स्वत:चे एक वेगळे अस्तित्व, एक नवी ओळख निर्माण करू पाहात आहे. कारण नोकरीमध्ये एका विशिष्ट टप्प्यावर पोहोचल्यानंतर जे अचानक चढ-उतार उद्भवतात. त्यात अडकण्यापेक्षा, पगारात समाधानकारक वाढ न होणे, नोकरीत अपेक्षित बढती न मिळणे इ. कारणांनी पूर्णवेळ वा कायम नोकरीविषयी नव्या पिढीमध्ये अनास्था निर्माण होत आहे. यातूनच भारतीय तरुण मोठ्या प्रमाणावर या गिग इकॉनॉमीकडे वळत आहे. यातूनच या इकॉनॉमीने देशाच्या २५ ते ३० टक्के श्रमबाजार व्यापलेला आहे, तर देशाच्या एकूण श्रमिकांपैकी ३५ टक्के श्रमिक या क्षेत्रात कार्यरत आहेत.

**२. नावीन्यपूर्ण कार्यसंस्कृती :**

गिग इकॉनॉमीमध्ये एखाद्या व्यावसायिक वा उद्योजकाद्वारे एखादा प्रकल्प पूर्ण करण्यास घेतलेला असतो. अथवा एखादे काम करून देण्याचा करार केलेला असतो. हा करार वा काम एका ठरावीक वेळेत पूर्ण करावयाचे असते. ही कामे कार्यालयातून वा ऑनसाईट करावी लागतात. ही एक ऑन डिमांड इकॉनॉमी असते. ज्यात कामगार स्वत: कामाचे वेळापत्रक तयार करू शकतात. तसेच कामासाठी कोणती असाइनमेंट घ्यायची, कामाचे कोणते लोकेशन निवडायचे, याचे पूर्ण स्वातंत्र्य वर्कर्सना असते.

**३. रोजगाराच्या व्यापक संधी :**

भारतात आज गिग इकॉनॉमी अंतर्गत सेवाक्षेत्राचा परीघ व्यापणारे अगणित व्यवसाय, उद्योग व कंपन्या पुढे येत आहेत. ग्रँब, ओला, उबेर, या कंपन्यांचे मोबाईल अॅप्स प्रचंड लोकप्रिय होत आहेत. तर दुसरीकडे स्विगी,

फूडपांडा, अमेझॉन, फ्लिपकार्ट, शॉपक्लुज, इ. सारखी ई-कॉमर्सची संकेतस्थळे नोकरीच्या अगणित संधींनी भरलेली आहेत. लेवसी ऑर्ग डॉट कॉम, गेट मी एक्सपर्टस् डॉट कॉम असे काही पोर्टल्स तरुणांना गिग इकॉनॉमीतील विविध प्लॅटफॉर्मशी जोडत आहेत. भारतात आज कंटेंट रायटिंग, भाषांतर, निवड, विक्री, डिजीटल मार्केटिंग, ब्रँटिंग, आर्किटेक्चर, बीआयएस, अकांऊटिंग, डेटा ॲनालीटिक्स, कन्सल्टिंग, काऊन्सेलिंग इ. गिग जॉब्ज उपलब्ध होत आहेत.

**४. गिगमधील करिअर संधी :**

या बाजारात व्यक्ती एकाच वेळी अनेक व्यवसाय संस्था व उद्योगांसाठी काम करू शकते. कामाचे शिक्षण व प्रशिक्षण होत होत रोजगाराच्या संधी येथे उपलब्ध असतात. जॉब मिळवणे खूप सोपे असते. झटपट उत्पन्न मिळते व वाढते. जॉब स्वीकारणे व तो स्वीच करून दुसरा मिळवणे ही प्रक्रिया खूप सोपी व जलद होणारी असते. या क्षेत्रात कामाचे व्यवस्थापन आज्ञावलींद्वारे केले जाते. त्यामुळे वॉसींगसारखे प्रकार नसतात. या क्षेत्रात कामाचे स्वरूप, प्रकार, वेळ, मर्यादा, मोबदला यांच्या निवडीचे असंख्य पर्याय उपलब्ध असतात व ते निवडीचे स्वातंत्र्य व्यक्तीला असते.

**५. कामाच्या स्वरूपातील लवचिकता :**

गिग इकॉनॉमीमध्ये अर्थव्यवस्थेच्या इतर क्षेत्रांच्या तुलनेत कामाचे स्वरूप अधिक लवचिक असते. तसेच ही लवचिकता श्रमिकांच्या लिंगाधारावर देखील उत्तम असते. जसे की, स्त्री-पुरुष असा फारसा भेद केला जात नाही. काम अल्पकालीन व दीर्घकालीन अशा दोन्ही स्वरूपाचे असते. पगार, भत्ते, इ. द्वारे मिळणारे उत्पन्न योग्य व चांगले मिळते. डिप लर्निंग, ब्लॉगचैन, रोबोटीक्स, लॅम्बडा, व्हर्च्युअल रिॲलिटी, रिॲक्ट. जे. एस. फायनल कट, प्रो-एक्स, इंस्टाग्राम, मार्केटिंग इ. गिग इकॉनॉमीतील सर्वाधिक उत्पन्न देणारे प्लॅटफार्मस आहेत.

**६. कौशल्याधारित कामांना वाव :**

या क्षेत्रात अंगमेहनत, प्रामाणिकपणा यासोबतच उत्तम तांत्रिक व व्यवस्थापकीय कौशल्याला फार महत्त्व असते. इथे पुस्तकी ज्ञानासोबतच टिम वर्क, संवाद कौशल्य यांसारख्या नेतृत्वगुणांसोबतच व्यवसायाशी संबंधित सॉट स्किल्सची गरज असते. या क्षेत्र एक व्यावसायिक, उद्योजक, गुंतवणूकदार किंवा अगदी कामगार म्हणूनही उतरायचे असेल तर हेल्थकेअर, रिअल इस्टेट, स्मॉर्ट सिटीज इ. बाबतची पुरेपूर व अपडेट माहिती व ज्ञान गरजेचे असते. या क्षेत्रात टिकायचे व वाढायचे असेल तर तुम्हाला मेंटर्सना सकारात्मक प्रश्न विचारता आले पाहिजेत. त्यातून गुंतागुंतीचे प्रश्नही सहजरीत्या सुटू लागतात.

**गिग इकॉनॉमीद्वारे होणारे फायदे :**

**१. उत्पादन खर्च अल्प :**

डिजीटल तंत्रज्ञानाच्या वापरातून गिग इकॉनॉमी सेवाक्षेत्रामध्ये अत्यंत अल्प उत्पादन खर्चात सेवांची निर्मिती व वितरणाचे कार्य करते. कारण या व्यवसायात ऑफ साईड कामगारांना सुलभरीत्या सामावून घेतले जाते. त्यातून कार्यालये, शाखा, उपशाखा इ. आस्थापनांवरील खर्च गिग इकॉनॉमीमध्ये करावा लागत नाही. या क्षेत्रातील कामगारवर्ग हा तात्पुरत्या करारावर असल्याने त्यांना सेवा, शर्ती, भत्ते, पगारवाढ, आरोग्य सेवा, विमा, निवृत्तीवेतन, पगारी रजा इ. वर कोणताही खर्च करावा लागत नाही.

**२. अल्पकालीन स्वरूप :**

या क्षेत्रातील उत्पादन व वितरणाच्या सेवांबाबत केले जाणारे करार हे मुख्यत्वे अल्पकालीन अशा स्वरूपांचेच असतात. त्यामुळे कामगार, कंत्राटदार, ग्राहक, उत्पादनासाठीची यंत्रणा, व्यवस्थापन यांच्यावर होणारा खर्च हा पूर्णवेळ, कायमस्वरूपाचा अथवा दीर्घकालीन असत नाही.

**३. शिक्षण व प्रशिक्षणावर कमी खर्च :**

गिग इकॉनॉमीमध्ये फ्री लान्सर एथ्रोप्रोनीअर्स अगोदरच स्वत:ची कौशल्ये विकसित करून स्वत:ला अपग्रेट करूनच जॉब, उद्योग, व्यवसाय यांच्या शोधात या गिग प्लॅटफॉर्मसवर येतात. परिणामी, यातील प्रवर्तकांना आपल्या कर्मचाऱ्यांच्या शिक्षण वा प्रशिक्षणावर फारसा खर्च करावा लागत नाही.

**४. आठवड्याच्या सात दिवस व दिवसाच्या चोवीस तास सेवा :**

बहुतांश गिग प्लॅटफॉर्मसवरील सेवा या संपूर्ण आठवडाभर व दिवसांच्या २४ तास सुरू असतात. परिणामी ग्राहकवर्ग, मागणी, सेवेचा पुरवठा, निर्मिती, व्यवस्थापन, कामगारांची उपलब्धता इ. आर्थिक, उत्पादन व व्यवस्थापनविषयक क्रियाकल्पांची व्याप्ती वाढून प्रमाणाच्या बचती मिळतात. मोठ्या प्रमाणावरील ग्राहकवर्ग जोडला जातो. दर्जेदार सेवा देता येतात.

**५. श्रमबाजाराचे संतुलन साधले जाते :**

गिग इकॉनॉमीमुळे श्रमाची मागणी व श्रमाचा पुरवठा यातील असमतोल दूर होतो. अनैच्छिक बेकारी, हंगामी बेकारी, तांत्रिक बेकारी, छुपी बेकारी अशा बेकारीच्या अनेक प्रकारांवर मात करून श्रमिक वर्ग कोणत्याही मध्यस्तांशिवाय कामगार थेट संबंधित उद्योग समूहांशी जोडला जातो. आणि तो उद्योग आपल्या कामगाराला थेट ग्राहकांशी जोडतो. त्यामुळे यात नोकरभरती, त्यातील मध्यस्थ इ. प्रकार नसतात.

**गिग अर्थव्यवस्थेच्या मर्यादा :**

वरीलप्रमाणे गिग इकॉनॉमी या बाजारपेठीय प्रारूपाच्या फायद्यांची जंत्री पाहात असताना त्यामुळे देश-काल-स्थितीपरत्वे ज्या मर्यादा पुढे येत आहेत त्या पुढीलप्रमाणे :-

**१. कामाविषयीची बांधिलकी :**

गिग इकॉनॉमीतील सेवांविषयीचे करार हे अत्यंत तात्पुरत्या स्वरूपाचे असल्याने कामगारांवर कंपनीचे फारसे बंधन नसते व कामगारवर्गही कंपनी व तिच्या ध्येय-धोरणांशी बांधिल नसतो. त्याला एखादा चांगला प्रकल्प व नोकरीची संधी, उपलब्ध होताच तो सोडून जातो. यामध्ये फ्रिलान्सर कर्मचाऱ्यांच्या या संस्कृतीच्या या मर्यादा पडतात.

**२. कामगार कल्याणाला बगल :**

लोकशाही व समाजवादी तत्त्वप्रणालीमध्ये कामगारांच्या कल्याणाप्रति जी नैतिक बांधिलकी जोपासली जाते ती इथे अजिबात नसते. कामगारांना कोणत्याही सामाजिक-आर्थिक सोयी-सुविधा, शाश्वती दिली जात नाही. अगदी त्यांना निर्वाह पातळीपेक्षाही कमी वेतन दिले जाते.

**३. स्व-विकासाला अल्पवाव :**

संबंधित कंपनी, उद्योग वा तो व्यवसाय यांच्या व्यावसायिक व आर्थिक हितसंबंधांव्यतिरिक्त कामगारांना बढती, पगारवाढ, बोनस, भत्ते, सेवा-शाश्वती, निवृत्ती वेतन इ. स्व-विकासाचे कोणतेही लाभ दिले जात नाहीत. परिणामी, कामगारांचा राहाणीमानाचा व सामाजिक दर्जा उंचावत नाही, कामात फारसा बदल होत नसल्याने कालांतराने ते निरस वाटते.

**४. कामगारांत सौदाशक्तीचा अभाव :**

गिग अर्थरचनेत कामगार वर्ग हा असंघटित असतो, त्यांना कोणत्याही प्रकारचा कायद्याचे सुरक्षाकवच नसते. परिणामी, ते काम करीत असलेल्या कंपनी, व्यवसाय, उद्योग, यांच्याकडे ते आपल्या मागण्या, तक्रारी मांडण्यास असमर्थ ठरतात. कारण त्यांची सौदाशक्ती कमी असते, अशावेळी प्रवर्तकांकडून त्यांचे आर्थिक शोषण होत राहाते. कामामध्ये त्यांना सतत असुरक्षिततेची भावना राहाते. स्थिरता, समाधान मिळत नाही. थोडक्यात, गिग बाजारात रोजगार तर मिळतो. मात्र तो शाश्वत व चिरंजीवी स्वरूपाचा असतोच असे नाही.

**समारोप :**

एकूणच विकसित जगाचा विचार करता आपल्या

भारतातील गिग इकॉनॉमी आजही नव्वदीच्या कालखंडातच अडकून पडलेली दिसून येते. कारण लोंरिश व्हेंचर्स या फर्मने केलेल्या सर्वेक्षणानुसार कोरोनाकाळात भारतातील ९० टक्के गिग वर्कर्सनी त्यांचे रोजगार गमावलेले होते व ते आपल्या भविष्याविषयी चिंताग्रस्त होते. शिवाय या कामगारांना सेवानिवृत्तीनंतरची निवृत्तीवेतनाची हमी, सामाजिक-आर्थिक-आरोग्यविषयक सेवा-सुविधांविषयीची हमी, पदोन्नती, सेवाशाश्वती इ. बाबींचा पूर्णपणे अभाव असल्याने त्यांचा जीवनमानाचा स्तर उंचावणे, राहाणीमान सुधारणे, सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होणे, कौशल्यविकास घडून येणे, उत्पादकता वाढणे, नावीन्यनिर्मिती, सृजनशीलतेत वाढ होणे इ. वर अनेक मर्यादा येतात.

नव-उदारमतवादी व्यवस्थेच्या पोटातून जन्माला आलेले व क्रोनी कॅपीटयचालीझमऱ्या प्रारूपातून वाढीला लागलेले गिग इकॉनॉमीसारखे लेबर मार्केटचे प्रतिमान आपल्या वेगाने होणाऱ्या वाढीतून १४० कोटींच्या भारताला, इथल्या श्रमशक्तीला नेमके कुठे घेऊन जाणार आहे? याचे उत्तर सध्यातरी 'कालाय तस्मै नम:' असेच द्यावे लागेल.

**संदर्भ सूची :**


१. Duri J.M. – What is the Gig Economy-Lenskat – 23 Feb.2023.

२. Evich Ben Lutk - Gig Economy Statistics for 2023 –Technical Features writer – 22 Aug-2023.

३. NITI Aayog- Indias booming gig and Platfrom Economy" 27 Jun-2022-by PMO office-New Delhi .

४. Pradhan Subanika - Gig Economy – An insightful, review on NITI Aatog Report —ISME-16 Aug 2023.

५. Rupa Korade, Agaraval Prachi, Adimulam Deepthi, Gandhi Mahika - Gig Economy India-2020/2021 – Flame University, Pune, India – Wage Indicutor.

६. https://www.niti.org.ac.in -27 Jan.2022

७. https://arzonala.ac.in 23 Mar. 2022

८. पाटील पंकज - गिग इकॉनॉमीकडे लक्ष देणे आवश्यक -देशदुत-१२ जाने २०२२.

९. शेटीया रिता : गिग ची बिग अर्थव्यवस्था : प्रभात वृत्तसेवा : २८ ऑक्टोबर २०२२.

१०. शेटीया रिता - दृष्टिकोन - गिग व्यवस्था व्हावी सर्वहिताची - सकाळ- १० जाने २०२३.


◆

फक्त एका उत्पन्नावर अवलंबून राहू नका,
उत्पन्नाचे अनेक मार्ग निर्माण करा.

**- वॉरेन बफे**

# एस. वेंकिटरमणन (१९३१-२०२३)

**संतोष दास्ताने** †

**प्रस्तावना :**

भारतीय रिझर्व्ह बँकेचे अठरावे गव्हर्नर एस. वेंकिटरमणन (वेंकी) यांचे १८ नोव्हेंबर २०२३ रोजी चेन्नई येथे दुःखद निधन झाले. निधनसमयी ते ९२ वर्षांचे होते. त्यांचा जन्म जानेवारी १९३१ मधील. डिसेंबर १९९० ते डिसेंबर १९९२ या दोन वर्षांच्या काळात ते गव्हर्नरपदी होते. त्यांची ती कारकीर्द काहीशी छोटी असली, तरी त्यांच्या कामगिरीने बँकेच्या इतिहासात त्यांचे नाव अतिशय आदराने घेतले जाते. त्यांचे मूळ शिक्षण थिरूअनंथपुरम (केरळ विद्यापीठ) येथे विज्ञान विषयातील. पुढे अमेरिकेत पिट्सबर्ग येथे त्यांनी औद्योगिक प्रशासन या विषयात विशेष प्रावीण्य मिळवले. नंतर त्यांनी भारतीय प्रशासन सेवेत प्रवेश केला. तामिळनाडू व कर्नाटक येथे विविध पदांवर काम केले. जागतिक बँकेत प्रतिनियुक्तीवर त्यांनी 'अन्नपुरवठा व पोषण' हा विभाग तीन वर्षे सांभाळला. पंतप्रधान राजीव गांधी यांच्या कारकिर्दीत १९८५ ते ८९ या मुदतीत ते केंद्रीय वित्तसचिव पदावर कार्यरत होते. ऊर्जा आणि औद्योगिक विकास या खात्यांमध्येदेखील त्यांनी काही वर्षे काम केले. देशातील हरितक्रांतीच्या काळामध्ये सी. सुब्रमण्यम यांच्याबरोबरीने त्यांचे लक्षणीय योगदान होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी अशोक लेलंड, रिलायन्स आदी कंपन्यांच्या संचालक मंडळावर काम पाहिले. पुणे येथे गोखले अर्थशास्त्र संस्थेमध्ये १९९८ साली त्यांनी 'काळे स्मृती व्याख्यान' दिले. देशाच्या विकास प्रयत्नातील कूटप्रश्न असा त्यांचा व्याख्यानाचा विषय होता. विकास साधत असताना लोकशाही, समन्याय, खासगीकरण, राज्यसंस्थेची भूमिका, गरिबीसारखे अवघड प्रश्न, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांचे दबाव अशा सर्व घटकांचा नव्याने विचार करावा लागेल. जुन्या समस्यांची नव्या दृष्टिकोनातून उत्तरे शोधावी लागतील. एकूण आर्थिक धोरण प्रक्रियेची पुनर्मांडणी करावी लागेल, असे त्यांचे प्रतिपादन होते.[१]

**वेंकिटरमणन : अमूल्य योगदान**

भारतात सन १९८० ते १९९० हे दशक आर्थिक विस्ताराचे व विकासाचे होते हे खरे आहे; पण त्या काळात अनेक आर्थिक-वित्तीय समस्यांचा अनुभव देशाला घ्यावा लागला. इराक-कुवेत युद्धाचे थेट परिणाम देशाला जाणवू लागले होते. किंमत निर्देशांकातील जलद वाढ, आर्थिक विकासाचा नरम राहिलेला दर, प्रतिकूल

† माजी अध्यक्ष व माजी विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र.६३, भ्रमणध्वनी : ९८२२००९९५४, ई-मेल : santosh.dastane@gmail.com

विदेशी व्यवहारतोल, आटत चाललेला परकीय चलनसाठा, भरमसाठ विदेशी कर्जांच्या मुद्दल-व्याजाचे डोईजड हप्ते अशी मोठी आर्थिक संकटे अतिशय त्रासदायक ठरत होती. वित्तीय तुटीचे प्रमाण ९% या धोकादायक पातळीवर पोचले होते. परकीय चलनसाठा १.१ बिलियन डॉलर इतक्या निम्न पातळीवर आला होता. आंतरराष्ट्रीय दर्जांकन संस्थांनी भारताचा दर्जा कनिष्ठ वर्गात नेऊन ठेवला होता. विदेशी कर्जाबाबत हप्ताफेड आणि व्याजफेड करू न शकण्याची नामुष्की सरकारवर आली होती. पण तो अनवस्था प्रसंग वेंकी यांनी धीराने टाळला.

वेंकी यांनी वित्तसचिव या नात्याने (आणि नंतर गव्हर्नर या नात्याने) या संकटांमधून तरून जाण्यासाठी शर्थीने प्रयत्न केले. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा स्थिरीकरणाचा कार्यक्रम त्यांनी स्वीकारला, त्याचा नेटाने पाठपुरावा केला. आर्थिक उदारीकरणास चालना दिली. उदारीकरण, खासगीकरण या क्रांतिकारी गोष्टी अंतर्भूत असणारे नवे आर्थिक धोरण जुलै १९९१ मध्ये औपचारिकरीत्या सुरू झाले, असे आपण मानतो. पण अनेक छोटी पावले उचलून त्या नव्या युगाची पूर्वतयारी करण्यात वेंकी आघाडीवर होते. रुपया-डॉलरचा विनिमय दर तरता ठेवण्याच्या दिशेने त्यांनी पावले उचलली. निर्यातदारांनी आपल्याकडील ४०% डॉलर्स अधिकृत दराने व ६०% डॉलर्स बाजारातील खुल्या दराने वापरण्याची मुभा देण्याचे धोरण त्यांनी अमलात आणले. यामुळे निर्यातदारांना चांगला फायदा होत असे. या त्यांच्या धोरणाचे सर्वत्र स्वागत झाले. परिस्थिती पाहून रुपयाचे अवमूल्यन करण्याचा अतिशय नाजूक निर्णय घेण्यासही त्यांनी अनमान केला नाही. जुलै १९९१ मध्ये दोन हप्त्यात रुपयाचे सुमारे १८ टक्क्यांनी अवमूल्यन करण्यात आले. या निर्णयावर अपेक्षेनुसार कठोर टीकाही झाली. पण अर्थव्यवस्थेचे दीर्घकालीन स्थैर्य पाहाता त्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता, हेही खरे आहे. सोने गहाण ठेवून विदेशी कर्ज मिळवण्याचा धाडसी निर्णय पंतप्रधान चंद्रशेखर यांनी घेतला. वेंकी त्यावेळी गव्हर्नर होते. चार हप्त्यात एकूण ५० टन सोने बँक ऑफ इंग्लंडकडे गहाण ठेवून ५० कोटी डॉलरचे कर्ज उभारून घोर आर्थिक संकटातून वेंकी यांनी देशाला बाहेर काढले. पुढे नवे आर्थिक धोरण जोमाने राबवण्यासाठी या उपायांचा निश्चितच फायदा झाला. आर्थिक बदल घडवून आणताना त्यांनी वित्तसचिव या नात्याने पूर्वी स्वतः घेतलेले काही निर्णय नंतर गव्हर्नर या नात्याने फिरवण्याची वेळ आली. पण तेही त्यांनी केले. व्यापक देशहित आणि बदलती परिस्थिती पाहाता त्यांनी सर्व पावले अतिशय जाणीवपूर्वक आणि वस्तुनिष्ठ विचारांती टाकली. वेंकी यांच्या आधीचे गव्हर्नर आर. एन. मल्होत्रा यांचे वित्त मंत्रालयातील सचिव आणि उच्च अधिकारी यांच्याशी मतभेद झाल्याने त्यांनी आपली मुदत संपण्याआधीच राजीनामा दिला होता. त्या पार्श्वभूमीवर गव्हर्नरपद स्वीकारल्यानंतर त्यांनी रिझर्व्ह बँक आणि वित्त मंत्रालय यांच्यातील मतभेद हळूहळू मिटवले. चर्चा, सहमती व सहकार्य ही त्यांच्या कामाची पद्धती होती. व्यापार, वित्त व्यवहार, नाणे बाजार, भांडवल बाजार येथील घडामोडींवर त्यांचे बारीक लक्ष असे. तेथील अद्ययावत माहिती मिळत राहावी यासाठी त्यांची धडपड असे. उच्च पातळीवर काम करणाऱ्या रिझर्व्ह बँक व वित्त मंत्रालय या दोन संस्थांमध्ये परस्पर विश्वास आणि सहकार्याची भावना वेंकी यांनी निर्माण केली. 'पूर्वी म्हणजे अर्थमंत्री कृष्णम्माचारी यांच्या काळात रिझर्व्ह बँकेला अर्थमंत्रालयाच्या तुलनेने कनिष्ठ दर्जाची वागणूक मिळे.' 'रिझर्व्ह बँक हे सरकारचे कनिष्ठ पातळीवरील खाते आहे', असे त्यांचे उद्‌गार प्रसिद्ध आहेत. पण १९९०च्या दशकापासून पुढे रिझर्व्ह बँक व अर्थमंत्रालय - केंद्र सरकार यांचे बरोबरीचे आणि सहकाराचे नाते स्थिरावू लागले. वेंकी आणि नंतर सी. रंगराजन यांची कामगिरी हा प्रगतीशील सकारात्मक

दृष्टिकोन प्रस्थापित करण्यास कारणीभूत होती.[२] खा-उ-जा काळातील संस्थात्मक स्थित्यंतरे, वित्तीय क्षेत्रातील संरचनात्मक बदल, नरसिंहन समितीची स्थापना (१९९१) या सगळ्या घडामोडींना मुख्यतः वेंकी कारणीभूत होते. चहूबाजूंनी विकसित झालेले वित्तीय क्षेत्राचे आजचे स्वरूप ही वेंकी आणि त्यानंतर रंगराजन यांनी जोपासलेल्या रोपट्यांचे फळ आहे हे निर्विवाद! 'मोठ्या आर्थिक संकटातून देशाला वाचवणे व जलद आर्थिक विकासास चालना देणे ही अवघड कामे वेंकी यांनी अत्यंत कुशलतेने केली', असे श्रेय एकविसावे गव्हर्नर वाय. व्ही. रेड्डी यांनी आपल्या पुस्तकात दिले आहे.[३] वेंकी यांच्यानंतरचे आणि त्यांचे जुने सहकारी असलेले गव्हर्नर सी. रंगराजन यांनीही आपल्या श्रद्धांजलीपर लेखात वेंकींबद्दल अतिशय गौरवाने लिहिले आहे.[४] रिझर्व्ह बँकेच्या सर्वच गव्हर्नरांच्या कामगिरीचा समग्र आढावा घेताना गोकुळ राठी यांनीही वेंकी यांच्या कार्याचे यथायोग्य मूल्यमापन केले आहे.[५]

रिझर्व्ह बँकेचे पहिले गव्हर्नर सर ओस्बोर्न स्मिथ (कारकीर्द एप्रिल १९३५ ते जून १९३७) यांचे छायाचित्र रिझर्व्ह बँकेच्या बैठक कक्षात नव्हते. त्यांचे एक छायाचित्र बँकेच्या मद्रास येथील कार्यालयात होते. त्यावरून पुन्हा मोठे छायाचित्र बनवून घेऊन ते रिझर्व्ह बँकेच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयातील बैठक कक्षात लावण्यासाठी वेंकी यांनी पुढाकार घेतला. ते चित्र तेथे लावण्याची व्यवस्था केली. मात्र प्रत्यक्ष लावण्याचा योग त्यांचे उत्तराधिकारी रंगराजन यांच्या कारकिर्दीत आला.[६]

**रोखे घोटाळा :**

'बिग बुल' या नावाने (कु)प्रसिद्ध असलेला शेअर दलाल हर्षद मेहता याने केलेला रोखे घोटाळा हा देशाच्या समकालीन वित्तीय इतिहासातील एक काळाकुट्ट अध्याय होय! वेंकींच्या कारकिर्दीतच एप्रिल १९९२ मध्ये हा उघडकीस आला. बँका आणि वित्तीय संस्थांची जुनाट कार्यप्रणाली, रिझर्व्ह बँकेची वित्तीय संस्थांच्या परिनिरीक्षणाची ढिसाळ यंत्रणा, अतिशय कुचकामी अशी बँकांमधील अंतर्गत नियंत्रण व पडताळणी पद्धती, काही बँक अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार, कार्यपद्धतीतील त्रुटींचा फायदा घेण्याची हर्षद मेहता आणि काही शेअर दलालांची चलाखी या सगळ्यांमुळे पाहाता पाहाता सुमारे पाच हजार कोटी रुपयांचा रोखे घोटाळा घडून आला. शेअर बाजार गगनाला भिडला. यात स्टेट बँक, नेशनल हौसिंग बँक आणि इतर काही बँका व काही विदेशी बँका सामील होत्या. शेअर बाजारात पैसे गुंतवून उत्पन्न मिळवणे याची सुरुवात राष्ट्रीयीकृत बँकांनीच केली होती. केवळ व्याजाचे उत्पन्न अपुरे पडत आहे म्हणून शेअर बाजारात पैसे गुंतवण्याची परवानगी बँकांनी वित्त मंत्रालयाकडून १९८७ मध्येच मिळवली होती. यातील धोके व जोखीम दाखवून देण्याचे व या धोरणाला स्पष्ट विरोध करण्याचे काम रिझर्व्ह बँकेने केले होते. पण सरकारने त्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करून या धोरणाला हिरवा कंदील दाखवला. उलट १९९१ साली हे धोरण आणखी शिथिल केले. बँका, शेअर दलाल, सामान्य नवगुंतवणूकदार यांच्या सक्रियतेने शेअर बाजार रोज नवनवीन उच्चांक गाठू लागला. घोटाळा उघडकीस आल्यावर मात्र हा सगळा बुडबुडा फुटला व शेअर बाजार धाडकन कोसळला. रोखे घोटाळ्याचा काहीसा अंदाज वेंकी यांना आला होता, त्यावर उपाययोजना त्यांनी सुरूही केली होती. पण रिझर्व्ह बँकेची यंत्रणाच सदोष होती. शेअर बाजारातील उसळी नेमकी कशामुळे दिसत आहे याचा अंदाज कोणालाच येत नव्हता. संयुक्त संसदीय समिती, केंद्रीय अन्वेषण यंत्रणा व रिझर्व्ह बँक या सगळ्यांनी या प्रकरणाची नंतर चौकशी केली. रिझर्व्ह बँक आणि एकूणच वित्तीय संस्थांच्या कार्यपद्धतीतील अनेक उणिवा यामुळे उघडकीस आल्या. त्यानंतर वित्तीय क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या. यात अधिक पारदर्शकता, उत्तरदायित्व

आणण्यात आले. या सर्व घोटाळ्यास सेबी जास्त प्रमाणात जबाबदार होती हे वेंकी यांनी मांडले; पण सर्व घडामोडींची नैतिक जबाबदारी त्यांनी प्रामाणिकपणे घेतली.

'एस. वेंकिटरमणन म्हणजे रिझर्व्ह बँकेचा एक अतिशय कामसू, कार्यकुशल, अभ्यासू व प्रामाणिक असा गव्हर्नर' अशा भाषेत त्यांच्या कारकिर्दीची बँकेच्या इतिहासात नक्कीच नोंद होईल.

त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!!

**टीपा :**


१. Dilemmas of Development : The Indian Experience, by S. Venkitaramanan, Gokhale Institute of Politics and Economics, Pune, 1998, P.P.1-16.

२. Dialogue of the Deaf : The Government & the RBI, by T. C. A. Srinivasa Raghavan, Westland Publications, Chennai, 2017, P.P.166-67.

३. Advice & Dissent : My Life in Public Service, by Y. V. Reddy, Harper Collins, New Delhi, 2018.

४. Indian Express, 22 Nov. 2023 .

५. पहा : R B I Governors : The Czars of Monetary Policy (1935-2021) by Gokul Rathi, Rupa Publications, New Delhi, 2023, P.P.127-33.

६. ही सर्व हकिगत मुळातून वाचण्यासाठी पहा : Barons of Banking - Glimpses of Indian Banking History, by Dadabhoy Bakhtiar, Random House India, Noida, 2013, P.P.160.


◆

---

कष्ट ही अशी प्रेरक शक्ती आहे, जी माणसाची क्षमता तपासते आणि त्याला विकासाच्या मार्गावर नेते.

**- अनामिक**

---

आपल्या पैशाचा वापर आपल्या लाभाला आणि नशिबाला प्रभावित करतो, अर्थशास्त्रामध्ये पैसा भ्रम संपत्ती प्रभावित करतो.

**- तोबा विटा**

---

# इकॉनॉमिक्स ऑफ सर्व्हायव्हल सस्टेनेबल, इन्क्ल्युझिव अँड इक्विटेबल प्रोस्पेरिटी

**बद्रीनाथ हिरालाल दामजी** †

**पुस्तकाचे नाव :** इकॉनॉमिक्स ऑफ सर्व्हायव्हल सस्टेनेबल, इन्क्लुझिव अँड इक्विटेबल प्रोस्पेरिटी
**लेखक :** डॉ. गिरीश जाखोटिया
आंतरराष्ट्रीय आर्थिक आणि व्यावसायिक सल्लागार
**प्रकाशक :** मणिपाल युनिव्हर्सल प्रेस
ISBN : 978-81-958891-9-8
**एकूण पृष्ठे :** ५९४ **किंमत :** रु. १२००

युक्रेन आणि रशिया यांच्यातील युद्ध, इस्राईल आणि पॅलेस्टाईन यांच्यातील संघर्ष यांसारख्या घटनांमुळे आंतरराष्ट्रीय आर्थिक स्थिती झपाट्याने प्रभावित होत आहे. याशिवाय, अफगाणिस्तान, सोमालिया, द सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक, द डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो, म्यानमार, कोलंबिया इत्यादी देश अंतर्गत युद्धाशी झुंज देत आहेत. मेक्सिको हा त्यांच्याच देशातील ड्रग्ज व्यापारी संघाशी लढत आहे. सध्या जगभरात असे एकूण ३२ युद्ध किंवा युद्ध सदृश्य संघर्ष सुरू आहेत. याचा परिणाम जागतिक आर्थिक पर्यावरणावर होत आहे. शाश्वत विकासाचे गुणगान करणाऱ्या राष्ट्रांना आंतरराष्ट्रीय आर्थिक अनिश्चिततेला सामोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीत आर्थिक वृद्धीचा दर वाढवणे आणि तो टिकवून ठेवणे कठीण जात आहे. यासंदर्भात डॉ. गिरीश जाखोटिया यांनी वैश्विक आर्थिक विकासाची त्रिसूत्री स्पष्ट केली आहे. त्यांनी काही उपयुक्त आर्थिक प्रारूपेही मांडली आहेत. त्यांचे इकॉनॉमिक्स ऑफ सर्व्हायव्हल हे पुस्तक मणिपाल युनिव्हर्सल प्रेसने प्रकाशित केले आहे. सदर ग्रंथाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

डॉ. जाखोटिया यांनी विद्यमान जागतिक आर्थिक स्थितीचा व त्यातील आव्हानांचा वेध घेतला आहे. विविध देशांच्या संदर्भात निरनिराळी उदाहरणे देऊन त्यांनी चिकित्सात्मक चर्चा केली आहे. प्रस्तुत ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ आव्हानांची चर्चा न करता त्यावर कशी मात करता येईल ते सुद्धा सविस्तरपणे मांडले आहे. "Economics of Survival" हे या ग्रंथाचे शीर्षक समर्पक व लक्षवेधी आहे. लेखकाने या ग्रंथाचा संपूर्ण सार या शीर्षकातून व्यक्त करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. व्यक्ती असो वा राष्ट्र त्यांच्यादृष्टीने निर्वाह किंवा जीवन जगणे महत्त्वपूर्ण असते.

† प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, द.भै.फ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.
आजीव सभासद क्र.७७५, भ्रमणध्वनी : ९४२१०७६४६३, ई-मेल : damjibh@gmail.com

अर्थात, निर्वाह किंवा जीवन जगणे शाश्वत असले पाहिजे. म्हणूनच आपला आर्थिक उत्कर्ष हा अल्पजीवी स्वरूपाचा न राहाता चिरंतन टिकणारा असला पाहिजे. यासाठी आर्थिक उत्कर्ष सर्वसमावेशक असणे आवश्यक ठरते. आर्थिक विकासाचे वितरण न्याय्यस्वरूपाचेही असले पाहिजे. म्हणजेच राष्ट्रांचे अगर जगाचे जीवनाचे अर्थशास्त्र हे चिरंजीवी, सर्वसमावेशक आणि न्याय्य उत्कर्षावर अवलंबून आहे. प्रस्तुत ग्रंथात लेखकाने या तिन्ही बाबींमध्ये घातलेली सुयोग्य सांगड त्यांच्या संशोधनपर अभ्यासाची साक्ष देते.

सध्या जग गोंधळलेल्या स्थितीत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे जग आर्थिकदृष्ट्या विभागले गेलेले आहे आणि राजकीयदृष्ट्या विस्कळीतपणा आलेला आहे. जगातील श्रीमंत व गरीब अशा सर्वच राष्ट्रांना आर्थिक व सामाजिक अनिश्चिततेच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. भूराजकीय आव्हानांमुळे सामाजिक-राजकीय संबंधातील गुंतागुंत वाढत आहे. मागील तीन दशकात जगभरात आमूलाग्र बदल झाले आहेत. थॉमस पिकेटीसारख्या अर्थतज्ज्ञाने पाश्चिमात्य जगातील वाढत्या विषमतेचे कारण या संदर्भात मांडले आहे. मागील दोन दशकात ब्रिक्स राष्ट्रांचा जागतिक अर्थव्यवस्थेवर प्रभाव पडलेला आहे. या तथ्याची चर्चा पिकेटेनी केलेली नसली तरी जागतिक सामाजिक-आर्थिक प्रश्न आता सर्वश्रुत आहेत. अर्थात, सद्यस्थितीत जगाच्या दृष्टीने महत्त्वाचे काही असेल तर ते म्हणजे शाश्वत उपाय होत. अलीकडील काळात अतिराष्ट्रवाद आणि लोकप्रियतावाद याकडे झुकल्यामुळे जागतिक शांतता आणि संपन्नता यापुढे आव्हाने निर्माण झाली आहेत. संपूर्ण विश्व हे आर्थिक आणीबाणीच्या स्थितीकडे जवळजवळ झेपावलेले आहे. या संदर्भात प्रस्तुत ग्रंथाचे लेखक असे मत मांडतात की विविध आव्हानांच्या या पार्श्वभूमीवर जीवन जगण्याचे अर्थशास्त्र अभ्यासून विविध उपाय मांडण्यावर भर द्यावा लागेल. जगापुढील प्रश्न अनेक आहेत. तसेच ते गुंतागुंतीचे आणि सहसंबंधित आहेत.

लेखकाने या ग्रंथात काही महत्त्वपूर्ण प्रश्न उपस्थित केले आहेत. उदाहरणार्थ, अमेरिकेत भागधारक मूल्यवर्धनावर अतिरिक्त भर दिल्याचा परिणाम म्हणून आर्थिक विषमता वाढलेली नाही ना? जर्मनी वगळता इतर युरोपियन देशांच्या अर्थव्यवस्था उधळपट्टीच्या जुन्या सवयींमुळे आणि पुनर्निर्माणाच्या अभावामुळे त्रस्त तर नाहीत ना? चीन २०२५ नंतरसुद्धा तिची सामाजिक आर्थिक वीण शाश्वत ठेवण्यात समर्थ राहील काय? अंतर्गत असंतुलनाच्या बोजामुळे भारतातील पडझड होत आहे की जागतिक घटक त्याला जबाबदार आहेत? जपान पुन्हा एकदा वेगाने विकास साधेल की शेजारी राष्ट्रांच्या वादात अडकून राहील? रशियाला २०२५ नंतरसुद्धा तेल महसूल मिळत राहील काय? मध्यपूर्वेकडील राष्ट्रे मुस्लीम धर्मांधतेच्या वाढत्या हिंसेने प्रभावित तर होत नाहीत ना?

लेखक पुढे म्हणतात की, वरील सर्व प्रश्नांची उत्तरे केवळ अर्थशास्त्रात आढळू शकत नाहीत. कारण केवळ अर्थशास्त्र बिघडल्यामुळे या समस्या निर्माण झालेल्या नाहीत. यामुळे व्यापक व सर्वसमावेशक दृष्टिकोन स्वीकारून अस्तित्व टिकवून ठेवण्याकरिता उपाययोजना करण्याची गरज आहे. न्याय्य आणि सर्वसमावेशक अर्थशास्त्राचा स्वीकार केल्याशिवाय अर्थव्यवस्था शाश्वत होणार नाही. निर्वाहाच्या अर्थशास्त्राचा स्वीकार केला नाही तर आगामी दशकात आर्थिक पडझड होऊ शकते.

लेखकाने या ग्रंथात आंतरराष्ट्रीय आर्थिक स्थितीविषयी काही महत्त्वपूर्ण निरीक्षणे व मते नोंदवलेली आहेत.

१. जगभरामध्ये खंड प्राप्तकर्ते संपत्ती जमवण्यासाठी आर्थिक जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा पुरेपूर वापर करत आहेत.
२. आर्थिक अनिश्चितता ही अमेरिकेला जागतिक

व्यवस्थेपासून एकटी पाडत आहे. कारण स्वतःच्या समस्या सोडवण्यास अमेरिका प्रथम प्राधान्य देत आहे. चीन, रशिया, इराण आणि इतर धर्मांध राष्ट्रे अमेरिकेच्या मजबूत हस्तक्षेपाचा अभाव असणाऱ्या क्षेत्रात आपला प्रभाव वाढवत आहेत.

३. फ्रान्स आणि इटलीसारखे देश आर्थिक विषमतेचे दुःख दाबून टाकण्याच्या उद्देशाने युरो व्यूहरचना नष्ट करण्यासाठी आणि होणाऱ्या परिणामास जर्मनीला जबाबदार धरण्यासाठी तयार आहेत. यामुळे जर्मनी एकाकी पडू शकतो.

४. भारतातील आर्थिक विषमता हळूहळू निराशाजनक सामाजिक स्थितीकडे घेऊन जात आहे. नक्षलवादी व पाकिस्तानसारखे बेजबाबदार शेजारी देश या स्थितीचा गैरफायदा घेऊ शकतात. यातून आणखी सामाजिक पडझड संभवते.

५. खनिज तेलातून मिळालेला पैसा अर्थव्यवस्थेच्या पुनर्बांधणीसाठी पुरेसा ठरणार नाही हे रशियाला माहीत असल्याने तो विस्तारवादी उपायांचा अवलंब करून शेजारी राष्ट्रांचे जीवन केविलवाणे बनवू शकतो.

६. केवळ काही शेख, सुलतान आणि त्यांचे मत्ता व्यवस्थापक यांची आर्थिक भरभराट इस्लामी सामाजिक वीण ढिली करत आहेत. जगभरातील इस्लामी राष्ट्रांवर याचे परिणाम होणार आहेत.

७. एकंदरित वैश्विक आर्थिक पडझडीचा परिणाम म्हणून बरेच आफ्रिकन आणि आशियाई देश आर्थिक उत्कर्षाची संधी गमावतील.

८. मलेशिया आणि इंडोनेशियासारखे उदार व सांस्कृतिकदृष्ट्या उदयास आलेले देश मूलतत्त्ववादी इस्लामाकडे झुकत आहेत.

९. दोन दशकांपेक्षा अधिक काळापासून जपान मंदीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत आहे. याबाबतीत अजूनही जपानला योग्य उपाय सापडलेला नाही.

प्रस्तुत ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे यात सर्वसमावेशक अशा चार प्रमुख घटकांवर भर देण्यात आला आहे.

१. वैश्विक सामाजिक, आर्थिक समस्यांचे विवेकनिष्ठ विश्लेषण.

२. आर्थिक उत्कर्ष, सर्वसमावेशकता, टिकाऊपणा आणि समानता यांची आदर्श व्याख्या.

३. वैश्विक आर्थिक सहकार्याच्या संकल्पना.

४. योग्य आर्थिक प्रारूपाची रचना.

सदर ग्रंथ विद्यमान आर्थिक आणि सामाजिक संकल्पना, तत्त्वे आणि प्रतिमान यांचे मूल्यमापन करणे, त्यात दुरुस्ती करणे किंवा बदल करणे या हेतूने लिहिण्यात आला आहे. तसेच नवीन सामाजिक रचना वैश्विक आणि प्रादेशिक संसाधने, तंत्र-आर्थिक संतुलन यावर आधारित वैश्विक आर्थिक शाश्वततेचा सर्वंकष दृष्टिकोन ठरवणे हाही हेतू या ग्रंथाचा आहे. त्याचप्रमाणे या ग्रंथाचा महत्त्वाचा हेतू हासुद्धा आहे की महत्त्वाच्या देशांकरिता विकास आणि वृद्धी प्रतिमानाची योग्य रचना करणे. उदाहरणार्थ, अमेरिकेसाठी आर्थिक प्रतिमान निर्माण करणे, चीनसाठी सामाजिक चौकट तयार करणे, आखाती देशांकरिता उत्पादकता प्रतिमान, जपानसाठी आर्थिक सहयोग प्रतिमान, भारतासाठी सामाजिक-आर्थिक प्रतिमान इत्यादी तयार करणे. अर्थात, हे सर्व प्रतिमान वैश्विक समुदायाच्या बांधणीसाठी एकमेकांना पूरक असणेसुद्धा आवश्यक आहे.

प्रस्तुत ग्रंथात जे प्रतिमान सुचवण्यात आलेले आहेत त्याच्या कार्यवाहीसाठी विविध देश तयार झाले तर त्याची फलनिष्पत्ती निश्चितपणे खूप चांगली राहील, असा आशावाद लेखकाला आहे. याशिवाय न्याय्य, सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाच्या उद्देशाने वैश्विक संतुलन प्रस्थापित करण्यासाठी नवीनतम वैश्विक व्यवस्था निर्माण होईल. शास्त्रीय दृष्टिकोन आणि उदार सामाजिक कल्पनांचा वापर करून आर्थिक प्रगतीचा मार्ग स्वेच्छेने स्वीकारण्यासाठी इस्लामिक राष्ट्रे तयार

होऊ शकतील. भारतासारखी राष्ट्रे भ्रष्टाचारावर मात करत वित्तीय समावेशनाच्या पुढच्या टप्प्याकडे वळतील. जगभरातील श्रीमंत आणि गरीब यांच्यातील आर्थिक विषमतेची दरी कमी होऊ शकेल. चीन, अमेरिका, रशिया, जपान, जर्मनी यासारखी राष्ट्रे जगात सुधारणा घडवून आणण्यासाठी आपली ताकद वापरतील आणि तरुण पिढीसाठी त्यांचा पुढील मार्ग अधिक सुकर बनवतील. सर्वसामान्य व्यक्तींना गुंतवणुकीच्या अधिक चांगल्या आणि व्यापक संधी उपलब्ध होतील की ज्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढेल आणि कमी जोखमीवर ते शाश्वत राहू शकेल.

बहुराष्ट्रीय कंपन्या त्यांच्या भागधारकांच्या संपत्तीत वाढ घडवून आणत असतानाच जागतिक समुदायाला अधिक जबाबदारीने सेवा पुरवतील. नैसर्गिक साधनसंपत्ती अधिक काळजीपूर्वक उपभोगली जाईल की जेणेकरून भविष्यकालीन शाश्वतता टिकून राहील. नवोन्मेषाचा लाभ सर्वांना होऊ शकेल. तांत्रिक नवोन्मेषाला सामाजिक नवोन्मेषाचा आधार राहील की, जेणेकरून सामाजिक परिपक्वता आणि आर्थिक सुबत्ता यांचे सहअस्तित्व राहील. लेखकाला असे वाटते की, या संपूर्ण लेखन प्रपंचाचा हेतू हा आहे की, आपल्या सर्व प्रयत्नांचा परिणाम म्हणून विद्यमान आणि भविष्यकालीन पिढीच्या आर्थिक विकासासंदर्भातील अशाश्वततेच्या कोणत्याही आरोपाचा धनी होता कामा नये.

लेखकाने जटील समस्या सोडविण्यासाठी दहा महत्त्वाच्या नव्या संकल्पना या ग्रंथात विस्ताराने मांडल्या आहेत. डॉ. जाखोटिया यांचे हे महत्त्वपूर्ण योगदान आहे, असे म्हणता येईल.

१. गरिबीची समग्र व्याख्या व तिचे सांख्यिकी मोजमाप.
२. देशाचा 'विकास निर्देशांक', त्यातील विविध घटक व त्यांचे तौलनिक महत्त्व.
३. अर्थव्यवस्थेच्या संतुलनाचा '३ × ३' असा नऊ घटकांचा ढाचा.
४. जागतिक व्यापार परिषदेला समग्र व प्रभावी पर्याय.
५. शिक्षण धोरण व ढाचा, प्रशासकीय ढाचा व छोट्या उद्योजकांच्या बळकटीसाठीचे उपाय.
६. छोट्या शेतकऱ्यांचे 'कोऑपरेटिव्ह कार्पोरेट'द्वारा एकत्र येत तीन टप्प्यांमधून टिकाऊ विकास व ग्राहकांच्या आणि असंघटित कामगारांच्या सहकारी संस्था.
७. राजकीय, सामाजिक व आर्थिक भ्रष्टाचार नष्ट करण्याचे नागरी उपाय आणि लोकांची चळवळ.
८. सार्वजनिक सेवांची पुनर्रचना व सरकारची भूमिका.
९. धर्म आणि लोकोपयोगी अर्थकारणातील अनुत्पादक भेसळ टाळण्याचे उपाय.
१०. श्रीमंतांनी गरिबांसाठी करावयाच्या 'यथोचित त्यागा'चे टिकाऊ अल्गोरिदम (ज्यामुळे सगळ्यांचाच फायदा होईल).

सध्याच्या परिस्थितीत जग अनिश्चित आणि अनियमित कालावधीची अनुभूती घेत आहे. अनावश्यक भांडवलवाद आणि अनुत्पादक साम्यवाद वैश्विक समुदायाच्या सामाजिक-आर्थिक संतुलनातील बिघाडास जबाबदार ठरत आहे. मागील दोन दशकांमध्ये वैश्विक घटनांचे भू-राजकीय आणि आर्थिक घटकांवर ठळकपणे परिणाम होत आहेत. वैश्विक वित्तीय आपत्ती, कोविड महामारी, अमेरिका-चीन यांच्यातील वाढती अस्वस्थता, बहुध्रुवीय विश्व आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे दुर्बल होत जाणाऱ्या श्रीमंत राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था यासारख्या घटनांचा परिणाम संपूर्ण जगावर होत आहे. यासाठीच वेगळ्या आर्थिक प्रारूपाची आवश्यकता भासते की जेणेकरून सर्वसमावेशक, न्याय्य, नैतिक आणि चिरंतन आर्थिक विकास साधता येईल. जागतिक आर्थिक समस्यांच्या निराकरणासाठी दुर्मिळ संसाधनांचा शाश्वत व भेदक पद्धतीने वापर करण्याची गरज आहे. लेखकाने

विद्यमान वैश्विक आर्थिक पर्यावरणातील त्रुटी लक्षात घेऊन दारिद्र्य, सामाजिक बांधिलकीसह संयोजकत्व, तंत्रज्ञानविरुद्ध रोजगार, वैश्विक आर्थिक स्थैर्याचे मार्ग यासारख्या महत्त्वपूर्ण समस्यांवर उपाय सुचविले आहेत. लेखकाने प्रस्तुत ग्रंथसंपदेतून संपूर्ण जगाचा आरसाच मांडला आहे की ज्यात वाढती असमानता, संघर्ष आणि आर्थिक-सामाजिक पडझडीची क्षमता यासारख्या समस्या आवासून उभ्या आहेत. अर्थात, रात्रीच्या अंधकारानंतर पुन्हा उजेड व्हावा तसे वैश्विक अर्थकारणातसुद्धा घडून येण्याबाबत लेखक आशावादी आहेत. सर्वांनी एकत्र येऊन शांतता, उत्कर्ष आणि समानता यासाठी प्रयत्न केल्यास सर्वांगीण विकासाचा मार्ग सुकर होईल. लेखकाने वैश्विक अर्थव्यवस्थेचे समष्टा व सर्वंकष चित्रण करताना बहुतेक सर्व क्लिष्ट चले वापरली आहेत. डॉ. जाखोटिया यांनी प्रदीर्घ संशोधन आणि विश्लेषणानंतर त्यांचे जीवनभराचे कार्य वैश्विक समुदायाकडे सुपुर्द केले आहे. लेखकाच्या अखंड व दीर्घसूत्री चिंतनातून साकार झालेला हा ग्रंथ अर्थशास्त्राचे अभ्यासक, संशोधक आणि तज्ज्ञ यांच्याबरोबरच समस्त जगाला मार्गदर्शक ठरणारा आहे. एकंदरित लेखकाने प्रस्तुत ग्रंथात विश्वव्यापी चिरंतन विकासाबाबत मांडलेली मते व नोंदवलेली निरीक्षणे निश्चितपणे सर्वांना विचार करायला लावणारी आहेत. वैश्विक आर्थिक वृद्धीसाठी समष्टीदृष्टीने मांडलेली प्रारूपे सर्वांना उपयुक्त ठरतील, यात शंका नाही.

◆

शेती हा आमच्या सगळ्यांच्या बुद्धीचा प्रयत्न आहे. कारण अखेरीज ती खरी संपत्ती, चांगली नैतिकता आणि आनंदी बनवते.

**- थॉमस जेफर्सन**

सर्वात मोठी जोखीम म्हणजे कोणतीही जोखीम न घेणे.

**- मार्क झुकरबर्ग**

माणूस म्हणतो, पैसा आला की, मी काही तरी करेन; पैसा म्हणतो, तू काही तरी कर मगच मी येईन!

**- अनामिक**

# ट्रायल्स, ट्रिब्युलेशन्स अँड अहा! मॉमेंटस् ऑफ अ टॅक्समॅन

**अविनाश कुलकर्णी** †

**पुस्तकाचे नाव :** Trials, Tribulations and Aha! Moments of a Taxman

**लेखक :** आर.के. शर्मा (सेवानिवृत्त - इंडियन रिव्हेन्यू सर्व्हिसेस) आणि प्रा. शिबू नायर

**प्रकाशक :** क्लेव्हर फॉक्स पब्लिशिंग

**एकूण पृष्ठे :** ४३२ **किंमत :** रु. ५२५

**प्रस्तावना :**

सार्वजनिक अर्थशास्त्र विषयाचे अध्ययन करताना कररचना आणि त्यांचे विविध प्रकार किंवा वर्गीकरण यांचा आपण आढावा घेतो. या कररचनेतील प्रत्यक्ष कर आणि त्यापैकी सर्वात महत्त्वाचा व जिव्हाळ्याचा करविषय म्हणजे आयकर होय. या आयकर विभागात काम करत असताना पुस्तक लेखकाने त्यांच्यासमोर आलेल्या विविध प्रकरणाचे व्यष्टी अध्ययन या पुस्तकात दिलेले आहे. प्रस्तुत पुस्तकाचे शीर्षक हे वाचकांना आकर्षित करणारे आणि त्यांची उत्सुकता वाढविणारे आहे. परंतु अर्थशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना व अर्थसंवादच्या वाचकांना या पुस्तकाचा उचित आणि नेमक्या शब्दात परिचय करून देण्याचा हा प्रयत्न आहे.

लेखक शर्मा यांनी आय.आय.टी. रुरकी येथून भौतिकशास्त्र याविषयामध्ये पदव्युत्तर पदवी (M.Sc.) संपादित केली. पुढे त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथून सोशल पोलिसी अँड प्लॅनिंग याविषयात (M.Sc.) संपादित केली. ते भारतीय आयकर विभागात मुख्य आयुक्तपदी कार्यरत होते. पुणे येथे ते महाप्रबंधक अन्वेषण (DG-Investigation) या पदावरून सेवानिवृत्त झाले. प्रस्तुत पुस्तकाचे सहलेखक प्रा. शिबू नायर हे पत्रकारिता याविषयात पीएच.डी. आहेत व याविषयात त्यांनी विशेष प्रावीण्य मिळविले आहे त्यामुळे त्यांना सुवर्णपदक देऊन सन्मानित केले गेले आहे. प्रा. नायर यांनी टाइम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रासाठी माध्यम साक्षरता याविषयीच्या ३०० पेक्षा अधिक कार्यशाळा घेतल्या आहेत. या पुस्तक लेखनाचा मुख्य उद्देश स्पष्ट करताना लेखक म्हणतात की, आयकर विभागाबाबत समाजामध्ये नेहमी एक गैरसमज करून घेतला जातो. नेमका त्याविषयी योग्य तो प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करणे हा या पुस्तकाचा मुख्य हेतू आहे.

† सिनियर फेलो, सांस्कृतिक स्रोत एवं प्रशिक्षण केंद्र, नवी दिल्ली द्वारा - गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे आजीव सभासद क्र.१५२५, भ्रमणध्वनी : ९८२२२०३१८७, ई-मेल : dravikul@gmail.com

या पुस्तकात आयकर अधिकारी म्हणून काम करत असताना पुढील तत्त्व पालन केली पाहिजेत असे लेखकाने आवर्जून सांगितले आहे.

- एक पैसा कमी नाही आणि एक पैसा जास्त नाही.
- करदात्याची सेवा करण्यासाठी आपले सर्वोत्तम देणे आणि करदात्याला कमीत कमी गैरसोय होईल हे पाहाणे.
- करभरणा करणे हे करदात्याचे वैधानिक व सामाजिक तसेच राष्ट्रीयकर्तव्य आहे हे सांगणे.
- करदात्याच्या प्रामाणिक चुकांचा सहानुभूतीपूर्वक विचार केला पाहिजे.
- कर चुकवेगिरी करणाऱ्यांना कोणतीही दया दाखवली जाऊ नये. कारण ते प्रामाणिक करदात्यांची मोठी हानी करत असतात आणि कल्याणकारी राज्य चालविण्यासाठी राज्याच्या तिजोरीला ते योग्य महसुलापासून वंचित ठेवत असतात.

पुस्तकात लेखकाने आयकर अधिकारी म्हणून काम करत असताना समोर आलेल्या वेगवेगळ्या घटनांचे वा अनुभवाचे व्यष्टी अध्ययन दिले आहे. त्यामधील उदा. म्हणजे एक मोठा उद्योग समूह कर चुकविण्यासाठी वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरत असल्याचे स्पष्ट करताना म्हटले आहे की, कर्मचारी कल्याण म्हणून चॅरिटी अर्थात धर्मदाय खर्चाचा छडा लेखकाने लावला. त्यामुळे उत्पन्न आणि कराचा भरणा करोडो रुपयात झाला. त्याचप्रमाणे शुद्ध भांडवली खर्चाचा महसुली खर्च म्हणून दावा केल्याप्रकरणी आणि कर चुकविला त्यासाठी एका मोठ्या उद्योगास पकडल्याचे व्यष्टी अध्ययन लेखकाने विस्तृतपणे केले आहे. पुढे १२ वर्षांपासून करचुकवेगिरी करणारे प्रकरण उघडण्यात आल्याचे व्यष्टी अध्ययन लेखकाने पुस्तकात दिले आहे. आयकर विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कारस्थानांमुळे कंपन्या दंड आणि कारवाईपासून कशा दूर होत्या, हेही लेखकाने निष्ठेने आणि निष्पक्षपणे मांडले आहे.

अशाप्रकारे प्रस्तुत पुस्तकात लेखकाने प्रकरण एक ते तीनमध्ये ते देशातील वेगवेगळ्या ठिकाणी आयकर विभागात काम करताना त्यांना आलेल्या अनुभवाचे वर्णन आणि विवेचन केले आहे. तर प्रकरण चार, पाच आणि सहामध्ये त्यांनी वेगवेगळ्या व्यष्टी अध्ययनाचे विश्लेषण दिलेले आहे. यापैकी प्रकरण चारमध्ये लेखकाने करभरणा टाळण्यासाठी चॅरिटी म्हणजे धार्मिक बाबींचा कसा खुबीने वापर केला जातो, त्याचे विश्लेषण केले आहे. प्रकरण पाचमध्ये लेखकाने विद्युतनिर्मिती करणे आणि कर चुकवणे यासंबंधी वापरण्यात येणाऱ्या क्लृप्त्या याचे विवेचन आणि विश्लेषण दिले आहे, तर प्रकरण सहामध्ये तयार कपडे उद्योगात व्यावसायिक अवमूल्यन दाखवून करचुकवेगिरी कशी केली जाते, याचे विवेचन आणि विश्लेषण केले आहे.

प्रत्यक्ष कराचा भरणा टाळण्यासाठी करण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या क्लृप्त्या मांडताना लेखकाने महसुली विभाग आणि त्यांचे कर्तव्य व जबाबदऱ्या, करदाता व त्यांचे कर्तव्य आणि सामाजिक जबाबदारी यांची मांडणी कल्याणकारी राज्याच्या निर्मितीप्रक्रियेत अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे अधोरेखित केले आहे, ही या पुस्तकाची महत्त्वाची जमेची बाजू आहे.

समारोपामध्ये लेखकाने अधिकारी, न्यायपालिका, कार्यपालिका आणि विधिमंडळ यांच्या कामकाजात सुधारणा करण्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण कल्याणासाठी अनेक सूचनाही दिल्या आहेत. प्रस्तुत पुस्तक छापील स्वरूपात व इ-कॉपी स्वरूपातही उपलब्ध आहे. हे पुस्तक सार्वजनिक अर्थशास्त्र विषयाचा अभ्यास करणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरणारे आहे.

◆

## महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)
**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५**
दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१ ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in
संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in


**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना-विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित-संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व - डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) - स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास-रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश - संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला- के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) - स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज - श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई-बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोंदिया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी ॲन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३१९०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

अर्थसंवादसाठी मन:पूर्वक शुभेच्छा

**डॉ. सौ. मंजुषा मुसमाडे**

पुणे



मूल्य : रु. १०/- (सभासदांकरिता विनामूल्य)

भारती मुद्रणालय, कोल्हापूर